नागपूर मुख्य कार्यालय
कॉटन मार्केट, नागपूर -४४००१८

संपर्क
संपादकीय : ९९२२९७००२३
वितरण : ८८८८६४७७५३
जाहिरात : ७४४७७३५८५१ / ९३२६९०६०६२
नागपूर कार्यालय संपर्क : ७४४७७३५८५१

नागपुर, अकोला, अमरावती, खामगांव, यवतमाळ, वर्धा, गडचिरोली, वाशीम, भंडारा, गोंदिया, मुंबई, पालघर (ठाणे), नाशिक आणि चंद्रपूर महासागर

# महासागर

Epaper: www.epaper.dainikmahasagar.in nagpurpost@gmail.com / mahasagarngp@gmail.com

* वर्ष ५२ * अंक १८४ * * अकोला * मंगळवार, दिनांक ६ जानेवारी २०२६ ८ पाने ● किमत रू. २/-+ वितरण खर्च रू. १ = एकुण ३ रू.) * विशेष ऑफर : महासागर + नागपूर पोस्ट = ४ रु. फक्त


## इंदूरमध्ये दूषित पाण्यामुळे १७ वा मृत्यू

■ वृत्तसंस्था, इंदूर, दि. ५ :
इंदूरच्या भागीरथपुरा येथे दूषित पाणी प्यायल्याने १७ वा मृत्यू झाला आहे. रविवारपर्यंत हा आकडा १६ मृत्यूंचा होता. सेवानिवृत्त पोलीस कर्मचारी ओमप्रकाश शर्मा (६९) मूळचे धार येथील शिव विहार कॉलनीचे रहिवासी होते. त्यांना एका खाजगी रुग्णालयात दाखल करण्यात आले होते.

तपासणीत त्यांची किडनी खराब झाल्याचे आढळून आले. दुपारी १ वाजता त्यांचा मृत्यू झाला. दरम्यान, बॉम्बे रुग्णालयात ११ रुग्ण आयसीयूमध्ये दाखल होते, त्यापैकी ४ रुग्णांना वॉर्डमध्ये हलवण्यात आले आहे. स्थितीनुसार ७ रुग्णांवर आयसीयूमध्ये उपचार सुरू आहेत. आतापर्यंत एकूण ३९८ रुग्णांना रुग्णालयात दाखल करण्यात आले होते.

## ऊर्जावान सदानंद दाते




महाराष्ट्राच्या पोलीस महासंचालक पदी सदानंद दाते यांना नेमण्यात आलेले आहे. आतापर्यंत ते राष्ट्रीय तपास यंत्रणेचे प्रमुख होते, ते पद कदाचित या पदापेक्षाही मोठे आहे आणि असेलही परंतु, आपल्या मायभूमीत आपल्या महाराष्ट्रासाठी त्यांच्यासारख्या पोलीस खात्यातील अकलंक अधिकाऱ्याला या पदावर नेमणे नेमण्याचे हे कार्य महाराष्ट्राचे गृहखाते सांभाळणारे मुख्यमंत्री यांनी केलेले आहे, हे अत्यंत महत्त्वाचे आहे. जे एफ रिबेरो रोड्रिक्स, अरविंद ईनामदार यांच्यासारख्याच अनेक महनीय अधिकाऱ्यांचा ठसा उमटवलेल्या जागेवर दातेसाहेबांची नियुक्ती महाराष्ट्रासाठी अत्यावश्यक होती. यापूर्वीच्या पोलीस महासंचालक रश्मी शुक्ला यांची कारकीर्द जशी होती तशी होती पण, आता आलेल्या दाते साहेबांना त्यांना नोकरी लागल्याबरोबर त्यांची पंधरवड्यातच बदली झाली. त्यावेळी झालेली बदली त्यांच्या स्वच्छ कारभाराची ग्वाही होती हे मान्य केलेच पाहिजे. आपल्या पोलीस खात्याची प्रतिमा चांगली ठेवण्यासाठी ज्या ज्या उच्च अधिकाऱ्यांनी प्रयत्न केले तसेच प्रयत्न आणि मिळालेल्या उच्च पदाला साजेशी कृती आणि कार्य करण्यासाठी दाते साहेब प्रयत्न करतीलच. या अधिकाऱ्याला सत्यापासून विचलित करणारा, कर्तव्यापासून परावृत्त करणारा, आणि कुणाच्यातरी दबावाखाली येऊन वाटेल तसे निर्णय घेणारा अधिकारी म्हणून कधीच ओळखले गेले नाही. चिपळूण मधील पहिल्या नियुक्तीनंतर अवघ्या आठ ते दहा दिवसात बदली होणे, हा त्यांच्या सद्विचारांचा विजय आहे असेच दिसले होते. कोळशाच्या खाणीत राहूनही कुठेही काळा डाग लागू न देता त्यांनी जी जी पदे स्वीकारली, त्या त्या पदांचे सोने केले. आज कालच्या काळात राजकारणी महानुभवांच्या अपेक्षा पूर्ण करता करता अनेक निर्णय मनाविरुद्ध घ्यावे लागतात. मात्र, सदानंद दाते यांची ख्याती अशी आहे की जे कायद्यात बसेल, सद्सद्विवेक बुद्धीला पटेल आणि जे जनहितार्थ असेल तेच दाते यांनी केलेले आहे. सदानंद दाते हे पोलीस अधिकाऱ्यांच्या नभांगणातील तारा आहेत, असे सर्टिफिकेट मा. पोलीस आयुक्त जे. एफ. म्हणजेच ज्युलियो रिबेरो यांनीच त्यांना दिले होते. रिबेरो यांच्या सारख्या अधिकाऱ्याने एखाद्याला प्रशस्तीपत्र देणे ही गोष्ट फार मोठी आहे. रिबेरो यांच्याकडून अशा प्रकारे उल्लेख होणे म्हणजेच, तो माणूस कोळशाच्या खाणीतून निघालेला हिराच आहे. हे सर्वांनी समजून घ्यावेच लागेल कारण, त्यांच्या सेवाकाळात जे जे काम दिले गेले ते ते त्यांनी उत्तम पार पाडलेले आहे. कर्तव्य दक्षतेच्या भावनेतून सर्व काम करणाऱ्या या अधिकाऱ्याला आता मुंबईत आपल्या कामाची चुणूक दाखवावी लागेल. स्कॉटलंड यार्ड या इंग्लंडमधील पोलीस यंत्रणे सोबत मुंबईच्या पोलीस दलाची तुलना पूर्वी होत असे. आता तो वचक, तो दरारा आणि तीच ख्याती मुंबई पोलिसांना पुनश्च मिळवून देण्याचे कार्य सदानंद दाते करतील यामध्ये शंका नाही. परंतु राज्यातील पोलीस यंत्रणेचा मुखडा सचोटीचा आणि प्रामाणिकपणाचा आहे हे जोपर्यंत जनतेला दिसत नाही. तोपर्यंत या खात्यावरचा विश्वास उंचावण्यासाठी जे जे करणे शक्य आहे ते ते सदानंद दाते करतील याची खात्री वाटते. दाते यांनी 'न्यायदाते' व्हावे हीच आमची अपेक्षा आहे आणि अर्थात तीच त्यांची परीक्षा आहे. त्यामध्ये ते उत्तीर्ण होतील याची आम्हाला शंभर टक्के खात्री आहे. महाराष्ट्राच्या जनतेला ज्या अधिकाऱ्याबद्दल आदर आणि विश्वास आहे. असा सर्वकालीन नीतिमत्ता बाळगून कारभार करणारा अधिकारी संचालक पदी लाभल्यामुळे पोलीस खात्यातील बऱ्याचशा सचोटीच्या आणि नेकीने काम करणाऱ्या अधिकाऱ्यांना पोलीस दलाची मान उंचावण्यासाठी कार्य करण्याची ऊर्जा लाभेल, हेच महत्त्वाचे!


mahasagarngp@gmail.com
Mob. No. 9922970023


## बिनविरोध निवडीविरोधात मनसे, काँग्रेसची
# अखेर हायकोर्टात धाव

### हायकोर्टाच्या निगराणीखाली चौकशीची मागणी : निवडणूक आयोगाच्या तटस्थतेवर बोट

■ महासागर प्रतिनिधी
मुंबई, दि. ५ :
राज ठाकरे यांच्या नेतृत्वातील महाराष्ट्र नवनिर्माण सेना व काँग्रेसने अखेर महापालिका निवडणुकांत बिनविरोध निवडून आलेल्या उमेदवारांविरोधात मुंबई उच्च न्यायालयात याचिका दाखल केली आहे.

या याचिकेद्वारे या दोन्ही पक्षांनी राज्य निवडणूक आयोगाच्या पारदर्शकतेवर प्रश्नचिन्ह उपस्थित करत या प्रकरणाची हायकोर्टाच्या निगराणीखाली चौकशी करण्याची मागणी केली आहे. विशेषतः ही चौकशी पूर्ण होईपर्यंत बिनविरोध निवडणुकीचे निकाल जाहीर न करण्याचे आदेश निवडणूक आयोगाला द्यावेत, असेही या पक्षांनी म्हटले आहे. या याचिकेवर हायकोर्ट कोणता निर्णय देते? हे पाहणे औत्सुक्याचे ठरणार आहे.

राज्यात जवळपास ६७ ठिकाणी सत्ताधारी महायुतीचे उमेदवार बिनविरोध निवडून आल्यामुळे राजकारण तापले आहे. या पार्श्वभूमीवर मनसेचे नेते अविनाश जाधव व काँग्रेस नेते समीर गांधी यांनी सोमवारी मुंबई उच्च न्यायालयात याचिका दाखल करून महापालिका निवडणुकीच्या प्रक्रियेवर प्रश्नचिन्ह उपस्थित केले आहे.

महापालिका निवडणुकीत उमेदवारी मागे घेणाऱ्या उमेदवारांना पैसे देऊन प्रसंगी दबाव टाकून उमेदवारी मागे घेण्यास भाग पाडण्यात आले. लोकप्रतिनिधित्व कायद्यात बिनविरोध निवडीची कोणतीही संकल्पना नाही. या कायद्यात निवडून आलेले लोकप्रतिनिधी असा स्पष्ट उल्लेख आहे. बिनविरोध उमेदवारांना पडलेल्या मतांची टक्केवारी निश्चित केली जावी, अशी मागणी या याचिकेद्वारे करण्यात आली आहे.

### निवडणूक प्रक्रियाच ढासळून टाकणार असाल तर....



फॉर्म मागे घेण्यासाठी विधानसभेचा अध्यक्ष उभा राहून धमक्या देतो तरी तुम्हाला अजून किती प्रूफ हवेत आमच्याकडून? निवडणूक बरोबर चालली आहे, यात कुठलाही दबाव नाही असं म्हणत असाल, तर कसं चालेल? अशी विचारणा मनसे नेते अविनाश जाधव यांनी केली.
देशातील निवडणूक यंत्रणा पुढील पिढ्यांसाठी सुरक्षित राहावी यासाठी आज आम्ही आलो आहोत. मुंबई हायकोर्टाचाएक निर्णय देशातील विविध निवडणुकांवर परिणाम देणारा असेल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला. नोटा ऑप्शनचा जर वापर केला तर आत्ताच्या घडीला सर्व जागेवर किमान दहा हजार मत यांच्या विरोधात पडतील. परंतु, हे सगळे निवडणूक यंत्रणेला करायचे नसल्याचे ते म्हणाले.

## बिनविरोध निवडी हा चांगला पायंडा



■ महासागर प्रतिनिधी
नागपूर / मुंबई, दि. ५ :
बिनविरोध निवडीवरून राजकारण तापलेले असतानाच, निवडणूक बिनविरोध व्हायला काय हरकत आहे? हा एक चांगला पायंडा आहे. यामध्ये नियमाचे उल्लंघन होण्यासारखे काय आहे? असा प्रतिसवाल भाजप नेते चंद्रशेखर बावनकुळे यांनी केला. ते आज छत्रपती संभाजीनगर येथे पत्रकारांशी संवाद होते.

यावेळी त्यांनी राज ठाकरे यांच्यावर टीका केली. राज ठाकरे यांच्या सभांना आता पूर्वीसारखी गर्दी होत नसेल, म्हणूनच ते आता मुंबईतील शिवसेना-मनसेच्या शाखांना भेटी देत फिरत आहेत, असे ते म्हणाले.

महानगरपालिका निवडणुकीत अनेक उमेदवार बिनविरोध निवडून आल्यानंतर विरोधकांकडून सत्ताधाऱ्यांवर आरोप सुरू आहेत. या बिनविरोध निवडीविरोधात मनसे नेते अविनाश जाधव यांनी आज राज्य निवडणूक आयुक्तांची देखील भेट घेत, त्यांच्यासमोर पुरावे सादर केलेत. यावर भाजपचे नेते चंद्रशेखर बावनकुळे यांनी विरोधकांचे आरोप फेटाळून लावत, बिनविरोध निवडींचे समर्थन केले.

बावनकुळे म्हणाले की, ?निवडणूक बिनविरोध व्हायला काय हरकत आहे? हा एक चांगला पायंडा आहे. यापूर्वी राज्यात बिनविरोध सरपंच निवडून यायचे, तेव्हा आम्ही कधीच विरोध केला नाही. जनतेला विकास हवा आहे, म्हणून त्यांनी सत्ताधाऱ्यांच्या मागे उभे राहण्याचे ठरवले आहे. राज ठाकरेंनी न्यायालयात जाण्याची गरज नव्हती, असेही त्यांनी नमूद केले.

बावनकुळे म्हणाले की, ज्याला जिथे जायचे आहे तिथे जाण्याचा अधिकार लोकशाहीत आहे. बिनविरोध निवडीमध्ये कोणत्याही नियमाचे उल्लंघन झालेले नाही. मग यात आक्षेप घेण्यासारखे काय? सोलापूरच्या नेत्या प्रणिती शिंदे भाजपमध्ये प्रवेश करणार असल्याच्या चर्चांवर बावनकुळे यांनी स्पष्टीकरण दिले. प्रणिती शिंदे कधीही भाजप नेत्यांच्या भेटीला आलेल्या नाहीत आणि त्या आमच्या संपर्कातही नाहीत. अफवा पसरवू नका, असे म्हणत त्यांनी या चर्चा फेटाळून लावल्या.

## बसने तिघांना चिरडले



■ महासागर प्रतिनिधी,
बुलढाणा, दि. ५ :
बुलढाणा-अजिंठा राज्य मार्गावरील धाडनजीक झालेल्या भीषण अपघातात तिन युवकांचा घटनास्थळीच मृत्यू झाला. राज्य परिवहन मंडळाची बस आणि दुचाकीची भरवेगात धडक होऊन दुचाकी बसखाली आल्याने ही भीषण दुर्घटना घडली. तिन्ही मृतक ढालसावंगी येथील रहिवासी होते.

आज सोमवारी, ५ जानेवारीला संध्याकाळी हा अपघात घडला. छत्रपती संभाजीनगरकडून बुलढाणा जिल्ह्यातील धाडकडे येणाऱ्या राज्य परिवहन महामंडळाची शिवशाही बस आणि विरुद्ध दिशेने येणाऱ्या दुचाकीची समोरासमोर भरवेगात धडक झाली. दुचाकी बसखाली अक्षरशः चिरडल्या गेल्याने तिघांचा घटनास्थळीच मृत्यू झाला. धाडनजीकच्या करडीच्या (धाड) पुलावर ही दुर्घटना घडली. यातील एका युवकाच्या डोक्याची कवटी फुटून त्यांच्या मेंदूचा अक्षरशः चेंदामेंदा झाला.

मलकापूर आगाराची बस छत्रपती संभाजीनगर येथून मलकापूर (जि. बुलढाणा)कडे जात होती. तर ढालसावंगी (ता. बुलढाणा) येथील हे तिघे मोटारसायकलने धाडवरून करडी गावाच्या दिशेने जात होते. सदर बस सायंकाळी करडी (धाड) येथील पुलावर येताच या दोन्ही वाहनांमध्ये समोरासमोर जोरदार धडक झाली. यात दुचाकीस्वार गंभीर जखमी झाल्याने त्यांचा घटनास्थळीच मृत्यू झाला.

अंकुश पाडळे (३२), रवी चंदनशिव (२३) आणि कैलास शिंदे (३०) अशी मृतांची नावे आहेत. या घटनेमुळे ढालसावंगी गावावर शोककळा पसरली आहे. मृतांच्या घरी एकच आकांत उसळला. घटनास्थळी नागरिकांनी मोठ्या प्रमाणात गर्दी केली होती. धाड पोलीसही दाखल झाले. पोलिसांनी पंचनामा करून वाहतूक सुरळीत केली.

## तोफ थंड, आता फक्त कॉर्नर मीटिंग

### उद्धव ठाकरेंवर शिरसाटांचा हल्लाबोल



■ वृत्तसंस्था
छ. संभाजीनगर, दि. ५ :
मंत्री संजय शिरसाट यांनी आज उद्धव ठाकरे आणि एमआयएमवर जोरदार शब्दांत टीका केली. एकेकाळी तोफ म्हणून ओळखले जाणारे नेते आता निष्प्रभ झाले असून, त्यांच्याकडे सध्या केवळ कॉर्नर मीटिंग हाच पर्याय उरला आहे, असा टोला शिरसाट यांनी लगावला. अहंकारामुळेच त्यांच्यावर ही वेळ आल्याचेही त्यांनी म्हटले.

एमआयएमवर निशाणा साधताना शिरसाट म्हणाले की, हैदराबादचे नेते येथील तरुणांची डोकी भडकवण्याचे काम करत आहेत. दंगली घडवल्याशिवाय निवडणूक जिंकता येत नाही, अशी त्यांची मानसिकता आहे, मात्र त्यांनी इतिहास विसरू नये, आम्ही त्यांचेच वारसदार आहोत, असा इशाराही त्यांनी दिला.

## टाटा मेमोरियलला धमकीचा ईमेल




### मुंबईत धमक्यांची मालिका सुरूच

■ महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. ५ :
टाटा मेमोरियल हॉस्पिटलच्या परिसरात बॉम्ब ठेवल्याचा इशारा देणारा एक ईमेल आज सकाळी रुग्णालय प्रशासनाला प्राप्त झाला. त्यानंतर परेल पोलिसांनी तत्काळ घटनास्थळी धाव घेऊन तपासणी सुरू केली. हा घटनाक्रम पाहून इथे उपचारासाठी आलेल्या रुग्णांसह परिसरात मोठी घबराट पसरली होती.

मुंबईतील टाटा मेमोरियल रुग्णालयाला सोमवारी सकाळी धमकीचा ईमेल प्राप्त झाला. या ईमेलमध्ये रुग्णालयाच्या परिसरात बॉम्ब ठेवण्यात आल्याचा दावा करण्यात आला होता. हा ईमेल मिळताच रुग्णालय प्रशासनाने तातडीने मुंबई पोलिसांना माहिती दिली. त्यानंतर मुंबई पोलिस व बॉम्बनाशक पथक तातडीने घटनास्थळी दाखल झाले. त्यांनी संपूर्ण इमारत व परिसराचा ताबा घेत बॉम्बची शोधाशोध सुरू केली. पण कोणतीही संशयास्पद वस्तू हाती लागली नाही. त्यामुळे बॉम्ब ठेवल्याचा इशारा केवळ अफवा ठरला आहे. पोलिसांसह रुग्णालयाचे अधिकारीही ईमेल पाठवणाऱ्याचा व त्यामागील हेतूचा तपास करत आहेत. मुंबई पोलिसांनी जारी केलेल्या निवेदनानुसार, बॉम्बच्या धमकीनंतर सुरक्षा यंत्रणांना हाय अलर्टवर ठेवण्यात आले होते.

## बाप बड़ा ना भैया, सबसे बड़ा रुपय्या!



■ महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. ५ :
राज्यात स्थानिक स्वराज्य संस्था निवडणुकीत फ्री अँड फेअर निवडणुकीच्या धोरणाला हरताळ फासला आहे. मुख्यमंत्री व दोन्ही उपमुख्यमंत्री यांनी लोकशाही गुंडाळून टाकली असून पैशाचा खेळ सुरु आहे. मतदानाआधीच घोडेबाजार सुरु असून भाजपा महायुतीची सत्तेची भूक लोकशाही गिळंकृत करण्यापर्यंत पोहचली आहे.

महानगरपालिका निवडणुकांमध्ये बाप बड़ा ना भैया, सबसे बड़ा रुपैयाचे वगनाट्य जोरात सुरु आहे, असा हल्लाबोल महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी केला आहे.

टिळक भवन येथे पत्रकार परिषदेत बोलताना काँग्रेस प्रदेशाध्यक्ष म्हणाले की, निवडणुका या काही नवीन नाहीत, निकोप लोकशाहीत विरोधी पक्षांनाही तेवढेच महत्व आहे. देशाचे पहिले पंतप्रधान पंडित जवाहरलाल नेहरु यांच्या मंत्रिमंडळात सहा बिगर काँग्रेसचे मंत्री होते, ही आपली संस्कृती व परंपरा आहे पण विरोधकच नको अशी प्रवृत्ती भाजपा व महायुतीची बनली असून त्यातून बिनविरोधसाठी सत्ताधारी कोणत्याही स्तराला जात आहेत.

विरोधी पक्षांच्या उमेदवाराला अर्ज भरू न देणे, धमक्या देणे, दबाव तंत्राचा वापर करणे त्याचबरोबर पोलीस, प्रशासन यांच्या मदतीने बेशरमपणाचा खेळ सुरु आहे आणि निवडणूक आयोग मात्र याचा मूक साक्षिदार बनला आहे, याचा आम्ही निषेध करतो.

लोकशाहीत संविधानाने दिलेला मतदानाचा हक्क बजावण्यासाठी नोटाचा पर्यायही आहे, बिनविरोधच्या ठिकाणी मतदारांना नोटा वापरण्याची संधी द्यावी, असे सपकाळ म्हणाले.

संवैधानिक पदावरील व्यक्तीने राजकीय अभिनिवेष बाजूला ठेवणे अपेक्षित आहे. लोकसभेचे अध्यक्ष, राज्यसभेचे सभापती, राज्यपाल, विधानसभेचे अध्यक्ष परिषदेचा सभापती ही संवैधानिक पदे आहेत, त्यांचा आदराने उल्लेख केला जातो पण महाराष्ट्र विधानसभेचे अध्यक्ष राहुल नार्वेकर हे यांनी पदाची प्रतिष्ठा घालवली.

राहुल नार्वेकर यांनी अध्यक्षपदाच्या आपल्या पहिल्या कारकिर्दीत पक्षांतर बंदी कायदा मोडीत काढून लोकशाही व संविधानाच्या छातीत सुरा खुपण्याचे काम केले, म्हणून त्यांना दुसऱ्यांदा संधी देण्यात आलेली आहे, असा टोलाही सपकाळ यांनी लगावला.

## नारायण राणेंना स्टेजवर भोवळ



■ वृत्तसंस्था, चिपळून, दि. ५ :
भाजपचे ज्येष्ठ नेते व खासदार, माजी मुख्यमंत्री नारायण राणे यांनी कालच राजकीय संन्यास घेण्याचे संकेत दिल्यानंतर आज चिपळूणमधील कार्यक्रमात त्यांची प्रकृती बिघडल्याची घटना घडली आहे. कृषी महोत्सवाच्या कार्यक्रमादरम्यान भाषण करत असताना नारायण राणेंना चक्कर आल्याने कार्यक्रमस्थळी एकच धावपळ उडाली.

भाषणाच्या अखेरच्या टप्प्यात राणेंचा आवाज बसल्याचं दिसून आलं. चक्कर येत असल्याची भावना झाल्यानंतर त्यांनी भाषण तात्काळ आटोपत घेतलं. प्रकृती अस्वस्थ असल्याने त्यांनी माध्यमांशी संवाद साधण्यास नकार दिला. कार्यक्रमस्थळावरून नारायण राणे थेट विश्रामगृहाकडे रवाना झाले. यावेळी त्यांच्यासोबत पत्नी तसेच मोठा पोलीस बंदोबस्त होता.

## शरद पवार यंदा खासदार बनू शकणार नाहीत

### ओवेसी यांनी सांगितले राज्यसभेचे गणित



■ महासागर प्रतिनिधी
मुंबई, दि. ५ :
राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी शरदचंद्र पवार पक्षाचे अध्यक्ष शरद पवार यावेळी राज्यसभेवर निवडून जाण्याची शक्यता नसल्याचा दावा एमआयएमचे अध्यक्ष असदुद्दीन ओवेसी यांनी केला आहे.

शरद पवारांकडे राज्यसभेवर परतण्यासाठी आमदारांचे संख्याबळ नाही. त्यामुळे नजीकच्या भविष्यात एक मोठा तमाशा होईल, असे ते म्हणालेत. ओवेसी यांच्या या विधानामुळे राष्ट्रवादीचे दोन्ही गट एकत्र येऊन शरद पवार राज्यसभेवर जाणार का? असा प्रश्न चर्चिला जात आहे.

असदुद्दीन ओवेसी यांनी एका सभेत राज्यसभा सदस्यत्वावर भाष्य करून भविष्यात राज्याच्या राजकारणात मोठ्या घडामोडी होणार असल्याचे संकेत दिले.

शरद पवार यांचा राज्यसभेचा कार्यकाळ मार्चमध्ये संपणार आहे. आता त्यांच्याकडे सत्ता कुठे आहे? त्यांच्या युतीकडे त्यांना राज्यसभेवर पाठवण्याएवढे खासदार कुठे आहेत? ते राज्यसभेवर कसे जाणार? हे त्यांना विचारले पाहिजे.

त्यांना पुन्हा राज्यसभेवर जायचे असेल तर त्यांना आमदारांचे संख्याबळ लागेल ना? मग तुम्हाला कळेल. त्यासाठी जे काही होईल तो फक्त तमाशा होईल. यामुळे महापालिका निवडणुकांसह राज्यसभेच्या निवडणुकाही महत्त्वाच्या आहेत, असे असदुद्दीन ओवेसी म्हणाले.
उल्लेखनीय बाब म्हणजे पुढील काही महिन्यांत राज्यसभेवरील अनेक नेत्यांचा कार्यकाळ संपुष्टात येणार आहे.

## मराठी मतं ठाकरे बंधूंकडे, अमराठी भाजप-शिंदेंकडे?

### सर्व्हेने उडवली खळबळ



■ महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. ५ :
मुंबई महानगरपालिका निवडणुकीच्या प्रचाराला आता अधिकृतपणे रंगत चढू लागली आहे. सोमवारपासून मुंबईत ठाकरे बंधू आणि महायुतीच्या प्रमुख नेत्यांच्या प्रचारसभा सुरू होत असून, राजकीय वातावरण तापू लागले आहे. एकीकडे राज ठाकरे आणि उद्धव ठाकरे यांच्यासाठी ही निवडणूक अस्तित्वाची लढाई मानली जात असताना, दुसरीकडे भाजपने कोणत्याही परिस्थितीत मुंबईत आपलाच महापौर बसवायचा, असा निर्धार केल्याचे दिसून येते.

या निवडणुकीत ठाकरे बंधूंनी आपले संपूर्ण लक्ष मुंबईतील मराठी मतदारांवर केंद्रित केले आहे. मराठी अस्मिता, मुंबईवरील हक्क आणि स्थानिक प्रश्न हे त्यांच्या प्रचाराचे मुख्य मुद्दे असणार आहेत. शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्ष आणि मनसे यांची संभाव्य एकत्रित ताकद मराठी मतदारांमध्ये प्रभावी ठरू शकते, असा अंदाज विश्लेषक व्यक्त करत आहेत.

दुसरीकडे, भाजप आणि एकनाथ शिंदे यांच्या शिवसेनेने या निवडणुकीसाठी वेगळीच आक्रमक रणनीती आखली आहे. मराठी मतदारांसोबतच उत्तर भारतीय आणि इतर अमराठी मतदारांना मोठ्या प्रमाणावर आपल्याकडे खेचण्यावर महायुतीचा भर आहे. मुंबईतील अमराठी व्होटबँक ही भाजपची पारंपरिक ताकद मानली जाते आणि याच ताकदीच्या जोरावर भाजप-शिवसेना महायुती मुंबईत सत्ता कायम ठेवण्याचा प्रयत्न करत आहे. त्यामुळे प्रचारात हिंदुत्व, राष्ट्रवाद आणि विकासाचे मुद्दे ठळकपणे मांडले जाणार आहेत.

या सर्व पार्श्वभूमीवर AsceIndia या संस्थेने मुंबई महानगरपालिका निवडणुकीबाबत केलेल्या सर्व्हेने चर्चांना उधाण आले आहे. या सर्व्हेमध्ये मुंबईतील विविध समाजघटकांमध्ये कोणत्या पक्षाला किती टक्के मतदान मिळू शकते, याचा अंदाज वर्तवण्यात आला आहे.

या सर्व्हेनुसार, मराठी मतदारांचा मोठा हिस्सा ठाकरे बंधूंच्या बाजूने झुकलेला असला, तरी एकूण राजकीय समीकरण पाहता मुंबईत भाजप-शिवसेनेचाच महापौर बसण्याची शक्यता अधिक असल्याचे संकेत देण्यात आले आहेत.

सर्व्हेनुसार, मुंबईतील मराठी मतदारांमध्ये ठाकरे गट आणि मनसे यांना ४४ टक्के मतदान मिळण्याचा अंदाज आहे, तर भाजप-शिवसेना महायुतीला ४२ टक्के मराठी मतदारांचा पाठिंबा मिळू शकतो. काँग्रेसला केवळ ४ टक्के तर इतर पक्षांना ११ टक्के मराठी मतं मिळण्याची शक्यता व्यक्त करण्यात आली आहे.

सर्व्हेनुसार मुस्लीम मतदारांपैकी ४१ टक्के काँग्रेसच्या बाजूने मतदान करतील, तर ठाकरे गट-मनसे यांना २८ टक्के मतं मिळू शकतात. भाजप-शिवसेना महायुतीला केवळ ११ टक्के मुस्लीम मतं मिळण्याचा अंदाज आहे, तर उर्वरित २० टक्के मतं इतर पक्षांकडे जाण्याची शक्यता आहे.






## तेल विहिरीतून वायू गळती

■ वृत्तसंस्था, कोनसीमा, दि. ५ :
आंध्र प्रदेशातील कोनसीमा जिल्ह्यातील राजोल भागात कार्यरत असलेल्या ओएनजीसी तेल विहिरीतून सोमवारी मोठ्या प्रमाणात गॅस गळती झाली. विहिरीवर दुरुस्तीचे काम सुरू असताना ही घटना घडली.

प्रशासनाने खबरदारी म्हणून इरुसुमांडा आणि जवळपासची तीन गावे रिकामी केली. अद्याप मृत्यू किंवा जखमी झाल्याचे कोणतेही वृत्त नाही. गॅसने पेट घेतला आणि विहिरीजवळ मोठ्या ज्वाला उठू लागल्या.

## निवडणुकीत महाराष्ट्राचा उत्तर प्रदेश झाला
# राज ठाकरे यांची टीका



■ **मुंबई :** पश्चिम बंगालमध्ये स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीत उमेदवारांच्या बिनविरोध निवडीस विरोध करीत सर्वोच्च न्यायालयात दाद मागणाऱ्या भाजपाने राज्यातील महापालिका निवडणुकीत सुरु झालेल्या बिनविरोध निवडीबाबत आपली भूमिका स्पष्ट करावी अशी मागणी महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे अध्यक्ष राज ठाकरे यांनी रविवारी येथे केली. शिवसेना(ठाकरे)- महाराष्ट्र नवनिर्माण सेना आणि राष्ट्रवादी(शरद पवार) यांच्या युतीचा मुंबई महापालिका निवडणुकीसाठीच्या वचननाम्याचे प्रकाशन शिवसेना भवनात उद्धव ठाकरे आणि राज ठाकरे यांच्या हस्ते झाले. त्यावेळी ठाकरे यांनी भाजपावर जोरदार टीकास्त्र सोडले. सत्तेचा अमरपट्टा घेऊन आल्याच्या अविर्भावात भाजपाने निवडणुकांच्या बाबतीत महाराष्ट्राचा उत्तर प्रदेश-बिहार केल्याचा आरोप त्यांनी केला. कॉंग्रेसने त्यांच्या काळात हे केले, ते केले. म्हणून आम्ही हे करीत आहोत असे सांगताना सत्ता कधीच कायम नसते. उद्या दुसरे कोणी सत्तेवर आले आणि त्यांनी तुमच्या दामदुप्पट सुरु केले तर मात्र तक्रार करु असा इशाराही ठाकरे यांनी दिला. आपण सत्तेतून कधीच बाहेर होणार नाही हा भाजपचा भ्रम असून तो महापालिका निवडूकीत दूर झाला पाहिजे. पालिका निवडणुकीत बिनविरोध सारखे नवे चुकीचे पायंडे आपण पाडत आहोत याचे भान सत्ताधाऱ्यांनी ठेवायला हवे. सुसंस्कृत महाराष्ट्रात सत्ताधाऱ्यांनी निवडणुकांच्या बाबतीत उत्तर प्रदेश, बिहारची परिस्थिती आणली असून आजवर देशाला दिशा देणाऱ्या महाराष्ट्राचे,येणाऱ्या पुढच्या पिढ्यांचे वाटोळे करणे, जे राजकारणात येऊ इच्छितात त्यांची विचारसरणी बदलणे हे या राज्यासाठी आणि महाराष्ट्राच्या भवितव्यासाठी घातक आहे, अशा शब्दात ठाकरे यांनी सत्ताधारी भाजप आणि शिंदे सेनेवर हल्ला चढवला.

## बाळासाहेबांची भीती वाटते म्हणून पुतळा झाकला का?



■ **मुंबई :** कुलाब्यातील शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे यांचा पुतळा हिरव्या पडद्याने झाकल्याच्या घटनेवर राऊत यांनी तीव्र संताप व्यक्त केला. बाळासाहेबांची भीती देवेंद्र फडणवीस आणि एकनाथ शिंदे यांच्या मनात बसली आहे, म्हणूनच पुतळा झाकला गेला आहे," अशी टीका त्यांनी केली. तसेच ठाण्यातील मनसे आणि शिवसेना उमेदवारांना पोलीस बळाचा वापर करून मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या निवासस्थानी नेले जात असल्याचा व्हिडिओ मनसे नेते अविनाश जाधव, शिवसेनेचे नेते राजन विचारे यांनी समोर आणला असून, हे प्रकरण अत्यंत गंभीर असल्याचे संजय राऊत म्हणालेत. संजय राऊत म्हणाले, ठाण्यामधील व्हिडिओ काल मनसे नेते अविनाश जाधव, शिवसेनेचे नेते राजन विचारे यांनी समोर आणला, हे अत्यंत गंभीर आहे. पोलिस मनसे किंवा शिवसेना उमेदवारांच्या घरात गेले, मग त्यांना पकडून गाडीत टाकून एकनाथ शिंदेंच्या ठाण्यातील घरी आणत आहेत. हे काम पोलिसांना दिले आहे आणि पोलिसही ते काम आपल्या वदीर्ची शान न राखता इमाने इतबारे करत आहेत. किंबुहना पोलिसांचाही नाईलाज असेल, त्यांनाही चंद्रपूर, गडचिरोलीत पाठवण्याच्या धमक्या दिल्या असतील. परंतु, निवडणूक आयोगासमोर हे चित्र आल्यावर ते आता काय करणार? असा सवाल ठाकरे गटाचे नेते आणि खासदार संजय राऊत यांनी केला.

## महापालिका निवडणुकीत बिनविरोध निवडी

**अविनाश जाधवांनी घेतली राज्य निवडणूक आयोगाच्या आयुक्तांची भेट**

■ **मुंबई :** महाराष्ट्रातील महापालिका निवडणुकीत 'बिनविरोध' निवडींचा जो धडाका सत्ताधाऱ्यांनी लावला आहे, त्याविरोधात मनसेने आता 'आरपार'ची लढाई पुकारली आहे. मनसे नेते अविनाश जाधव यांनी आज राज्य निवडणूक आयुक्तांची भेट घेऊन ठाणे आणि कल्याण-डोंबिवलीतील कथित गैरप्रकारांचे व्हिडिओ आणि पुरावे सादर केले. या प्रकरणी आयुक्तांनी तातडीने ठाण्याच्या निवडणूक अधिकाऱ्यांकडून अहवाल मागवला आहे.

शिवाय मनसेने आता मुंबई उच्च न्यायालयात धाव घेतली आहे. राज्य निवडणूक आयोगाच्या आयुक्तांच्या भेटीनंतर अविनाश जाधव यांनी माध्यमांशी संवाद साधला. ते म्हणाले, आम्ही निवडणूक आयुक्तांना ठाण्याची परिस्थित सांगितली आहे. मागील दोन तीन दिवसांत भयानक परिस्थिती आहे. तिथे आरओ ज्यापद्धतीने वागले, पैशांच्या लालसापोटी उमेदवारी गायब करण्यात आले, उपमुख्यमंत्र्यांच्या घराबाहेर उमेदवार जातानाचे व्हिडिओ निवडणूक आयुक्तांना दाखवले. आमच्याकडे असणाऱ्या काही पर्सनल गोष्टीही आम्ही त्यांना दाखवल्या.

## मी मुख्यमंत्री असेपर्यंत योजना बंद होणार नाही : देवेंद्र फडणवीस
# लाडक्या बहिणींना लखपती दीदी बनवणार

■ **महासागर प्रतिनिधी, परभणी, दि. ५ :**
आगामी महापालिका निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर सर्वच राजकीय पक्षांनी आता जोरदार प्रचार सुरू केला आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस हे आज परभणीच्या दौऱ्यावर असताना त्यांच्या सभेत बोलताना लाडकी बहीण योजनेसंदर्भात मोठी घोषणा केली. देवा भाऊ मुख्यमंत्री असेपर्यंत लाडकी बहीण योजना बंद होणार नाही, असे विधान फडणवीसांनी केले आहे.

सभेत बोलताना देवेंद्र फडणवीस म्हणाले, आज या ठिकाणी इतक्या मोठ्या प्रमाणात लाडक्या बहिणी या ठिकाणी उपस्थित आहेत. आपल्याला माहित आहे ज्या वेळेस प्रचंड मोठे बहुमत या भाजपला मिळाले, तर लोक म्हणायला लागले की आता हे लखपती दीदी योजना बंद करणार. पण लक्षात ठेवा योजना बंद झालेली नाही आणि जोपर्यंत देवा भाऊ मुख्यमंत्री आहे तोपर्यंत योजना बंद होणार नाही. आता लाडक्या बहिणींना केवळ लाडक्या बहिणी ठेवायचे नाही, माझ्या लाडक्या बहिणींना लखपती दीदी बनवायचे आहे.



पुढे बोलताना देवेंद्र फडणवीस म्हणाले, महाराष्ट्रात 50 लाख लखपती दीदी झाल्या. मेघना दीदींनी एक लाख लखपती दीदी या परभणीतून केल्या आहेत. आता या वर्षी आपण एक कोटीपर्यंत पोहोचणार आहोत. आपला महापौर जेव्हा या महापालिकेवर बसेल, त्याच्या बरोबर एक वर्षानंतर मी पाहायला येणार आहे आणि त्यावेळी मी केलेल्या कामांचा आढावा तर घेईलच, पहिला आढावा मी हा घेणार की तुम्ही माझ्या किती लाडक्या बहिणींना लखपती केले.

या परभणीच्या विकासाच्या जो आड येईल, त्याला आई प्रभादेवीच्या आशीवार्दाने त्याच ठिकाणी आम्ही नेस्तनाबूत केल्याशिवाय आम्ही राहणार नाही, असा इशारा देवेंद्र फडणवीस यांनी यावेळी दिला. ते म्हणाले, खऱ्या अर्थाने प्रभावतीच्या या नगरीत माझी आपल्या सगळ्यांना विनंती आहे की आता किती वर्ष आपण इतिहासात सांगणार आहोत? आता भविष्य तयार करण्याची वेळ आली आहे. इतिहासात जगणारे, इतिहासातच मारून जातात. इतिहास लक्षात ठेवायचा असतो, इतिहासाचा सन्मान करायचा असतो, पण भविष्याचा मार्ग हा आपल्याला कोरून काढायचा असतो.

## जवाहर नवोदय विद्यालयात
# विद्यार्थिनीचा मृत्यू



■ **महासागर प्रतिनिधी, लातूर, दि. ५ :**
लातूरलगतच्या जवाहर नवोदय विद्यालयात इयत्ता सहावीच्या एका विद्यार्थिनीचा संशयास्पद मृत्यू झाला आहे. शालेय प्रशासनाने हा आत्महत्येचा प्रकार असल्याचा दावा केला आहे. तर मृत मुलीच्या नातेवाईकांनी हा घातपात असल्याचा आरोप केला आहे. पीडित कुटुंबीयांनी आज अचानक लातूर शहरात रास्ता रोको करत दोषींवर कारवाई करण्याची मागणी केली. यामुळे येथील वातावरण चांगलेच तापले आहे.

यासंबंधीच्या माहितीनुसार, अनुष्का किरण पाटोळे असे मृत विद्यार्थिनीचे नाव आहे. ती लातूर शहरालगत असणाऱ्या जवाहर नवोदय विद्यालयात इयत्ता सहावीत शिकत होती. काल तिचा मृतदेह पलंगाला लटकलेल्या स्थितीत आढळून आला. यामुळे एकच खळबळ माजली. ही बातमी लातूर शहरात वाऱ्यासारखी पसरली. त्यामुळे जवाहर नवोदय विद्यालय परिसरात मोठ्या प्रमाणात जमाव जमला होता. मृत विद्यार्थिनीच्या नातेवाईकांनी या शाळेत विद्यार्थ्यांना मारहाण होत असल्याचा आरोप केला आहे. यामुळे ही घटना आत्महत्येची नव्हे तर घातपाताची असल्याचा दावा केला जात आहे. याप्रकरणी एमआयडीसी पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

दुसरीकडे, या घटनेच्या निषेधार्थ आज महिलांनी लातूर शहरातील गांधी चौकात अचानक रास्ता रोको केला. त्यांनी साड्यांची दोरी करत रास्ता रोको केला. यामुळे गाधी चौकातील वाहतूक पूर्णतः ठप्प झाली. चौकात दोन्ही बाजूंनी वाहनांच्या लांबच लांब रांगा लागल्या होत्या. दोषींना आमच्या ताब्यात द्या, आम्ही त्यांना शासन करू, अशी संतप्त मागणी यावेळी महिलांनी केली. या घटनेची माहिती मिळताच पोलिसांनी तत्काळ घटनास्थळी धाव घेतली. त्यांनी आंदोलक महिलांची समजूत काढण्याचा प्रयत्न केला. पण महिलांनी मृत मुलीला न्याय मिळेपर्यंत मागे हटणार नसल्याची भूमिका घेतल्यामुळे वातावरण तंग झाले आहे. परिणामी, पोलिसांनी बळाचा वापर करून आंदोलकांना बाजूला हटवले.

## बहुमजली इमारतीतील फ्लॅटला भीषण आग

■ **महासागर प्रतिनिधी पुणे, दि. ५ :**
बावधन येथील सूर्यदत्ता कॉलेजसमोर असलेल्या विवा हॉल मार्क सोसायटीतील एका बहुमजली इमारतीत सोमवारी दुपारी आग लागल्याची घटना घडली. ग्राऊंड प्लस 11 मजली इमारतीतील फ्लॅट क्रमांक 902 मध्ये ही आग लागली होती.



घटनेची माहिती मिळताच एनडीए अग्निशमन केंद्र, चांदणी चौक येथील अग्निशमन दल तात्काळ घटनास्थळी रवाना झाले. अग्निशामक दलाच्या जवानांनी तात्काळ सर्व साहित्यांशी आग लागलेल्या सोसायटीकडे प्रयाण केले. प्रभारी अधिकारी सुनिल नामे यांच्या मार्गदर्शनाखाली तांडेल चंद्रकांत गावडे, ड्रायव्हर दत्ता गोगावले तसेच पंढरीनाथ उभे, शिवकुमार माने, श्रीधर यादव, मनोज गायकवाड, रमेश थोपटे व राकेश नाईकनवरे या जवानांनी आग विझवण्याचे काम हाती घेतले.

फ्लॅटमध्ये मोठ्या प्रमाणात आग पसरलेली असून जवानांनी रस्सीच्या सहाय्याने होझरील होज आठव्या मजल्यावर नेला. खिडकी तसेच मुख्य दरवाज्यातून पाण्याचा मारा करून आग पूर्णपणे आटोक्यात आणण्यात यश आले. या आगीत फ्लॅटमधील हॉलचे इंटिरिअर, इलेक्ट्रिक वायरिंग, टीव्ही, सोफा, स्टडी रूममधील कपाट, पुस्तके, बेड व खिडक्यांच्या काचा यांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले. इतर दोन खोल्या व स्वयंपाकघरात धुरामुळे रंग खराब झाला.

तसेच वरच्या मजल्यावरील फ्लॅट क्रमांक 902 मध्ये खिडक्यांच्या काचा फुटून स्टडी रूममध्ये किरकोळ झळ पोहोचली. सुदैवाने या घटनेत कोणतीही जीवितहानी झाली नाही. सोसायटीची फायर फायटिंग सिस्टीम बंद असल्याचे निदर्शनास आले असून ती तात्काळ कार्यान्वित करण्याच्या सूचना संबंधितांना देण्यात आल्या. मदतीसाठी आलेली बाणेर येथील फायरगाडी आग आटोक्यात आल्याने परत पाठवण्यात आली. काम पूर्ण करून अग्निशमन वाहने पुन्हा रवाना झाली.

## सहलीसाठी जाणाऱ्या कंपनीच्या बसला भीषण अपघात

■ **महासागर प्रतिनिधी, पुणे, दि. ५ :**
माणगाव तालुक्यातील ताम्हिणी घाट परिसरात झालेल्या भीषण बस अपघातात पुण्यातील भोसरी येथील सावन आयबी प्रा. लि.कंपनीत कार्यरत असलेले कर्मचारी गंभीर जखमी झाले असून, त्यांच्यावर पिंपरी, पुणे येथील डॉ. डी. वाय. पाटील मेडिकल कॉलेज व हॉस्पिटल केंद्रामध्ये तातडीने आवश्यक शस्त्रक्रिया व वैद्यकीय उपचार करण्यात आले आहेत. या ४२ रुग्णांपैकी २७ पुरुष व १५ महिला आहेत. यामध्ये हाडांच्या २५ शस्त्रक्रिया, चेहऱ्यावरील आणि जबड्यांच्या ३ शस्त्रक्रिया आणि ११ रुग्णांवर सामान्य शस्त्रक्रिया व उपचार सुरू आहेत.

# विद्यार्थ्यांवर मधमाश्यांचा हल्ला

■ **महासागर प्रतिनिधी, पुणे, दि. ५ :**
पुण्यातील वेल्हे तालुक्यातील निसर्गरम्य मढेघाट परिसरात ट्रेकिंगसाठी गेलेल्या विद्यार्थ्यांवर अचानक आग्या मोहोळाच्या मधमाशांनी हल्ला केला, ज्यामुळे ट्रेक करणाऱ्यांमध्ये पळापळ सुरू झाली. मढेघाट ते उपंडा असा ट्रेक करणाऱ्या विद्यार्थ्यांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले, मात्र स्थानिक ग्रामस्थांच्या धैयार्मुळे कोणतीही मोठी जीवितहानी झाली नाही. या ट्रेकसाठी खासगी साहसी क्लासच्या माध्यमातून सुमारे ५० हून अधिक विद्यार्थी आणि मार्गदर्शक आले होते.



१४ ते १७ वयोगटातील विद्यार्थ्यांमध्ये मध्यभागी असलेल्या गर्द झाडीतून जात असताना मधमाशांचा हल्ला झाला. या धावपळीत ३५ हून अधिक जण जखमी झाले आहेत. स्थानिकांनी सांगितल्याप्रमाणे, ८ ते १० विद्यार्थी गंभीर जखमी झाले, तर इतर २५ जणांना शरीरावर मधमाशांचे चावे लागले. घटनेची माहिती मिळताच तोरण माची हॉटेलचे मालक अभिजीत भेके यांनी मदतीसाठी सोशल मीडियावर आवाहन केले.

यानंतर केळद गावचे माजी सरपंच रमेश शिंदे आणि इतर स्थानिकांनी कड्यामध्ये अडकलेल्या विद्यार्थ्यांना सुरक्षित बाहेर काढले. जखमी विद्यार्थ्यांना खासगी वाहनांमधून वेल्हे येथील ग्रामीण रुग्णालयात नेण्यात आले. दंश झालेल्या विद्यार्थ्यांना वेदना, चक्कर, उलटी आणि चेहऱ्यावर सूज यासारखी लक्षणे आढळली. ग्रामीण रुग्णालयाचे डॉक्टर ज्ञानेश्वर हिरास आणि त्यांच्या टीमने तातडीने उपचार सुरू केले. अधिक गंभीर २ विद्यार्थ्यांना पुढील उपचारासाठी पुण्यातील खासगी हॉस्पिटलमध्ये पाठवण्यात आले, तर उर्वरित सर्व रुग्णांची प्रकृती सध्या स्थिर आहे.

## सिन्नरमध्ये बिबट्याचा शेतमजुरावर हल्ला
# दोघांचाही विहिरीत पडून मृत्यू



■ **महासागर प्रतिनिधी, नाशिक, दि. ५ :**
नाशिकच्या सिन्नर तालुक्यातील शिवडे येथे रविवारी सकाळी १० वाजता शेतात न्याहारी करत असलेल्या गोरख लक्ष्मण जाधव (४३) या शेतमजुरावर बिबट्याने पाठीमागून हल्ला केला. या वेळी झटापटीदरम्यान कठडा नसल्याने मजूर आणि बिबट्या दोघेही विहिरीत कोसळले. दोघांचाही चाळीस फूट खोल पाण्यात बुडून मृत्यू झाला.

शेतातील महिलांनी आरडाओरड केल्याने इतर मजूर विहिरीभोवती जमले. त्यांनी विहिरीत पाहिले तेव्हा बिबट्या विद्युत पंपाच्या फाउंडेशनवर बसून होता. त्यामुळे बुडणाऱ्या मजुराला वाचवण्यासाठी विहिरीत उतरण्याची कोणाचीही हिंमत झाली नाही. वन विभागाने दुपारी १ वाजेच्या सुमारास पिंजरा सोडून बिबट्याला जेरबंद केले. मात्र, बिबट्याला ठार मारण्याची मागणी ग्रामस्थांनी केली. अखेर दुपारी साडेतीन वाजता गोविंद तुपे यांनी विहिरीत उतरून जाधव यांचा मृतदेह बाहेर काढला.यादरम्यान पिंजरा वारंवार पाण्यात बुडाल्याने नाकातोंडात पाणी जाऊन बिबट्याचाही मृत्यू झाला.

## ३१ कोटींचा 'निकोटीन'चा साठा जप्त

■ **महासागर प्रतिनिधी, पुणे, दि. ५ :**
अन्न व औषध प्रशासन मंत्री नरहरी झिरवाळ यांनी राज्यातील प्रतिबंधित वस्तूंच्या विरोधात कठोर पावले उचलण्याचे आदेश दिल्यानंतर विभागाने राज्यभर जोरदार मोहीम सुरू केली असून, याच धडक कारवाईअंतर्गत पुणे जिल्ह्यातील मावळमधील टाकवे येथील 'मे. सोएक्स इंडिया प्रा. ली.' या कंपनीवर छापा टाकून तब्बल 31 कोटी 67 लाख 21 हजार 987 रुपयांचा विक्रमी मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.

प्रतिबंधित वस्तूंच्या उत्पादनावर बडगा उगारत प्रशासनाने कंपनीच्या संचालक आणि व्यवस्थापकाविरोधात गुन्हा दाखल केला असून, मंत्र्यांच्या कडक भूमिकेमुळे आणि सातत्याने होणाऱ्या आढाव्यामुळे अन्न व औषध प्रशासन विभागाची ही कारवाई अधिक तीव्र झाली आहे.

## शरदचंद्र पवार राष्ट्रवादी काँग्रेसला मिळाला प्रभारी अध्यक्ष
# पुण्यात श्रीकांत पाटील यांची नेमणूक

■ **महासागर प्रतिनिधी पुणे, दि. ५ :**
राष्ट्रवादी कॉंग्रेस शरदचंद्र पवार पक्षाच्या पुणे शहर प्रभारी अध्यक्षपदी श्रीकांत विश्वनाथ पाटील यांची नेमणूक करण्यात आली आहे. तसेच, विशाल विलासराव तांबे यांची पुणे शहर निवडणूक समन्वयकपदी नियुक्ती करण्यात आली आहे. खासदार सुप्रिया सुळे यांनी ही माहिती दिली असून, पक्षाचे प्रदेशाध्यक्ष शशिकांत शिंदे यांनी हा निर्णय घेतला आहे.

या नियुक्त्या माजी महापौर प्रशांत जगताप यांनी शहराध्यक्षपदाचा राजीनामा दिल्यानंतर झाल्या आहेत. मनपा निवडणुकीपूर्वी अजित पवार यांच्या राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्षासोबत आघाडी होणार असल्याने जगताप यांनी पदाचा राजीनामा देत कॉंग्रेस पक्षात प्रवेश केला होता. विशाल तांबे हे पक्षाचे ज्येष्ठ आणि अनुभवी माजी नगरसेवक आहेत. त्यांनी यंदा निवडणूक न लढवता पक्ष संघटनेत काम करण्याचा निर्णय घेतला होता, शहर निवडणूक समन्वयकपदी नेमणूक करण्यात आली आहे.

## आर्थिक वादातून तरुणाला विवस्त्र करून मारहाण

**गोळी झाडून खुनाचा प्रयत्न; ९ जणांविरुद्ध गुन्हा**

■ **महासागर प्रतिनिधी, पुणे, दि. ५ :**
आर्थिक वादातून एका तरुणाला विवस्त्र करून बेदम मारहाण करण्यात आली. आरोपींनी त्याच्यावर पिस्तुलातून गोळीबार करत खुनाचा प्रयत्न केला. ही घटना पुण्यातील कात्रज-कोंढवा रस्त्यावर घडली असून, याप्रकरणी नऊ जणांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. फरार आरोपींचा शोध सुरू आहे.पोलिसांनी संबंधित परिसरातील सीसीटीव्ही फुटेज तपासणी सुरू केली आहे.

याप्रकरणी एका ३१ वर्षीय तरुणाने येवलेवाडी पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे. तक्रारदार वाहन खरेदी-विक्रीचा व्यवसाय करतो आणि कोंढवा परिसरात राहतो. आरोपी त्याच्या ओळखीचे आहेत. आयुष कामठे, अभि म्हस्के, अभि पाटील, मंगेश माने, कौशल उर्फ ऋषी मोरे यांच्यासह नऊ जणांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

आरोपींनी तरुणाला मारहाण करून त्याचे मोटारीतून अपहरण केले. रात्री अकराच्या सुमारास त्याला कात्रज-कोंढवा रस्त्यावरील गोकुळनगर परिसरातील मोकळ्या मैदानात नेण्यात आले. मैदानात तरुणाला विवस्त्र करून बेदम मारहाण करण्यात आली. त्याला शिवीगाळ करत ही चित्रफीत समाजमाध्यमात प्रसारित करण्याची धमकी दिली. आरोपी मंगेश माने याने मोटारीत ठेवलेल्या पिस्तुलाचा धाक तरुणाला दाखवला.

## ठाकरे गटाचे ४० स्टार प्रचारक जाहीर

■ **महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. ५ :**
शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाने आज आपल्या 40 स्टार प्रचारकांची यादी जाहीर केली. हे प्रचारक मुंबईसह राज्यभरातील 29 महापालिकांच्या निवडणुकीसाठी भाजप प्रणित महायुतीच्या अजस्त्र प्रचार यंत्रणेचा नेटाने सामना करतील. दरम्यान, आज उद्धव ठाकरे व मनसे अध्यक्ष राज ठाकरे यांची विक्रोळीत मुंबई महापालिकेसाठी आज पहिली संयुक्त सभा होणार आहे. त्यात हे दोन्ही बंधू मुंबई महापालिकेचा गड कोणत्याही स्थितीत सर करण्यासाठी आसुसलेल्या भाजपवर जोरदार हल्ला चढवण्याची शक्यता आहे.

मुंबईसह राज्यातील 29 महापालिकांची निवडणूक येत्या 15 जानेवारीला होणार आहे. त्यानंतर दुसऱ्या दिवशी म्हणजे 16 तारखेला मतमोजणी होऊन निकाल घोषित होणार आहेत. या पार्श्वभूमीवर ठाकरे गटाने निवडणुकीच्या प्रचारासाठी आपल्या पक्षाच्या 40 स्टार प्रचारकांची यादी जाहीर केली आहे. या यादीत उद्धव व आदित्य ठाकरे यांच्यासह खासदार संजय राऊत, अरविंद सावंत, आमदार अनिल परब, भास्कर जाधव, अंबादास दानवे, अनिल देसाई, विनायक राऊत, सुषमा अंधारे, वरुण सरदेसाई, आनंद दुबे, आदेश बांदेकर आदी नेत्यांच्या नावांचा समावेश आहे. या प्रत्येकावर एक विशिष्ट जबाबदारी देण्यात आली आहे.

दुसरीकडे, शिवसेना ठाकरे गटाचे पक्षप्रमुख उद्धव ठाकरे व मनसे अध्यक्ष राज ठाकरे यांची आज पहिली संयुक्त सभा विक्रोळी येथे होणार आहे. महापालिका निवडणुकीसाठी ठाकरे बंधूंच्या जवळपास 7 ते 8 संयुक्त सभा होणार आहेत. त्यातील ही पहिली सभा असणार आहे. या निवडणुकीत ठाकरे बंधू उद्धव व राज ठाकरे यांना एकत्रितपणे भेटीही देणार आहेत.

**स्टार प्रचारकांची यादी**

उद्धव ठाकरे
आदित्य ठाकरे
संजय राऊत
चंद्रकांत खैरे
भास्कर जाधव
सुभाष देसाई
अनंत गीते
अरविंद सावंत
अनिल देसाई
विनायक राऊत
अनिल परब
ओमराजे निंबाळकर
अंबादास दानवे
सुषमा अंधारे
राजन विचारे
सुनील प्रभू
आदेश बांदेकर
वरुण सरदेसाई
रवींद्र मिरलेकर
नितीन पाटील
राजकुमार बाफना
प्रियंका चतुर्वेदी
सचिन अहिर
लक्ष्मण वाढले
मनोज जामसुतकर
नितीन देशमुख
संजय जाधव
ज्योती ठाकरे
जयश्री शेळके
जान्हवी सावंत
शरद कोळी
सुनील शिंदे
हारुन खान
सिद्धार्थ खरात
वैभव नाईक
आनंद दुबे
अशोक तिवारी
राम साळगावकर
प्रियांका जोशी
अनिश गाढवे

# महाराष्ट्रात सेमीकंडक्टर उत्पादनाची मोठी क्षमता

## व्हीएलएसआय सोसायटीच्या आंतरराष्ट्रीय परिषदेत अध्यक्ष डॉ. गुप्ता यांचे प्रतिपादन

■ **महासागर प्रतिनिधी पुणे, दि. ५ :**
संगणकापासून कृत्रिम बुद्धिमत्तेपर्यंत सर्व तंत्रज्ञानामध्ये अनिवार्य असलेल्या सेमीकंडक्टर उत्पादनामध्ये देशात आघाडी घेण्याची क्षमता महाराष्ट्राकडे आहे. व्हेरी लार्ज स्केल इंटिग्रेटेड सोसायटीचे अध्यक्ष डॉ. सत्या गुप्ता यांनी ही माहिती दिली. या संदर्भात सर्व पातळ्यांवर तयारी सुरू असल्याचेही त्यांनी नमूद केले.



सेमीकंडक्टर उत्पादन क्षेत्राला प्रोत्साहन देण्यासाठी कार्यरत असलेल्या व्हीएलएसआय सोसायटीची '३९ वी व्हीएलएसआय डिझाइन आंतरराष्ट्रीय परिषद २०२६' आणि '२५ वी आंतरराष्ट्रीय एम्बेडेड सिस्टम्स परिषद' पुण्यात आयोजित करण्यात आली आहे. या परिषदेला देशभरातून अडीच हजारांहून अधिक प्रतिनिधी आणि साडेपाचशे विद्यार्थी उपस्थित आहेत. परिषदेच्या उद्घाटन सत्रानंतर डॉ. गुप्ता यांच्यासह सोसायटीचे पदाधिकारी शैलेश परब, रणजित येवले आणि संजय घोरपडे यांनी पत्रकारांशी संवाद साधला.

डॉ. गुप्ता यांनी सांगितले की, सध्याच्या काळात सर्व क्षेत्रांत उपयोगात आणल्या जाणाऱ्या तंत्रज्ञानामध्ये सेमीकंडक्टर हा घटक अनिवार्य आहे. महाराष्ट्रात सेमीकंडक्टर उत्पादन क्षेत्रासाठी कुशल मनुष्यबळ, पायाभूत सुविधा आणि अन्य सर्व आवश्यक घटक उपलब्ध आहेत. या क्षेत्राला गती देण्यासाठी उद्योग, शिक्षण संस्था आणि शासनाने एकत्रित प्रयत्न करणे आवश्यक असून, त्या दृष्टीने सोसायटीने पुढाकार घेतला आहे.

केंद्र सरकारबरोबरच आसाम, गुजरात, मध्य प्रदेश या राज्यांचे सेमीकंडक्टर उत्पादन क्षेत्राशी संबंधित धोरण निश्चित झाले आहे. महाराष्ट्रात हे धोरण निश्चित करण्याचे काम सुरू असून, सरकारकडून याबाबत अनुकूल प्रतिसाद मिळत आहे. महाराष्ट्रात या क्षेत्रासाठी सर्वाधिक अनुकूलता असल्याचे डॉ. गुप्ता यांनी अधोरेखित केले.

सेमीकंडक्टर उत्पादन क्षेत्रात आयटीआय प्रशिक्षित तंत्रज्ञांपासून पदविका आणि पदवीधारक अभियंत्यांपर्यंत सर्वांना रोजगाराच्या संधी आहेत. सेमीकंडक्टर डिझाइन आणि प्रत्यक्ष उत्पादन यासाठी सध्या अनेक शिक्षण संस्थांमधून प्रशिक्षण दिले जात आहे. मात्र, या नव्याने उदयाला येत असलेल्या क्षेत्राबाबत विद्यार्थी आणि पालकांमध्ये अद्याप पुरेशी माहिती नाही. या क्षेत्रात सॉफ्टवेअर क्षेत्रापेक्षाही अधिक आकर्षक संधी उपलब्ध असल्याबद्दलची जाणीव शालेय स्तरापासूनच विद्यार्थी आणि पालकांना करून देणे आवश्यक आहे.

## निधन वार्ता
### जनाबाई दुधारे



■ **मुंबई :** जनाबाई सोनबाराव दुधारे यांचे वृद्धापकाळाने भोकर येथे निधन झाले. मृत्युसमयी त्या 85 वर्षांच्या होत्या. त्यांची अंत्ययात्रा दिनांक 5 जानेवारी रोजी डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर चौक जवळ भोकर येथील यांच्या राहत्या घरून निघाली.

स्वप्निल दुधारे यांच्या त्या आजी होत. एडवोकेट दिलीप सोनबाराव दुधारे यांच्या मातोश्री होत्या. त्यांच्या पश्चात पाच मुले, स्नुषा, नातवंडे व मोठा आप्तपरिवार आहे. भोकर येथे अंत्यसंस्कार पार पडला.

# एमपीएससीच्या पूर्वपरीक्षेकडे १ हजार ८३७ उमेदवारांची पाठ

**अकोला :** नगर परिषद, पंचायत निवडणुकीमुळे नगर लांबणीवर पडलेली नागरी सेवा संयुक्त पूर्व परीक्षा अखेर रविवारी पार पडली. मात्र या परीक्षेला एक हजार ८३७ परीक्षार्थींनी दांडी मारली. दाकळी ११ ते दुपारी १२ वाजता दरम्यान जिल्ह्यातील २१ उपकेंद्रांवर परीक्षा आयोजित करण्यात आली. परीक्षेला सहा हजार ३५२ परीक्षार्थी प्रविष्ठ होते. महाराष्ट्र लोकसेवा आयोगातर्फे घेण्यात येणारी महाराष्ट्र गट ब अराजपत्रित सेवा संयुक्त पूर्वपरीक्षा २१ डिसेंबरला होणार होती. जिल्हा पातळीवर या परीक्षेची संपूर्ण जबाबदारी जिल्हाधिकारी व महसूल विभागाकडे असते. मात्र २१ डिसेंबर रोजी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीची मतमोजणी होती. त्यामुळे जिल्हाधिकारी व इतर अधिकारी या मतमोजणीत व्यस्त होते. त्यामुळे ही परीक्षा पुढे ढकलण्याची घोषणा केली. अखेर ही परीक्षा ४ जानेवारी रोजी झाली. परीक्षेमुळे सर्व उपकेंद्रांवर कायदा व सुव्यवस्था अबाधित राखण्यासाठी सकाळी ६ वाजतापासून परीक्षा उपकेंद्रांच्या आतील संपूर्ण व बाहेरील १०० मीटर परिसरात प्रतिबंधात्मक आदेश लागू करण्यात आलाहोता. परीक्षेला सहा हजार ३५२ परीक्षार्थी प्रविष्ठ झाले होते. त्यापैकी चार हजार ५१५ परीक्षार्थी परीक्षेला उपस्थित तर एक हजार ८३७ परीक्षार्थी अनुपस्थित होते. परीक्षा शांततेर पार पडावी यासाठी परीक्षा नियंत्रक म्हणून निवासी उपजिल्हाधिकारी जबाबदारी सांभाळली.

# नरनाळा महोत्सवामुळे पर्यटनाला मिळणार चालना



**अकोला :** सातपुड्यात वसलेल्या मेळघाटचे वनवैभव, आदिम संस्कृतीचे दर्शन घडविण्यासाठी जिल्ह्यात नरनाळा महोत्सव दि. ३० जानेवारी ते दि. १ फेब्रुवारी दरम्यान घेण्याचे प्रशासनाचे नियोजन आहे. या महोत्सवामुळे पर्यटनाला चालना मिळेल, असा विश्वास वनपर्यटनप्रेमी, कलावंत, अभ्यासकांकडून व्यक्त होत आहे. अकोला जिल्ह्यातील अकोट तालुक्याच्या उत्तरेला शहानूर या छोट्याश्या गावाला लागून सातपुड्याच्या डोंगरात असलेला नरनाळा किल्ला आहे. या ऐतिहासिक किल्ल्याकडे पर्यटकांचे लक्ष वेधण्यासाठी महोत्सव आयोजनाची संकल्पना पुढे आली. अकोला येथील कलावंत प्रदीप गुरुखुद्दे यांनी ही मागणी लावून धरली. स्थानिक कलावंत, पर्यटनप्रेमी कार्यकर्त्यांची मागणी लक्षात घेऊन दि. २६ जानेवारी ते २८ जानेवारी २००८ दरम्यान नरनाळा महोत्सवाचे पहिले आयोजन करण्यात आले. स्वयंसेवी संस्थांच्या सहकार्यातून हा महोत्सव साजरा झाला. पुढे हा महोत्सव काही कारणांमुळे होऊ शकला नाही. मात्र, आता तो पुन्हा उत्साहाने साजरा करण्यात येणार असून, ऐतिहासिक वारसा व समृद्ध वन्यजीवन लाभलेला हा किल्ला महोत्सवाच्या माध्यम ातून अनुभवण्याची संधी सर्वांना मिळणार आहे.

नरनाळा महोत्सवात पर्यटकांसाठी वनपर्यटन, निसर्ग अभ्यास, वनस्पती अभ्यास, पक्षी, प्राणी यांची ओळख, साहसी क्रीडा प्रकार, नौकाविहार अशी अनेक आकर्षणे आहेत. वनपर्यटनाबरोरच साहसी क्रीडा प्रकार आणि नैसर्गिक आपत्तीच्या वेळी शोध व बचाव कार्य प्रशिक्षण आदी महत्वाच्या बाबी निसर्गप्रेमी व विद्यार्थ्यांसाठी मोलाच्या ठरत असतात. यातून स्थानिक आदिवासी बांधवांना रोजगारही मिळतो.

नरनाळ्याविषयी सांगताना अभ्यासक कलावंत प्रदीप गुरूखुद्दे म्हणतात की, शहानूर हे गाव नरनाळ्याच्या पायथ्याशी एक टुमदार छोटेसे गाव आहे, या गावाच्या सभोवताली वनसमृद्ध व निसर्गसुंदर परिसर हा सातपुडा पर्वताच्या रांगांनी वेढलेला आहे. नरनाळा किल्ल्यावरुन निसर्गाकडे बघितले तर बाजूला सर्वत्र पर्वतांनी किल्ल्याला माळ घातल्याचा भास होतो. हा परिसर पर्यटकांचे व निसर्ग अभ्यासकांचे मनमोहून टाकणारा आहे. नरनाळ्याची पहिली तटबंदी पांडवांचे वंशज सम्राट नरेंद्रपुरी यांनी बांधली, असे सांगितले जाते. किल्ल्याचे क्षेत्रफळ ३९३ एकराचे असून परकोटाचा परीघ जवळपास २७ मैल आहे. किल्ल्याची उंची जवळपास ३ हजार १५० फूट असून त्याठिकाणी काळ्याशार दगडाच्या प्रचंड ऐतिहासिक इमारती, २२ भव्य दरवाजे आणि ३६६ अजस्त्र बुरुज असा ऐसपैस पसरलेला किल्ला आहे.

नरनाळा किल्ल्यातील तटबंदी, बुरुज आदींची काही प्रमाणात पडझड झालेली असली तरी म हाकाली दरवाजाचे सौंदर्य आजही ताजेतवाने वाटते. या किल्ल्यावर नरनाळा, जाफराबाद आणि तेलियागड अशा तीन भागावर एकूण २२ तलाव आहेत. या तलावांमध्ये पावसाळ्याचे पाणी साठविण्याची सोय कलेली आहे.

त्या २२ तलावांपैकी ६ तलावांत भर उन्हाळ्यातही पाणी असते, त्यामुळे या ठिकाणी वन्य प्राण्यांची ये जा असते. या किल्ल्यावर त्या काळात पाणीपुरवठ्याची सोय होती. त्या पाणीपुरवठा योजनेचे अवशेष मन थक्क करणारे आहेत. राणीमहाल आणि इतर भागात पाणी कसे पोहोचायचे ते आजही पहायला मिळते. महाराष्ट्र शासनाने नरनाळा परिसर अभयारण्य परिसर म्हणून घोषित केलेला आहे, अकोट वन्यजीव विभागाच्या उपवनसंरक्षक कार्यालयाच्या नियंत्रणात हा परिसर असून हा परिसर १३.३६ चौ. किलो मीटरपर्यंत सातपुडा पर्वतांच्या टेकड्यांमध्ये व्यापलेला आहे.

## नरनाळ्याला कसे पोहचाल ?

- नरनाळा किल्ला हा अकोट शहरापासून २४ व अकोला शहरापासून सुमारे ६९ किलोमीटर अंतर आहे.
- अकोला येथून अकोट मार्गे शहानूर – नरनाळा असे जाता येते.
- शहानूर या गावी असलेल्या प्रवेशद्वाराजवळ वाहन पार्किंग स्थळी ठेवणे आवश्यक आहे. खाजगी वाहन किल्ल्यावर नेण्यास मनाई आहे.
- नरनाळा किल्ल्यावर जाण्यासाठी जिप्सीची व्यवस्था आहे. गाईडही मिळतो. राहण्यासाठी वन विभागाचे 'इको–टुरिझम' कॉटेजेसही आहेत.

# सैन्याधिकाऱ्यांच्या पूर्वप्रशिक्षणासाठी १३ जानेवारीला मुलाखती

**■अकोला,दि ५ (प्रतिनिधी)■**

सैन्यदल, नौदल व वायुदलात अधिकारी पदावर भरती होण्यासाठी सेवा निवड मंडळाच्या (एसएसबी) परीक्षेची तयारी नाशिक येथील छात्रपूर्व प्रशिक्षण केंद्राकडून करून घेतली जाते.

नवे प्रशिक्षण सत्र लवकरच सुरू होत असून, इच्छूकांनी अकोला येथे जिल्हा सैनिक कल्याण कार्यालयात १३ जानेवारीला सकाळी १० वा. उपस्थित राहण्याचे आवाहन जिल्हा सैनिक कल्याण अधिकारी मेजर आनंद पाथरकर यांनी केले आहे.नाशिक रोड येथील छात्रपूर्व प्रशिक्षण केंद्रात १९ जानेवारी ते ३ एप्रिल या कालावधीत प्रशिक्षण सत्र क्र. ६६ होईल. इच्छूक युवक व युवतींनी सैनिक कल्याण विभागाच्या महासैनिक (www. mahasainik.maharashtra. gov.in ) संकेतस्थळावर नोंद करून किंवा ९७५६०७३३०६ वर संबंधित प्रवेशपत्र व परिशिष्टांची चेकलिस्ट यांचे अवलोकन करून त्याची प्रत भरून मुलाखतीला येताना सोबत आणावी. उमेदवार कम्बाईड डिफफेन्स सर्व्हिसेस परीक्षा किंवा नॅशनल डिफफेन्स अकॅडमी परीक्षा उत्तीर्ण व एसएसबी मुलाखतीस पात्र झालेला असावा किंवा एनसीसीचे सी प्रमाणपत्र ए किंवा बी ग्रेडमध्ये उत्तीर्ण, तसेच एनसीसी गट मुख्यालयाने एसएसबीसाठी शिफारस केलेली असावी किंवा टेक्निकल ग्रॅज्युएट कोर्ससाठी एसएसबी मुलाखतीचे कॉललेटर असावे किंवा युनिव्हर्सिटी प्रवेश योजनेसाठी एसएसबी कॉल लेटर असावे किंवा एसएसबीसाठी शिफारस केलेल्या यादीत नाव असावे.

अधिक माहितीसाठी प्रभारी अधिकारी, छात्रपूर्व प्रशिक्षण केंद्र, नाशिक रोड यांच्या training.ctcnashik@ gmail.com किंवा दूरध्वनी क्र. २५३–२४५१०३२ किंवा व्हाटसअप क्र. ९१५६०७३३०६ वर कार्यालयीन वेळेत संपर्क साधावा.

# अकोला महानगरपालिकेच्या विविध शाळेंच्या विद्यार्थ्यांव्दारे रॅलीच्या माध्यमातून मतदार जनजागृती

**■अकोला,दि ५ (प्रतिनिधी)■**



अकोला महानगरपालिका सार्वत्रिक निवडणूक २०२५–२६ अनुषंगाने अकोला महानगरपालिका क्षेत्रात मतदान जनजागृती करण्यासाठी मनपा आयुक्त तथा प्रशासक डॉ.सुनिल लहाने यांच्या आदेशान्वये तसेच मनपा अतिरिक्त आयुक्त सुमेध अलोने यांच्या मार्गदर्शनात विविध कार्यक्रमांचे नियोजन करण्यात आले असून या अनुषंगाने आज दि. ५ जानेवारी २०२६ रोजी अकोला महानगरपालिकेच्या विविध शाळांमध्ये विद्यार्थ्यांव्दारे मतदान जनजागृती रॅली, काढून शाळापरिसरांमध्ये मतदान जनजागृती करण्यात आली आहे. या रॅलींच्या माध्यमातून नागरिकांमध्ये मतदानाचे महत्त्व, लोकशाहीतील सहभाग आणि जबाबदार मतदाराची भूमिका याबाबत जागृत करण्यात येत आहे, तसेच निवडणूक जनजागृतीचे नोडल अधिकारी तथा शिक्षणाधिकारी हरिशचंद्र इटकर यांच्या सक्रिय सहभागातून व नियोजनबद्ध पद्धतीने हे जनजागृती कार्यक्रम प्रभावीपणे राबवून जनजागृती करण्यात येत आहेत. आजच्या जनजागृती रॅलीमध्ये पी. एम. श्री मनपा सेमी इंग्रजी मुलांची शाळा क्र. ७, रामदास पेठ, अकोला, मनपा उर्दू मुलांची शाळा क्र. ७, नायगाव.

# तुषार मानकरच्या टीमने पटकवला प्रथम क्रमांक

**■अकोला,दि ५ (प्रतिनिधी)■**



युनिव्हर्सल कोचिंग क्लासच्या वतीने शाळा स्तरावर क्रिकेटच्या सामन्यांचे कुंभारी येथे आयोजन करण्यात आले होते त्या मध्ये तुषार मानकर कॅप्टन असलेल्या टीमने प्रथम क्रमांक पटकाविले क्रिकेट सामन्यांवर आपले नाव कोरले व नेत्र दीपक कामगिरी करत क्रिकेट सामन्यांमध्ये प्रथम क्रमांक पटकावीत सामन्याची रंगत वाढवली शाळास्तरीय क्रिकेट सामन्यांमध्ये छोट्या विद्यार्थ्यांच्या टीमने दैदीप्यमान कामगिरी केल्याने सामना पाहण्यासाठी आलेल्या प्रेक्षकांनी मानकर च्या टीमचे टाळ्यांच्या गजरात कौतुक केले व विद्यार्थ्यांना प्रोत्साहन दिले या क्रिकेट टीमचा कर्णधार हा बोरगाव वैराळे या गावचा रहिवाशी असून त्यांचे वडील विठ्ठल नागोराव मानकर हे
खाजगी नौकरीच्या निमित्ताने सध्या शिवर येथे वास्तव्यास आहेत . त्यांचा मुलगा तुषार विठ्ठल मानकर हा शाळा स्तरावर असलेल्या क्रिकेट मॅच टीमचा कर्णधार होता. त्याच्या टीमने प्रथम क्रमांक पटकावीत बोरगाव वैराळे या छोट्याशा गावाचं नाव अकोला जिल्हास्तरावर चमकविले आहे. त्याच बोरगाव वैराळे परिसरात अभिनंदन होत आहे!

# दिव्यांग प्रेरणा पुरस्कारासाठी अर्ज मागविले

**■अकोला,दि ५ (प्रतिनिधी)■**

जिल्हास्तरीय दिव्यांग प्रेरणा पुरस्कारासाठी दि. १४ जानेवारीपर्यंत अर्ज मागविण्यात आले आहेत.दिव्यांग व्यक्ती कार्यकर्ता, तसेच दिव्यांग व्यक्तींसाठी कार्य करणारी संस्था यांना स्वतंत्रपणे जिल्हास्तरीय पुरस्कार दिला जाईल. पात्र व्यक्ती व संस्थांनी दि. १४ जानेवारीस सायं. ५ पर्यंत जिल्हा दिव्यांग सक्षमीकरण अधिकारी, डॉ. बाबासाहेब आंबेडकर सामाजिक न्याय भवन, पोलीस वसाहतीच्या बाजूला, अकोला येथे अर्ज सादर करण्याचे आवाहन जिल्हा दिव्यांग सक्षमीकरण अधिकारी डॉ. तुषार जाधव यांनी केले आहे.

# विद्यार्थ्यांव्दारे मतदान जनजागृतीसाठी प्रभात फेरी

**■अकोला,दि ५ (प्रतिनिधी)■**



अकोला महानगरपालिका सार्वत्रिक निवडणूक २०२५–२६ अनुषंगाने अकोला महानगरपालिका क्षेत्रात मतदान जनजागृती करण्यासाठी मनपा आयुक्त तथा प्रशासक डॉ.सुनिल लहाने यांच्या आदेशान्वये तसेच मनपा अतिरिक्त आयुक्त सुमेध अलोने यांच्या मार्गदर्शनात विविध कार्यक्रमांचे नियोजन करण्यात आले असून या अनुषंगाने आज दि. ५ जानेवारी २०२६ रोजी अकोला म हानगरपालिकेच्या मनपा उच्च प्राथमिक मराठी शाळा क्रं. १९ व मनपा उच्च प्राथमिक हिंदी बालक शाळा क्रं. ८ मधील विद्यार्थ्यांव्दारे शाळा परिसरामध्ये मतदार जनजागृती पर प्रभात फेरी काढण्यात आली.

मनपाच्या दोन्ही शाळांच्या विद्यार्थ्यांव्दारे हरिहरपेठ परिसरात मतदार जनजागृती करिता प्रभात फेरी काढण्यात आली. यावेळी इयत्ता ५ वी आणि ६ वी तील विद्यार्थ्यांनींनी सावित्रीबाई फुले यांची वेशभूषा करून प्रत्येक चौकात ङ्गमी सावित्री बोलते'' ही नाविन्यपूर्ण मतदान जनजागृती पर नाटिका सादर केल्या. सदर प्रभात फरीची सुरूवात म नपा निवडणूक जनजागृतीचे नोडल अधिकारी हरिश्चंद्र इटकर यांच्या शुभहस्ते प्रभात फेरीला झेंडी दाखवून करण्यात आली. याप्रसंगी शाळेच्या मुख्याध्यापिका कु. रजनी निवाने, प्रभारी मुख्याध्यापक मनोज बोचरे यांच्या संकल्पनेतून या कार्यक्रमाला दिशा देण्यात आली. या कार्यक्रमात प्रमुख अतिथी म्हणून रविभाऊ सुरजुसे, संजय खराटे, अशोक बुलबुले, सुवर्णा शिरसाट, कमल वानखडे, मीनाक्षी भुरे, कु. भारती परशल्लू, सुभाष मडके इत्यादींची उपस्थिती होती.

# निवडणूक आणि पत्रकारांच्या भूमिकेवर मंथन होणार

## मतदार जनजागृती व पत्रकार कार्यशाळेचा विशेष उपक्रम

**■अकोला,दि ५ (प्रतिनिधी)■**

अकोला महानगर पालिका, श्री शिवाजी महाविद्यालय आणि अकोला श्रमिक पत्रकार संघ, अकोलाच्या संयुक्त विद्यमाने मराठी पत्रकार दिनानिमित्त मतदार जनजागृती व पत्रकार कार्यशाळा आयोजित करण्यात आली आहे. या उपक्रमात निवडणूक आणि पत्रकारांच्या भूमिकेवर देखील मंथन होणार आहे.महापालिका निवडणुकीची रणधुमाळी सुरू आहे. या पार्श्वभूमीवर मतदार जनजागृती होऊन मतदानाच्या टक्केवारीत वाढ होण्यासाठी अकोला श्रमिक पत्रकार संघटनेने पुढाकार घेतला. अकोला महापालिका आणि श्री शिवाजी महाविद्यालयाला सोबत घेऊन मराठी पत्रकार दिनानिमित्त विशेष उपक्रम राबवला जाणार आहे.

श्री शिवाजी महाविद्यालयातील वसंत सभागृहात ६ जानेवारीला सकाळी १० वाजता होणाऱ्या कार्यक्रमाला उद्घाटक म्हणून महापालिका आयुक्त तथा निवडणूक अधिकारी डॉ. सुनील लहाने, तर प्रमुख वक्ते म्हणून जिल्हा माहिती अधिकारी हर्षवर्धन पवार उपस्थित राहतील. ते निवडणूक प्रक्रिया आणि पत्रकारांची भूमिका या विषयावर संबोधित करतील. श्री शिवाजी महाविद्यालयाचे प्रभारी प्राचार्य डॉ. आशिष राऊत यांच्या अध्यक्षतेखालील कार्यक्रमाला शिक्षणाधिकारी तथा मतदार जनजागृती अभियानाचे नोडल अधिकारी हरिश्चंद्र इटकर यांची प्रामुख्याने उपस्थिती राहील. या कार्यक्रमाला पत्रकार, सामाजिक कार्यकर्ता, विद्यार्थी व सुजाण नागरिकांनी उपस्थित राहण्याचे आवाहन केले आहे.



# सावित्रीबाईच्या विचारांचा अंगीकार हिच खरी आदरांजली : डॉ. शरद गडाख



■अकोला,दि ५ (प्रतिनिधी)■

आधुनिक तंत्रज्ञानाच्या प्रभावी वापराने संपूर्ण जग एक खेडं होत आता कवेत आलं मात्र माणसं अजुनही विखूरलेली असून जात-पात, धर्म-पंथ, गरीब-श्रीमंत, लहान-मोठा आदी पगड्यात गुरफटला आहे मात्र या जोखडातून मुक्त होत माणूस म्हणून निःस्वार्थ भावनेने परस्पराच्या सुखदुःखात सहभागी होत एकसंघ मानवजातीची निर्मिती होणे काळाची गरज असल्याचे रोखठोक प्रतिपादन श्रीमती कोकिळाबाई गावंडे महिला महाविद्यालय दर्यापूरच्या मराठी विभागाचे प्रमुख प्रा. डॉ. हरिदास देविदास आखरे यांनी केले.

विद्यार्थी कलन अधिकारी कार्यालय डॉ. पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठ, अकोलाद्वारे आयोजित क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांच्या जयंती दिनाच्या कार्यक्रमाचे प्रसंगी प्रमुख अतिथी म्हणून कृषी महाविद्यालय अकोलाच्या समिती सभागृहात आयोजित विशेष कार्यक्रमाचे प्रसंगी उपस्थित प्राध्यापकवृंद तथा विद्यार्थ्यांना संबोधित करताना ते बोलत होते. आपल्या अतिशय अभ्यासपूर्ण विवेचनातून प्रा. आखरे यांनी सावित्रीबाई फुले तथा ज्योतिबा फुले यांचा शैक्षणिक सामाजिक तथा वाङमयी जीवन प्रवास, आजच्या युगात त्यांच्या कार्याची फलश्रुती अतिशय सहजतेने उलगडत सर्वांच्या मनाचा ताबा घेतला. त्या काळातील सावित्रीबाई फुले यांच्या संकल्पना किती वास्तविक होत्या याचे यथार्थ दाखले सुद्धा प्रा. आखरे यांनी आपल्या संबोधनात देत उपस्थितांच्या अंगावर शहारे तर डोळ्यात पाणी आणले व आजच्या परिस्थितीत प्रत्येकाला आपल्या सामाजिक जबाबदारीची जाणीव देखील करून दिली. तर जागतिकीकरणाच्या या स्पर्धात्मक युगात भारतीय विद्यार्थ्यांनी राष्ट्रीय तथा आंतरराष्ट्रीय स्तरावर मिळिवलेले मानाचे स्थान अभिमानास्पद असून गत काही दशकांमधील मुलींचा शिक्षण क्षेत्रासह व्यावसायिक तथा सामाजिक क्षेत्रातील दबदबा क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांच्या योगदानाचीच पावती म्हणावी लागेल असे प्रतिपादित करताना डॉ. पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठ, अकोलाचे कुलगुरू डॉ. शरद गडाख यांनी आपल्या अध्यक्षीय मनोगतात सावित्रीबाईच्या विचारांचा अंगीकार हीच त्यांना खरी श्रद्धांजली असल्याचे अधोरेखित केले.

## शिवसेना मुख्य नेता एकनाथ शिंदे यांचा अकोला दौरा निश्चित



■अकोला,दि ५ (प्रतिनिधी)■

शिवसेना उमेदवारांच्या प्रचारासाठी शिवसेना मुख्य नेता व उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांची बुधवार, ७ जानेवारी रोजी जुने शहरातील आंबेडकर मैदानावर सभा आहे.

या सभेत जुने शहरातील शिवसेना उमेदवारांचा प्रचार होणार आहे. शिवसेना उमेदवाराच्या प्रचारासाठीची तयारी सुरु झाली असून त्या दृष्टीने शिवसेना नेत्यांनी रणनिती आखली आहे. बुधवारी होणाऱ्या या सभेकडे सर्वांचे लक्ष असून शिवसेनेत या सभेविषयी उत्साहाचे वातावरण असल्याचे मंत्री संजय राठोड यांनी सांगितले.

# पोलीस वर्धापन दिनानिमित्त माना पोलीस ठाण्यात विद्यार्थ्यांची ज्ञानयात्रा



■मुर्तिजापुर,दि ५ (प्रतिनिधी)■

मुर्तीजापुर तालुक्यातील माना येथे दि. ५ जानेवारी २०२६ ङ्ख पोलीस वर्धापन दिन व पोलीस उदय सप्ताहाच्या पार्श्वभूमीवर पोलीस स्टेशन माना येथे आज जिल्हा परिषद शाळा, माना येथील विद्यार्थी-विद्यार्थिनींसाठी विशेष जनजागृती कार्यशाळा उत्साहात पार पडली. ठाणेदार गणेश नावकार यांच्या प्रमुख उपस्थितीत आयोजित या उपक्रमात विद्यार्थ्यांना पोलीस ठाण्याचे दैनंदिन कामकाज, कायदा-सुव्यवस्था राखण्याची कार्यपद्धती तसेच वाहतूक नियम व नियंत्रण याबाबत सविस्तर माहिती देण्यात आली.कार्यक्रमात शस्त्र प्रदर्शनाचे आयोजन करून विविध शस्त्रांचे प्रकार, त्यांचा उपयोग व सुरक्षितता याविषयी मार्गदर्शन करण्यात आले. सायबर गुन्ह्यांवरील प्रबोधनात ऑनलाईन फसवणूक, सोशल मीडियाचा सुरक्षित वापर व सायबर गुन्ह्यांपासून बचावाच्या उपाययोजना समजावून सांगण्यात आल्या. डायल ११२ आपत्कालीन सेवा, रक्षा प्रणाली, महिला व नागरिकांसाठी उपलब्ध सेवांची माहिती देत पोलीस विभागाच्या जबाबदाऱ्यांचा आढावा घेण्यात आला. या उपक्रमामुळे विद्यार्थ्यांमध्ये कायद्याविषयी जागरूकता वाढून पोलीस-नागरिक विश्वास अधिक दृढ झाल्याचे चित्र दिसून आले.

# प्रभाग १४ मधील बहुजन नगरचा मतदानावर बहिष्कार

**अकोला** : महानगरपालिका निवडणुकीच्या प्रचाराने वेग घेतला असतानाच, शहरातील प्रभाग क्रमांक १४ मधील बहुजन नगर येथील नागरिकांनी प्रशासनाविरुद्ध आक्रमक पवित्रा घेतला आहे. 'सुविधा नाही, तर मतदान नाही' अशी भूमिका घेत संपूर्ण परिसरातील नागरिकांनी निवडणुकीवर बहिष्कार टाकल्याने राजकीय गोटात खळबळ उडाली आहे.

नागरिकांनी आपल्या संतापाला वाट करून देण्यासाठी शिवणी परिसरातील मुख्य रस्त्यावर मोठे बॅनर आणि होर्डिंग लावून निषेध नोंदवला आहे. विशेष म्हणजे,

आज मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची अकोला क्रिकेट क्लब मैदानावर विजय संकल्प सभा पार पडली. मुख्यमंत्री ज्या म ार्गाने जाणार होते, त्याच मार्गावर हे निषेधाचे फलक लागल्याने प्रशासनाची धावपळ उडाली. पोलिसांनी हे बॅनर हटवण्याची विनंती केली असता, नागरिकांनी त्याला ठाम नकार दिल्याने परिसरात काही काळ तणावाचे वातावरण निर्माण झाले होते. या परिसराचा मनपा हरीत समावेश होऊन ५ वर्षे झाली, तरी परिस्थिती जैसे थे आहे. रस्ते, पाणीपुरवठा आणि सांडपाण्याची व्यवस्था (नाल्या) अद्याप करण्यात आलेली नाही. पावसाळ्यात चिखलातून वाट काढावी लागते.

## अकोला महानगरपालिका निवडणूक

# 'कही गम, कही खुशी'चा राजकीय खेळ

अकोला महानगरपालिकेच्या आगामी निवडणुकीने शहराच्या राजकारणात एक वेगळेच चित्र निर्माण केले आहे. कुठे विजयाचा जल्लोष, तर कुठे असंतोषाची धग अशीच स्थिती सध्या सर्वच प्रमुख राजकीय पक्षांमध्ये दिसून येत आहे. या निवडणुकीत ङ्गकही गम, कही खुशीङ्घ ही भावना प्रत्येक पक्षाच्या गोटात ठळकपणे जाणवते आहे.या निवडणुकीतील सर्वात ठळक आणि चिंताजनक बाब म्हणजे सर्वच पक्षांमध्ये उसळलेली बंडखोरी. पक्षविचारधारा, निष्ठा, तत्त्वे यांना अक्षरशः हरताळ फासल्याचे चित्र आहे. आज राजकारण हे लोकसेवेचे माध्यम न राहता व्यावसायिक स्वरूप धारण करताना दिसत आहे.पैशातून सत्ता आणि सत्तेतून पैसा हेच जणू आजच्या राजकारणाचे नवे समीकरण झाले आहे.एकेकाळी जनसेवा, त्याग आणि मूल्यांवर उभे असलेले राजकारण आज स्वार्थ, व्यवहार आणि सत्तालोलुपतेच्या भोवऱ्यात अडकले आहे. सेवाभावाचा अभाव आणि सत्तेची हाव यामुळे राजकीय पक्षांची अंतर्गत शिस्त पूर्णतः ढासळलेली दिसते.म हानगरपालिकेतील जवळपास प्रत्येक प्रभागात प्रत्येक पक्षाला बंडखोर उमेदवारांचा सामना करावा लागत आहे. अधिक धक्कादायक बाब म्हणजे काही पक्षांना तर काही प्रभागांत उमेदवारच मिळाले नाहीत, ही परिस्थिती पक्षसंघटनांच्या अपयशावर शिक्कामोर्तब करणारी आहे. पुन्हा पुन्हा तेच तेच चेहरे उमेदवारीसाठी पुढे रेटल्यामुळे सर्वच पक्षांच्या कार्यकर्त्यांमध्ये तीव्र असंतोष निर्माण झाला आहे. वर्षानुवर्षे मेहनत करणारे कार्यकर्ते डावलले जात असल्याची भावना वाढत असून, याच अंतर्गत कलहातून बंडखोरी जन्म घेत आहे. परिणामी, अनेक ठिकाणी स्वतः च्याच पक्षाचे उमेदवार पाडण्यासाठी बंडखोर मैदानात उतरले आहेत, ही लोकशाहीसाठी अत्यंत चिंताजनक बाब आहे.या संपूर्ण गोंधळामागे नियोजनाचा अभाव, चुकीची उमेदवार निवड आणि कार्यकर्त्यांशी संवादाचा तुटलेला दुवा कारणीभूत ठरत आहे. निवडणूक ही लोकशाहीचा उत्सव असतो, मात्र अकोल्यात सध्या तो सत्तासंघर्षाचा बाजार झाल्याचे चित्र आहे.या पार्श्वभूमीवर प्रश्न उपस्थित होतो.राजकारण हे सेवा आहे की व्यवसाय?पक्षनिष्ठा आणि विचारधारा केवळ घोषणापुरत्याच उरल्या आहेत का?अकोला महानगरपालिका निवडणूक ही केवळ नगरसेवक निवडण्याची प्रक्रिया न राहता, आजच्या राजकारणाचे विदारक वास्तव समाजासमोर उघडे करणारी निवडणूक ठरत आहे. यामधून मतदारांनी सुज्ञपणे निर्णय घेणे, हीच लोकशाहीची खरी कसोटी ठरणार आहे.



**गजानन हरणे,अकोला.**

# वं. राष्ट्रसंत श्री तुकडोजी महाराज यांचा ५७ वा पुण्यस्मरण महोत्सव उत्साहात संपन्न



■अकोला,दि ५ (प्रतिनिधी)■

दरवर्षी प्रमाणे यंदाही अ.भा. श्री गुरुदेव सेवा मंडळ मोझरी अंतर्गत श्री गुरुदेव सेवा मंडळ बाभूळगाव जहागीरच्या वतीने वं. राष्ट्रसंत श्री तुकडोजी महाराज यांचा ५७ वा पुण्यस्मरण महोत्सव, वैराग्यमुर्ती गाडगे महाराज आणि ऋषीवर्य श्री घुसरकर महाराज यांचा संयुक्त पुण्यस्मरण महोत्सव दि. ४ जानेवारी रोजी बाभूळगाव जहागीर ग्रामपंचायत येथे उत्साहात संपन्न झाला.यावेळी कार्यक्रमाचे अध्यक्ष गोवर्धनजी खवले, कार्यक्रमाचे उद्घाटक भानुदासजी कराळे यांची उपस्थिती होती. तर प्रमुख अतिथीमध्ये डॉ. त्र्यंबकराव आखरे, अँड. संतोष भोरे, सहदेवराव खांबलकर, काशिराम लोखंडे, ज्ञानदेवराव भाकरे, डॉ. फुंडकर, विजय वाहोकर, अतूल डोंगरे, प्रदीप गिरे , बंडुभाऊ शेळके, डॉ. राम उपाध्याय, गजानन जालमकर, अनंता सरोदे, शुभम वरणकार,सौ. नंदाताई आखरे, आकाश हरणे इत्यादी उपस्थीत होते. कार्यक्रमाची सुरुवात सामुदायिक प्रार्थनेने झाली. ह. भ. प. संदीप महाराज गीरे यांनी त्यांच्या हरिकीर्तनातून वं. राष्ट्रसंत तुकडोजी महाराज, वैराग्य मुर्ती गाडगे महाराज आणि ऋषीवर्य श्री घुसरकर महाराज यांच्या जीवनावर प्रकाश टाकला.

# पातूर येथे तालुकास्तरीय क्रीडा स्पर्धा संपन्न



■पातुर, दि. ५ (प्रतिनिधी)■

युवा कार्यक्रम खेल मंत्रालय,भारत सरकार अंगीकृत मेरा युवा भारत केंद्र,अकोला व साने गुरुजी कला व सांस्कृतिक क्रीडा बहु.मंडळ,पातूर व स्वामी विवेकानंद युवती मंडळ आणि स्व.विनायक राखोंडे प्रतिष्ठाण व गणेशोत्सव मंडळ,पातुर यांच्या संयुक्त विद्यमाने क्रांतीज्योती सावित्रीमाई फुले यांच्या जयंती निमित्त दि.३ जानेवारी २०२६ रोजी सकाळी १० ते ०४ वाजे पर्यंत तालुका क्रीडा संकुल,पातूर येथे तालुकास्तरीय क्रीडा स्पर्धेचे आयोजन मंडळाचे व्यवस्थापन सागर राखोंडे यांच्या नेतृत्वा मध्ये तर युवती मंडळाच्या अध्यक्षा शुभांगी उमाळे यांचा मार्गदर्शनाखाली घेण्यात आले होते. यावेळी क्रीडा स्पर्धेचे उदघाटक म्हणून उप पोलिस निरीक्षक बंडू मेश्राम सर होते तर प्रमुख उपस्थिती म्हणून क्रीडा मार्गदर्शक श्री विठ्ठल लोथे व प्रा.डॉ संजय खांदेल, विशाल राखोंडे, समीर अहमद, किसन कावळे, युवा सरपंच विकास वानखडे, शाहीर प्रकाश इंगोळे आदी उपस्थित होते. यावेळी क्रीडा स्पर्धेची सुरवात उपस्थित सर्व मान्यवरांच्या हस्ते क्रांतीज्योती सावित्रीमाई फुले व स्वामी विवेकानंद यांच्या प्रतिमेचे पूजन, दीप प्रज्वल व हार अर्पण करून करण्यात आली. त्यानंतर मुले व मुलींकरिता वैयक्तिक शंभर मीटर धावणे व गोळा फेक व सांघिक मध्ये मुलीकरिता खो-खो आणि मुलांकरिता कब्बडी स्पर्धे चे आयोजन करण्यात आले होते या स्पर्धेमध्ये विविध संघ व १२७ स्पर्धक सहभागी झाले होते. यावेळी या कार्यक्रमाला क्रीडा मार्गदर्शक परिवेक्षक म्हणून किसन कावळे, विकास वानखडे, समीर अहमद, अनिकेत उमाळे, सचिन इंगळे व आशिष चव्हाण, युवाश्री विशाल राखोंडे होते तर स्पर्धेकरिता पंच म्हणून रवी कढोने, श्याम उगले, सागर राखोंडे, पल्लवी मांडवगणे, शुभांगी उमाळे, वर्षा पातूरे यांची उपस्थिती होती. यावेळी सर्व मान्यवरांचे स्वागत नोटबुक,पेन, पुस्तक वृक्ष व कापडी पिशवी आणि सन्मान चिन्ह देऊन करण्यात आले.

# अर्णव व रोशन कॅरम स्पर्धेत राज्यस्तरावर

■अकोला,दि ५ (प्रतिनिधी)■

प्रभात किड्स स्कूलचा अर्णव पटेल व रोशन खारोडे ह्या खेळाडूंनी विभागस्तरीय कॅरम स्पर्धेत उत्कृष्ट यश प्राप्त केल्याने त्यांची राज्यस्तरीय स्पर्धेसाठी निवड झाली आहे.

क्रीडा व युवक सेवा संचालनालय, पुणे अंतर्गत जिल्हा क्रीडा परिषद, जिल्हा क्रीडा संकुल व जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय यांच्या संयुक्त विद्यमाने विभागस्तरीय कॅरम स्पर्धेचे आयोजन स्थानिक एलआरटी कॉलेज, अकोला येथे दि. १५ व १६ डिसेंबर दरम्यान करण्यात आले होते.या विभागीय कॅरम स्पर्धेत १४ वर्षाआतील मुलांमध्ये अर्णव पटेल ह्याने प्रथम क्रमांक प्राप्त केला. तर १७ वर्षाआतील मुलांमध्ये रोशन खारोडे ह्याने पाचवा क्रमांक मिळवून घवघवीत यश संपादीत केले. विजयी खेळाडूंना प्रभातचे क्रीडा प्रशिक्षक तन्वीर खान यांचे मार्गदर्शन लाभले. प्रभातचे संचालक डॉ. गजानन नारे, सौ. वंदना नारे, सचिव निरज आवंडेकर, प्राचार्य वृषाली वाघमारे, उपप्राचार्य अर्चना बेलसरे, समन्वयक मो. आसिफ, क्रीडा विभाग प्रमुख स्वप्निल मांदाळे व उप विभागप्रमुख आशिष बेलोकार यांच्यासह शिक्षकवृंद तथा कर्मचार्यांनी विजयी खेळाडूंचे कौतुक केले.

# आनंदयात्री उपक्रातून विद्यार्थ्यांसोबत आनंदाचे क्षण

**अकोट** : आयुष्यातील आनंदाचे क्षण इतरांसोबत वाटल्यास तो अधिक द्विगुणीत होतो, या भावनेतून अकोट नगरपरिषदेच्या बतीने शालेय विद्यार्थ्यांसाठी 'आनंदयात्री' अभिनव उपक्रम राबविण्यात येत आहे. या उपक्रमांतर्गत भेटवस्तू देणाऱ्या नागरिकांना 'आनंदयात्री' म्हणून संबोधण्यात येणार असून, त्यांची नोंद नगरपरिषदेच्या शिक्षण विभागात ठेवली जाणार आहे.

ही यादी दर महिन्याच्या अखेरीस प्रसिद्ध केली जाणार आहे. या उपक्रमासाठी प्रशासन अधिकारी सुनील तरोळे यांची नोडल अधिकारी म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे. नगराध्यक्षा माया धुळे व मुख्याधिकारी शशिकांत बाबर यांनी शहरातील नागरिक, दानशूर व्यक्ती, लोकप्रतिनिधी, सामाजिक संस्था यांना या उपक्रमात उत्स्फूर्तपणे सहभागी होण्याचे आवाहन केले आहे. या उपक्रमांतर्गत नागरिकांनी आपला किंवा आपल्या प्रियजनांचा वाढदिवस, लग्नाचा वाढदिवस अथवा अन्य आनंदाचा दिवस नगरपरिषदेच्या शालेय विद्यार्थ्यांसोबत साजरा करावा. विद्यार्थ्यांसोबत काही क्षण घालवत त्यांना शैक्षणिक उपयोगाच्या भेटवस्तू देऊन आनंद वाटावा, अशी संकल्पना आहे.

भेटवस्तूंमध्ये शालेय गणवेश वगळता वही, पेन, अवांतर पुस्तके, चित्रकलेचे साहित्य, स्कूल बॅग, पाणी बॉटल, टिफफीन बॉक्स तसेच शाळेसाठी वॉटर फिल्टर, डिजिटलबोर्ड यापैकी एक किंवा अधिक वस्तू देता येणार आहेत. आयुष्यातील छोट्या-छोट्या गोष्टींमध्ये आनंद शोधत सकारात्मकतेकडे पाहण्याची प्रेरणा देणारा आणि इतरांनाही आनंद देण्याचा प्रयत्न करणारा हा 'आनंदयात्री' उपक्रम आहे.

## भिमा कोरेगाव शौर्य दिनी ५०० शूरवीरांना सलामी

**अकोट :** आकोलखेड येथील तरुणांनी भिमा कोरेगाव येथे जाऊन ५०० शूरवीरांना सलामी दिली. १ जानेवारी १८१८ येथे झालेल्या लढाईत २८ हजार पेशव्यांचा ५०० शूरवीरांनी नायनाट केला. त्या दिवशी विजयस्तंभाला सलामी देण्याची सुरुवातडॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी केली होती. म्हणून तेव्हापासून लाखोंच्या संख्येने सैनिक भिमा कोरेगाव येथील विजय स्तंभाला सलामी देण्यासाठी जात असतात. यावेळी आकोलखेड येथील गौरव नगराळे, राजकुमार तायडे, सुमित नगराळे, भारत सिरसाट, संघर्ष मुनेश्वर, अनुप सिरसाट, शंतनू घनबहादूर, सोहम वासेकर आदींनी सलामी दिली.


**CHANGE IN NAME**

I Have Change My Name in My Passport No is
**(N1989173)**
----OLD NAME-----
**DIPAK VITTHAL DEOKAR**
----NEW NAME----
**DIPAK VITTHALRAO DEOKAR**
My Residential Address is :- Plot no 7 Sarswati Nagar Mhada Colony Kaulkhed Akola Maharashtra 444001.



**डॉ. पंजाबराव देशमुख कृषि विद्यापीठ, अकोला**
**मध्यवर्ती प्रात्यक्षिक प्रक्षेत्र, वणी रंभापूर निलगीरी झाडांचा जाहीर लिलाव वर्षे २०२५-२६**

**निलगीरी झाडांचा जाहीर लिलाव**

मध्यवर्ती प्रात्यक्षिक प्रक्षेत्र, वणी रंभापूर, येथिल विविध विभागातील निलगीरीच्या झाडांची विक्री जाहीर लिलावाने दिनांक:- ०९/०१/२०२६ रोजी ११ वाजता, मध्यवर्ती प्रात्यक्षिक प्रक्षेत्र, कार्यालय परीसर येथे करण्यात येईल लिलावाच्या अटी शर्ती, व अन्य माहिती दिनांक:-०५/०१/२०२६ पासून विद्यापीठ संकेतस्थळ www.pdkv.ac.in वर उपलब्ध आहे. तसेच या कार्यालयात कार्यालयीन कामकाजाच्या वेळेत निलगीरी झाडे पहावयास मिळतील तरी इच्छूकांनी लिलावात सहभाग घेण्यापूर्वी निलगीरी झाडांची पाहणी करावी.

**लिलावाचे स्थळ :** मध्यवर्ती प्रात्यक्षिक प्रक्षेत्र, वणी रंभापूर

**मुख्य बिजोत्पदन अधिकारी**
**म.प्रा.प्र.वणी रंभापूर**

क्र./विमाका/अम/जाही/८८१/२०२५-२०२६



**मुर्तिजापूर नगरपरिषद, मुर्तिजापूर**
**ता. मुर्तिजापूर जि. अकोला**

क्रमांक/नपमु/पा.पु./ ०८/२०२६ दिनांक ०५/०१/२०२६

**जाहीर दरपत्रक सूचना**

नगरपरिषद मुर्तिजापूर जिल्हा अकोला यांच्या वतीने मुर्तिजापूर नगरपरिषद हद्दीमध्ये दैनंदिन कचरा संकलन व वाहतूक करण्यासाठी ट्रक्टर व ट्रोली भाडेतत्वावर पुरवठा करणे करीता शहरातील इच्छुकांनी नगरपरिषद कार्यालयात मोहोरबंद लिफाफा मध्ये आपापले दरपत्रक जमा करण्यात यावे. खालीलप्रमाणे अटी व शर्थी च्या अधीन राहून केवळ भाडे दर हे दरपत्रकमध्ये भरून व आवश्यक कागदपत्रे जोडून मोहोरबंद लिफाफा दिनांक १३/०१/२०२६ पर्यंत कार्यालयीन वेळेमध्ये जमा होईल याची इच्छुकांनी नोंद घ्यावी, वेळेनंतर प्राप्त झालेले दरपत्रक स्वीकारले जाणार नाही याची नोंद घ्यावी.

अटी व शर्थी

१. केवळ ट्रक्टर व ट्रोली नगरपरिषद कडे भाडेतत्वावर देणे आहे.
२. याकामी नगरपरिषद मार्फत इंधन पुरवठा करण्यात येईल.
३. दरपत्रक सादर करताना इच्छुकांनी ट्रक्टर व ट्रोली यांचे अद्ययावत विमा आणि पासिंग सर्टिफिकेट देण्यात यावे.
४. तसेच सदरील कामानंतर प्रत्येक महिन्याला ट्रक्टर व ट्रोली मालक यांना आवश्यक डागडुजी करणे आवश्यक आहे.
५. सदरील दरपत्रक फक्त शहरातील घनकचरा व्यवस्थापन अंदाजपत्रक तयार करणे कामी मागविण्यात येत आहेत.

तरी वेळेमध्ये आपापले दरपत्रक मोहोरबंद लिफाफा दिनांक १३/०१/२०२६ पर्यंत नगरपरिषद कार्यालयात जमा करण्यात यावे.

मुख्याधिकारी
मुर्तिजापूर नगरपरिषद, मुर्तिजापूर



RNI NO-46973/1986 **Mahasagar Akola** Printed, published and owned by Shrikrishna Tansukhdas Chandak. Printed at Arunodaya Press, Cotton Market, Nagpur-440018 and published at Dainik Mahasagar Office, Kamala Square, Durga Chowk, Akola. **Group Editor-in-Chief and Managing Director** - Shrikrishna Tansukhdas Chandak, **Group Editor** - Sandeep Ramrao Kale, **Managing Editor** - Pankaj Shrikrishna Chandak. **Local Editor** Purushottam Madhukarrao Dhole Phone 9881489479 (Responsible for editorial as per PRB act). Head Office Phone 7447735851,9922970023.

आर.एन.आय. नोंदणी क्रमांक ४६९७३/१९८६ **महासागर अकोला** **मालक, मुद्रक, प्रकाशक :** श्रीकृष्ण तनसुखदास चांडक यांनी अरूणोदय प्रेस, कॉटन मार्केट, नागपूर, ४४००१८, येथे छापून, दैनिक महासागर कार्यालय, मिला स्केअर, दुर्गा चौक, अकोला, येथे प्रकाशित केले. **मुख्य संपादक व मॅनेजिंग डायरेक्टर : श्रीकृष्ण तनसुखदास चांडक, समूह संपादक : संदीप रामराव काळे, प्रबंध संपादक : पंकज श्रीकृष्ण चांडक**
**स्थानिक संपादक : *पुरूषोत्तम मधुकरराव ढोले, फोन : ९८८१४८९४७९*** (पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी स्थानिक संपादकांची राहील )

# तू.. तू.. मैं.. मैं.. ने गाठली राजकारणात नीच पातळी

राजकारण हे जनहिताचे आणि देशहिताचे असले पाहिजे. ते आज पक्ष हिताचे आणि स्वहिताचे झाले आहे. याकारणाने राजकारणातील तु तु - मैं मैं मध्ये वाढ झालेली पहायला मिळते आहे. राजकारणाची पातळी ही खालच्या स्तराला जाण्याची अनेक कारणे आहेत. यातील प्रमुख कारणांचा शोध घेऊ या.

-------------

**नैतिकमुल्यांची घसरण : -** आज पक्ष वाढीसाठी अनेक मार्गांचा अवलंब केला जातो आहे. शत्रूचा शत्रू तो आपला मित्र हे समीकरण राजकारणात रूढ झाले आहे. यामुळे राजकारणात कुणीही कुणाचा सच्चा मित्र किंवा शत्रू नसतो. तर ते आप आपल्या सोयीनुसार आपली भुमिका सतत बदलत असतात.

निवडणुकी मध्ये पक्के वैरी असणारे निवडणुकी नंतर सत्तेसाठी सारे मतभेद, मनभेद विसरून एका सुरात गीत गातात. आवाजात आवाज मिसळतात. कोण कुणाशी युती, आघाडी करू शकेल याची खात्री नसते. ते आपल्या शब्दावर कधीच ठाम राहत नाहीत. दिलेला शब्द पाळला जाईलच याची खात्री बाळगता येत नाही. या कारणाने जनतेची, मतदारांची मोठ्या प्रमाणावर दिशाभुल, प्रतारणा केली जात आहे. जनतेला हे सर्वकाही कळते आहे.

परंतु एकदा निवडून दिल्यानंतर जनतेचे, मतदारांचे महत्व काहीच उरत नाही. कुठल्याही महत्वाच्या निर्णयात तीला सामावून घेतले जात नसल्याने तीचा नंतर कोंडमारा होतो आहे. याच कारणाने निवडून दिलेले लोकप्रतिनिधी वरचढ ठरतात आहेत. राजकारणातील, शासन व्यवस्थेतील नैतिक मुल्यांची घसरण झाल्याने जनतेची कुठलिही कामें सरळ मार्गाने, नियमाने होतांना दिसून येत नाहीत. ती आडमार्गाने करून घ्यावी लागतात.

अन्यथा या टेबलावरून त्या टेबलावर फाईलचा प्रवास सुरू असतो. ही बाब जनतेच्या अंगवळणी पाडण्यात राज्यकर्ते व प्रशासकीय अधिकारी हे तरबेज झालेले आहेत. याचे त्यांना वाईट वाटत नाही. पश्चाताप करणे तर फारच दुरची गोष्ट झाली. याच कारणाने ते आज शिरजोर झालेले आहेत. कारण त्यांना चांगले माहिती आहे.

एकदा निवडून आल्यानंतर आणि सरकारी नोकरीत लागल्यानंतर पदावरून हटविणे किती कठीण काम असते ते?

**पक्षीय मुल्ये पाळली जात नाहीत :-**

प्रत्येक पक्षाला स्वतःची नैतिक मुल्ये, धोरणे आखून दिलेली असतात. नियमांचे, धोरणांचे पालन करणे हे प्रत्येक पक्षीय कार्यकर्ते, पदाधिकाऱ्यांचे काम, कर्तव्य असते. हे समजून घेण्यासाठी शैक्षणिक पात्रता ही अनिवार्य असली पाहिजे.

स्वातंत्र्यपूर्व काळात शिक्षणाचा तेवढा प्रचार व प्रसार झालेला नव्हता. या कारणाने तेंव्हाच्या लोकप्रतिनिधींनी, कायदे तज्ञांनी पुढचा विचार न करता याकडे दुर्लक्ष केले असावे असे वाटते आहे. परंतु आजची परिस्थिती ही संपुर्णपणे बदललेली आहे.

स्वातंत्र्यानंतर नोकरीत लागण्यासाठी शैक्षणिक पात्रता ही महत्वाची ठरते आहे. मग जे संपुर्ण देशाला चालवतात, ज्यांना देशाचे कायदे करण्याची मुभा दिलेली आहे. त्यांना कुठल्याही शिक्षणाची अट असू नये याचे आश्चर्य वाटते आहे.

आजच्या सुशिक्षीत तरूणांनी, मतदारांनी यासाठीचा आग्रह धरला पाहिजे. यासाठीच्या कायद्याची मागणी लावून धरली पाहिजे. यासाठीचे आंदोलन छेडले गेले पाहिजे. असे होत नसल्याने मतदारांचा स्वाभिमान हा सत्ता चरणी गहाण ठेवला जातो आहे कां? असा प्रश्न उपस्थित होतो आहे. अशिक्षीत, अर्ध शिक्षीत मतदार हा सत्ताधाऱ्यांच्या भुलथापांना बळी पडतो आहे. तो पैश्याच्या, दारूच्या, अंमली पदार्थाच्या सेवणाने, लालसेने किंवा कुठल्या तरी दबावात येऊन आपले अमुल्य मत विकतो आहे.

यासाठीचा कडक कायदा अस्तिवात आला पाहिजे. मत विकत घेणारा आणि विकणारा दोघेही दोषी ठरतात आहेत. तरीही त्यांचेवर कुठल्याही फौजदारी गुन्हाची नोंद केली जात नाही. कारण आपले कायदे सक्षम नाहीत. ही बाब सुशिक्षीत मतदारांच्या लक्षात येत नाही कां? लक्षात येत असेल तर ते मुग गिळून कां बसले आहेत? त्यांचा स्वाभिमान, देशाभिमान सुप्त अवस्थेत, निद्रीस्त अवस्थेत पडला आहे कां ? की तो झोपेचे सोंग घेऊन पहुडला आहे? याचे उत्तर देशाच्या तरूणाईने द्यायला हवे. कारण तरूण या देशाचा श्वास आहे. प्राण आहे. हे विसरून कसे चालणार आहे?

**राजकारणाची पातळी घसरलेली :-**



मिलिंद गड्डमवार (मुक्त पत्रकार) राजुरा जि. चंद्रपूर. 9511215200

सत्ताधारी व विरोधक हे एका गाडीचे दोन चाके आहेत. आज सत्ताधाऱ्यांना याचा विसर पडलेला आहे. ते विरोधकांना पाण्यात पहातात आहेत. विरोधक नसलेली सत्ता ही नितीमान आणि गतीमान असू शकत नाही.

सत्ताधाऱ्यांच्या चुकीच्या निर्णयांना प्रखर विरोध हा झालाच पाहिजे. तो विरोध सन्मार्गाने करण्याचा प्रथम अधिकार विरोधी पक्षांना आहे. परंतु आज संख्या बळाचा विचार करून विरोधकांना यापासून दुर ठेवले जात आहे.

जे चुकीचे आहे. यासाठी कायद्यात योग्य त्या सुधारणा कोण करणार आहे? एकतर जनतेने निवडून देतांना विरोधकांचा पणं विचार केला पाहिजे. एकतर्फी निवडून देऊन चालणार नाही. सत्तेतील समतोल हा साधला गेला पाहिजे. हे भारतीय मतदारांचे काम आहे. याची जाणीव मतदारांनी ठेवली पाहिजे.

निरंकुश सत्ता प्राप्त होत असल्याने आणि कायद्यातील विसंगतीचा फायदा घेऊन सत्ताधारी मनमानी पध्दतीने वागतांना आढळून येत आहेत. विरोधक सुध्दा कुठलाही अभ्यास न करता बिनबुडाचे आरोप करून वातावरण गढूळ करतात आहेत. याच कारणाने भारतात आज पर्यंत एकाही भ्रष्टाचाराला जन्मठेपेची, सक्त मजुरीची शिक्षा झालेली पहायला मिळालेली नाही.

चीन मध्ये तर भ्रष्टाचाऱ्यांना सरळ फाशी दिली जाते. तेथील कायदे अत्यंत कडक आहेत. म्हणून तेथील विकास वेगवान आणि भ्रष्टाचार मुक्त आहे. त्यांना परत परत त्याच त्या गोष्टींकडे, विकासाकडे मागे वळून पहावे लागत नाही. कारणं तेथील कायदे कडक आहेत. कायद्यांमध्ये पळवाटा ठेवल्या नसल्याने कायद्याचा धाक निर्माण झाला आहे.

आपले कायदे करणारेच यासाठी सक्षम नाहीत. ही बाब जनतेनी लक्षात घेतली पाहिजे. राजकारणाची पातळी घसरल्याचे, अत्यंत हिन दर्जाची झाल्याचे स्थानिक निवडणुकांमधून दिसून येते आहे. हे चित्र बदलले गेले पाहिजे. यासाठी विविध पदांवर नियुक्ती करतांना शैक्षणिक पात्रता, अनुभव, समाजाप्रती, निसर्गाप्रती असलेली आपुलकीची भावना लक्षात घेतली पाहिजे.

आज निव्वळ निवडून येण्याची पात्रता पाहिली जात असल्याने गुंड प्रवृत्तीच्या लोकांना निवडणुकीत उभे करून निवडून आणले जात आहे. पैसेवाल्यांना, भांडवलदारांना चांगले, सुगीचे दिवस आलेले आहेत. यासाठी जो तो पैश्याच्या पाठीमागे धावतो आहे. यासाठीच निरंकुश सत्ता पाहिजे आहे.

जनतेची, देशाची सेवा करण्यासाठी तर मुळीच नाही. हे सत्य मतदारांनी लक्षात घेऊन जनतेची धोरणे ठरवली गेली पाहिजेत. तरच लोकशाहीला चांगले दिवस पहायला मिळतील. अन्यथा हे दिवास्वप्नच राहणार आहे. गरीब व सामान्य जनता ही पिचलीच जाणार आहे. कराचा भार सहन न झाल्याने ती कोलमडून पडणार आहे. देश कर्जाच्या विळख्यात परत पारतंत्र्यात जाऊ शकतो. याची जाणीव कुणाला असणार आहे?

# युती-आघाडी की संभ्रम राजकारण?



दिपक कैतके
मुंबई.

महानगर पालिका निवडणुका आल्या की राज्याच्या राजकारणातील खरी नाडी हातात येते. सत्ता, संघटन, कार्यकर्ते आणि मतदार—या चौघांचा परस्पर संबंध उघड होतो.

यंदा २९ महानगर पालिकांच्या रणधुमाळीत मात्र एक वेगळेच चित्र दिसत आहे. कुठे युती, कुठे आघाडी, कुठे मैत्रीपूर्ण लढत, तर कुठे थेट स्वतंत्र मैदान—या विस्कळीतपणामुळे प्रश्न केवळ मतदारांचा नाही; नेतृत्वाचाच संभ्रम समोर आला आहे.

राज्यात सत्तेत असलेली महायुती असो किंवा विरोधी महा विकास आघाडी.. दोन्हीकडे निर्णयांची एकसंधता दिसत नाही. एका शहरात एकत्र बसणारे नेते दुसऱ्या शहरात एकमेकांविरोधात प्रचार करतात. कालचा मित्र आजचा विरोधक ठरतो; आजचा विरोधक उद्याचा मैत्रीपूर्ण प्रतिस्पर्धी होतो. परिणामी, कोणाच्या विरोधात, कधी आणि कितपत बोलायचे..याचाच अंदाज नेत्यांना लागत नाही.

महायुतीकडे पाहिले तर सत्तेचा लाभ, प्रशासनाचा अनुभव आणि संघटनात्मक ताकद असतानाही जागावाटप, स्थानिक अहंकार आणि नेतृत्वाचे वर्चस्व ही त्रिसूत्री डोके वर काढते. मुंबई महानगर प्रदेशात काही ठिकाणी युतीचे लाभ दिसतात; पण विदर्भ, मराठवाडा आणि उत्तर महाराष्ट्रात तिहेरी-चौथी लढत रंगते. सत्ताधारी पक्षांनी मतदारांपर्यंत एकसंध संदेश नेण्याऐवजी स्थानिक गणितांवर तडजोडींची मालिकाच स्वीकारली आहे.

दुसरीकडे, महाविकास आघाडीचा दावा भाजपविरोधी एकजुटीचा आहे. मुंबई, पुणे, नागपूरसारख्या महानगरांत आघाडीचे आव्हान ठोस आहे. तरीही मनसे, वंचित, अपक्ष आणि स्थानिक पक्ष—यांच्या उपस्थितीने मतफुटीचा धोका कायम आहे.

आघाडीतील घटक एका व्यासपीठावरून भाजपवर टीका करतात; पण काही प्रभागांत तेच घटक परस्परांविरोधात लढताना दिसतात. आघाडी म्हणजे काय? हा प्रश्न मतदाराला पडल्यास त्यात आश्चर्य नाही.

या सगळ्यात मनसेसारख्या पक्षाची भूमिका निर्णायक ठरते. स्वतंत्र लढत, मराठी मतांचे ध्रुवीकरण आणि योग्य ठिकाणी प्रभाव.. यामुळे ती किंगमेकर बनते. मात्र, ही भूमिका कधी कुणाच्या फायद्याची तर कधी कुणाच्या तोट्याची ठरेल, याची कोणालाच खात्री नाही. वंचित बहुजन आघाडी आणि काही शहरांतील स्थानिक पक्ष हे देखील निकाल फिरवू शकणारे घटक ठरत आहेत.

या विस्कळीतपणाचा थेट परिणाम प्रचारावर दिसतो. भाषणे सावध, संदिग्ध आणि परस्परविरोधी बनली आहेत. एकाच मुद्द्यावर वेगवेगळ्या शहरांत वेगवेगळी भूमिका घेतली जाते. कार्यकर्ते संभ्रमात आहेत..झेंडा कुणाचा, प्रचार कुणाचा आणि विरोधक नेमका कोण, हे स्पष्ट नाही. मतदारांसमोर ही विश्वासार्हतेचा प्रश्न उभा राहतो.

मुद्दा असा की, महानगरपालिका निवडणुका म्हणजे प्रयोगशाळा असतात. येथेच पक्षांची संघटनात्मक ताकद, नेतृत्वाची स्पष्टता आणि लोकांशी संवादाची दिशा तपासली जाते. पण यंदा या प्रयोगशाळेत प्रयोग जास्त आणि शिस्त कमी दिसते. युती-आघाडी हा साधनाचा प्रश्न आहे; ध्येय स्पष्ट नसल्यास साधन निरुपयोगी ठरते.

शहरनिहाय प्रश्न वेगळे आहेत—घरांची परवड, पाणी, वाहतूक, कचरा, प्रदूषण, रोजगार. या प्रश्नांवर एकसंध भूमिका आणि ठाम उत्तर अपेक्षित असताना, राजकीय गणितेच केंद्रस्थानी आली आहेत. मतदार प्रश्न विचारतोय...माझ्या शहरासाठी तुमचा नेमका आराखडा काय? पण उत्तरात युती-आघाडीचे आकडेमोडच पुढे येते.

अखेर, लोकशाहीत मतदार अंतिम न्यायाधीश असतो. विस्कळीत रणनीती, संभ्रमित नेतृत्व आणि परस्परविरोधी प्रचार यांचा हिशेब तो मतपेटीतून मांडतो. २९ महानगरपालिकांची ही लढत केवळ जागांची नाही; नेतृत्वाच्या स्पष्टतेची आणि राजकीय परिपक्वतेची कसोटी आहे.

युती-आघाड्या निवडणुका जिंकू शकतात; पण विश्वास जिंकायचा असेल तर एकसंध दिशा, ठाम भूमिका आणि प्रामाणिक संवाद आवश्यक आहे. अन्यथा, हा संभ्रमच निकाल ठरवेल आणि तो निकाल अनेकांना अपेक्षेपलीकडे धक्का देणारा ठरू शकतो.

■ ■ ■

# स्त्री पुरुष समानता काळाची गरज





माणूसपणाची पाऊलवाट
सुजाता बंडावार

आजची स्त्री ही सक्षम आहे असे म्हणताना हे सक्षमीकरण कितपत गुणात्मक आणि कितपत संख्यात्मक आहे, असा प्रश्न पडतो. याचे उत्तर तिला कितपत आर्थिक, सामाजिक, राजकीय, वैचारिक स्वातंत्र्य मिळते, यात दडले आहे. स्त्री ही मुळातच सक्षम आहे, ती दुर्बल बनली आहे तर आजतागायत असलेल्या पुरुषप्रधान समाजव्यवस्थेमुळे. स्त्री-पुरुष समानता आणायची असेल तर पुरुषांमध्ये स्त्रीविषयी सकारात्मकता आणि संवेदनशीलता निर्माण करण्याची गरज आहे. असे परखड मत महिला सक्षमीकरण, लिंगभेद या विषयांवर चर्चासत्रे, कार्यशाळा घेऊन वैचारिक प्रबोधन करणाऱ्या महिलांच्या प्रश्नांच्या अभ्यासक अश्विनी मोरे परखडपणे मांडतात.

मराठवाड्यातील हिंगोलीत शिक्षक असलेले वडील हिंम्मतराव मोरे आणि गृहिणी असलेली आई सुमन मोरे अशा सर्वसाधारण घरात अश्विनी मोरे यांचा जन्म झाला. घरात सदस्यसंख्या अधिक असल्याने आर्थिक स्थिती बेताचीच होती. त्यांच्या बहिणीचे तिच्या मनाविरुद्ध, तिच्यापेक्षा वयाने मोठ्या असलेल्या व्यक्तीशी लग्न झाले.

हुंड्यासाठी तिचा अतोनात झालेला शारीरिक आणि मानसिक छळ, यामुळे तिचे घरी परतणे, समाजाचा विधवा, परित्यक्ता आणि मुलींकडे बघण्याचा अमानवीय दृष्टिकोन...याचे गंभीर पडसाद त्यांच्या मनःपटलावर उमटले. मुळातच बंडखोर असलेल्या आणि का? असे प्रश्न विचारणाऱ्या अश्विनी मोरे पेटून उठल्या. त्यांनी त्याच क्षणी ठरविले की स्वतःच्या पायावर उभे राहिल्याशिवाय आणि मनाजोगा जोडीदार मिळाल्याशिवाय लग्न करायचे नाही. यासाठी त्यांनी प्रथम आपले शिक्षण पूर्ण केले.

जिल्हा परिषद शाळांपासून सुरू झालेला त्यांचा शैक्षणिक प्रवास राज्यशास्त्रात एमए, पत्रकारिता, महाराष्ट्रातील महिला पत्रकारितेचा इतिहास या विषयावर प्रबंध, वुमेन्स स्टडीमध्ये नेट असा अखंडपणे सुरू आहे. आणि आता त्या डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाच्या ताराबाई शिंदे स्त्री अभ्यास केंद्रामध्ये प्राध्यापिका आहेत. त्या स्त्रीवादी वक्त्या म्हणून राज्यभर ओळखीच्या आहेत.

पुरुषांच्या चौकटीत स्त्रियांचे बंदिस्त झालेले आयुष्य पाहताना त्यांनी समाजामध्ये स्त्री पुरुष समानता निर्माण करण्यासाठी स्त्री प्रश्नांवर काम करण्याचे ठरविले. यातूनच महाविद्यालयात असताना मुलींचे प्रश्न, स्त्रियांचे प्रश्न, स्त्रियांवर होणारे अत्याचार, स्त्री शिक्षण यासाठी त्या सक्रियपणे कार्य करू लागल्या.

त्या सांगतात की परभणी येथे आदिवासी मुलीवर झालेल्या बलात्काराच्या विरोधात जे आंदोलन उभे राहिले त्यात त्यांनी सहभाग घेतला आणि अमरावतीला अधिकाऱ्याच्या तोंडाला काळे फासले. यामुळे त्यांना व त्यांच्या सोबतच्या सहकाऱ्यांना दोन दिवस जेलमध्ये राहण्याची शिक्षा झाली होती. त्यात पाच मुली व २० मुले होती. या पाच मुलींमध्ये अश्विनी मोरे या एक होत्या. विद्यार्थ्यांची शिष्यवृत्ती, महाविद्यालयीन शुल्क अशा कार्यातून त्यांच्या सामाजिक कार्याला अधिक बळ मिळाले.

यानंतर वुमेन्स स्टडीमध्ये नेट केल्यानंतर त्यांना स्त्री आणि तिचे प्रश्न अधिक व्यापक स्तरावर उमगले. यातून त्यांना जाणवले की स्त्रियांच्या व्यक्तिस्वातंत्र्याचा संकुचित झालेला परिघ हा क्षितिजापलीकडे न्यायचा असेल, स्त्री-पुरुष समानता आणायची असेल, तर पुरुषांमध्ये स्त्रियांप्रतीची जाणीव आणि संवेदनशीलता रुजविण्याची नितांत गरज आहे.

ह्या उद्दिष्टपूर्तीसाठी त्या स्त्री सक्षमीकरण आणि लिंगभेद यावर कार्यशाळा, चर्चासत्रे घेऊ लागल्या. सुरुवातीला महाविद्यालयात जाऊन विविध ऑडिओ-व्हिज्युअल क्लिप्स, उदाहरणे देऊन आणि शेवटी विद्यार्थ्यांशी संवाद साधत आपल्या वैचारिक प्रबोधनातून त्यांनी त्यांच्यामधील स्त्री-संवेदनशीलतेचा भाव जागृत केला.

यातूनच त्यांनी लिंगभेद : चर्चा विश्व आणि स्त्री अभ्यास : चर्चा आकलनाच्या दिशेने या दोन पुस्तकांचे संपादन केले.

आता त्या विविध महिला मेळाव्यांतून आणि बोलावेल तेथे जाऊन महिलांमध्ये वैचारिक प्रबोधन करण्याचे मोठे कार्य करीत आहेत. तसेच अल्पसंख्यांक मुलींच्या वसतिगृहाच्या त्या अधिक्षिका असून आस्था डे केअर सेंटरच्या समन्वयक म्हणूनही उत्तम कार्य करीत आहेत.

त्या म्हणतात की शिक्षण हे परिवर्तनाचे मोठे माध्यम असून, माज्या वैचारिक प्रबोधनातून स्त्रियांमध्ये वैचारिक क्षमता दृढ करून त्यांच्यात निर्णयशक्ती निर्माण करण्याचा मी प्रामाणिक प्रयत्न करीत आहे. पत्रकारिता करीत असताना त्यांना जाणवले की इतिहासाच्या पटलावर स्त्री ही अदृश्य आहे. पत्रकारितेच्या अभ्यासामध्ये महिला पत्रकारांचा समावेश नाही. यातूनच त्यांनी महाराष्ट्रातील महिला पत्रकारितेचा इतिहास या विषयावर प्रबंध लिहिला.

यावर काम करीत असताना अनेक महिला पत्रकारांचे कार्य त्यांना जाणून घेता आले. या महिला पत्रकारांमध्ये दिनबंधूच्या पहिल्या महिला संपादिका तानुबाई बिर्जे यांचे नाव त्या आवर्जून घेतात. यातूनच त्यांच्या व्यक्तिमत्त्वावर बाबासाहेब आंबेडकर, महात्मा फुले, सावित्रीबाई फुले, ताराबाई शिंदे, तानुबाई बिर्जे, मुक्ता साळवे, राजश्री शाहू महाराज यांच्या विचारांचा प्रभाव पडला.

पत्रकारितेचा अभ्यास करताना त्यांना जाणवले की पुरुषांचे क्षेत्र असणाऱ्या या क्षेत्रात महिला फक्त मेट्रोपॉलिटन सिटीतच दिसतात. गावपातळीवर महिला पत्रकारांची संख्या शून्य आहे. आजही महिला पत्रकारांना जिल्हा प्रतिनिधी, संपादक या पदांसाठी संघर्ष करावा लागत आहे. माध्यमांबाबत त्या म्हणतात की, माध्यमांतूनही स्त्रियांची प्रतिमा ही पारंपारिक साचेबद्ध अशा पद्धतीनेच प्रदर्शित केली जाते.जाहिरात क्षेत्रामध्ये महिलांना उपभोगाची वस्तू आणि घर व कुटुंब हेच तिचे पहिले विश्व आहे, या स्वरूपात दाखविले जाते. इलेक्ट्रॉनिक मीडियाचा प्रभाव अधिक असल्याने तीच भावना नव्या पिढीमध्ये रुजते.

या लेखातून त्या प्रत्येक स्त्रीला सांगू इच्छितात की आपल्या इच्छांना मजबूत विचारांचे आणि शिक्षणाचे बळ द्या. फुले, आंबेडकर, छत्रपती शिवाजी महाराज यांच्या विचारांवर चालत त्यांनी आपल्या पायावर उभे राहून आपल्या न्याय हक्क अधिकारांविषयी लढणे गरजेचे आहे, त्यांनी स्वतःला एक व्यक्ती म्हणून बघणं आवश्यक आहे. आपल्या वैचारिक प्रबोधनातून स्त्रियांमध्ये स्वत्वाची जाणीव निर्माण करणाऱ्या प्रा. डॉ. अश्विनी मोरे यांच्या वैचारिक प्रबोधनाचे कार्य असेच अखंड सुरू राहो यासाठी आमच्या शुभेच्छा.

-------------

**: प्रा. डॉ.अश्विनी मोरे संपर्क क्रमांक : ९४०५३४२१८५**

■ ■ ■

# आद्य पत्रकार दर्पणकार बाळशास्त्री जांभेकर



**श्याम ठाणेदार**
**दौंड. जिल्हा पुणे.**
**९९२२५४६२९५**

मराठी भाषेतील आद्य पत्रकार बाळशास्त्री जांभेकर यांची आज जयंती. बाळशास्त्री जांभेकर यांनी दर्पण हे मराठी भाषेतील पहिले वृत्तपत्र सुरू केले हे वृत्तपत्र पाक्षिक स्वरूपात होते.

बाळशास्त्री जांभेकर यांचा जन्म कोकणातील सिंधुदुर्ग जिल्ह्यातील देवगड तालुक्यातील पोंभूर्ले या गावी ६ जानेवारी १८१२ रोजी झाला. विशेष म्हणजे त्यांनी त्यांच्या जन्मदिनीच म्हणजे ६ जानेवारी १८३२ रोजी दर्पण हे महाराष्ट्रातील पहिले पाक्षिक सुरू केले. वयाच्या विसाव्या वर्षीच दर्पण हे पाक्षिक सुरू करून बाळशास्त्री जांभेकर यांनी मराठी वृत्तपत्र व्यवसायाचा पाया घातला. त्यांनीच १८४० मध्ये दिग्दर्शन हे मराठीतील पहिले मासिक काढले.

बाळशास्त्री जांभेकर यांचा लोकशिक्षण व ज्ञानप्रसार हाच हेतू या उपक्रमामागे होता. सुधारकांच्या पहिल्या पिढीने पाश्चात्य विद्या व शिक्षण आत्मसात करून नवी जीवनमूल्ये वृत्तपत्र माध्यमाद्वारे रुजवली. त्या परंपरेचा पाया बाळशास्त्री जांभेकरांनी घातला. बंगालमध्ये राजाराम मोहन रॉय यांनी सुधारणांचे युग आरंभिले तेच कार्य बाळशास्त्री जांभेकरांनी महाराष्ट्रात केले. बाळशास्त्री जांभेकर हे लहानपणापासून हुशार होते. वयाच्या तेराव्या वर्षी त्यांनी मराठी आणि संस्कृत विषयाचे अध्ययन पूर्ण केले. नंतर ते मुंबईला गेले तिथे त्यांनी इंग्रजी विषयाचे शिक्षण पूर्ण केले.

इंग्रजीतील त्यांचे नैपुण्य पाहून इंग्रज राज्यकर्त्यांनी त्यांची एल्फिन्स्टन कॉलेजमध्ये इंग्रजीचे प्राध्यापक म्हणून नेमणूक केली. त्या कॉलेजमध्ये एकूण सतरा प्राध्यापक होते त्यात बाळशास्त्री जांभेकर हे एकमेव मराठी प्राध्यापक होते. दादाभाई नौरोजी हे त्यांचेच विद्यार्थी होते. पुढे त्यांची नेमणूक शाळा तपासणीस म्हणून झाली. बोर्ड ऑफ एज्युकेशनने चांगले अध्यापक तयार करावेत अशी सूचना त्यांनी इंग्रज सरकारला केली ती सूचना मान्य करून इंग्रज सरकारने डीएड, बीएड कॉलेजची निर्मिती केली.

ते शिक्षणाबाबत जितके आग्रही होते तितकेच ते सामाजिक सुधारणे बाबत आग्रही होते. केवळ शिक्षणाचा प्रसार करून चालणार नाही तर सनातनी आणि प्रतिगामी लोकांच्या मनावर बेगडी श्रद्धांचा जो कालबाह्य पगडा आहे तो हटवला पाहिजे. लोकांच्या भावना, संवेदना विशाल उदार झाल्या पाहिजेत असे त्यांचे मत होते त्याकरिताच त्यांनी दर्पण नावाचे पाक्षिक सुरू केले.

दर्पणचा पहिला अंक ६ जानेवारी १८३२ रोजी प्रकाशित झाला. दर्पण हे द्विभाषिक पाक्षिक होते. एकाच वेळी इंगजी व मराठीत निघणाऱ्या या पक्षिकाच्या पानातील दोन स्तंभात डावीकडचा स्तंभ इंग्रजी भाषेत तर उजवीकडच्या स्तंभात मराठी भाषांतर असे त्यात एकूण आठ पाने असत. बाळशास्त्री जांभेकर यांनी वाचकांची मागणी वाढू लागल्याने दर्पण साप्ताहिक ४ मे १८३२ पासून सुरू केले. बाळशास्त्री जांभेकर हे निर्भीड पत्रकार होते. त्यांचे लेख विचारप्रवर्तक असत. इंग्रजांच्या नोकरीत असूनही ते इंग्रज सरकार विरुद्ध बेधडक लिहायचे त्याचप्रमाणे जातपात, कर्मकांड, अनिष्ट रूढी परंपरा यावर ते आपल्या लेखणीतून सातत्याने प्रहार करीत.

६ जानेवारी हा बाळशास्त्री जांभेकरांचा जन्मदिवस आणि योगायोगाने ६ जानेवारी रोजीच दर्पणचा पहिला अंक प्रकाशित झाला असल्यामुळे हा दिवस महाराष्ट्रात पत्रकार दिन म्हणून साजरा केला जातो. या दिवशी निर्भीड पत्रकारिता करणाऱ्या पत्रकारांना विविध संस्थांकडून गौरविले जाते. त्यांचा सन्मान केला जातो. १८ मे १८४६ रोजी दर्पणकार बाळशास्त्री जांभेकरांचे निधन झाले. जयंतीदिनी बाळशास्त्री जांभेकरांना विनम्र अभिवादन! तसेच सर्व पत्रकार बंधूंना पत्रकार दिनाच्या मनापासून शुभेच्छा!

■ ■

# कलंकित महाराष्ट्र

**वाचक लिहितात**

छत्रपती शिवाजी महाराज यांनी ज्या भूमीत त्यागी वृत्ती, निःस्वार्थता, धर्माधिष्ठता, नीतिमत्ता, धर्म आणि राष्ट्र हित जोपासणाऱ्या व्यक्तींचे स्वराज्य निर्माण केले त्याच भूमीत, महाराष्ट्रात सध्या जे काही घडत आहे ते धक्कादायक चिंताजनक आणि तितकेच लाजिरवाणे ही आहे. याचे कारण म्हणजे १५ जानेवारीला महानगरपालिकेच्या निवडणुका होणार आहे.

या पार्श्वभूमीवर अर्ज भरणे, उमेदवारी मिळवणे, तिकीट वाटप,जागा वाटप,आरक्षण आणि पक्षांतर्गत गटबाजी या घटनांना आलेले विकृत आणि हिंसक स्वरूप अतिशय घातक आहे. जागा मर्यादित पण इच्छुकांचे प्रचंड मोठी संख्या असल्याने मोठ्या प्रमाणात संघर्ष निर्माण होत आहे.

याचे पर्यावसान वाद, हिंसा, हाणामारी होताना दिसते आहे त्यामुळे कुठेच अल्बेल राहिले नाही. निवडणुकीच्या प्रारंभीच सगळीकडे गोंधळ,अस्थिरता,अनिश्चितता आणि निराशा असे चित्र दिसून येत आहे, नाराजी नाट्याच्या ( कु ) संस्कृतीमुळे राज्याची प्रतिमा मलीन होत चालली आहे.

निवडणूक म्हणजे लोकशाहीचा उत्सव असतो. संबंधित क्षेत्राच्या सर्वांगीण विकास करणे हा निवडणुकीचा उद्देश असतो. सध्याचे अस्थिर, नितिमत्ताहीन राजकारण पाहता हा उद्देश डावलून व्यक्तिगत राजकारण असे झाले आहे. गंभीर गुन्हे करणाऱ्यांना उमेदवारी दिली जाते. कारागृहातून उमेदवार निवडणूक लढवतो ही कोणती लोकशाही आहे? या सगळ्या सावळ्या गोंधळामुळे राजकारणाची बजबजपूरी झाली असून दुर्दैवाने त्यात महाराष्ट्र बरबटला आहे. सध्याच्या राजकारणात तत्वे, मूल्ये राहिलेली नाही केवळ संधी साधूपणा आला आहे. कधी नव्हे तर अत्यंत हीन पातळीच्या राजकीय व्यभिचार सुरू झाला आहे. स्थानिक स्वराज्य संस्था म्हणजे केवळ सत्ता मिळवण्याचे साधन होऊ नये तर लोकांच्या समस्या सोडवण्यास प्राधान्य द्यायला हवे.

व्यक्तिगत महत्त्वकांक्षा किंवा राजकारणापेक्षा निर्णय प्रक्रियेत पारदर्शकता आणि सार्वजनिक हिताला प्राधान्य देऊन महाराष्ट्रातील लोकशाहीला स्थिरत्व मिळवून द्यायला हवे. त्यागी वृत्ती आणि निस्वार्थता यांना तिलांजली देणाऱ्या राजकारणाला तिलांजली देण्याची वेळ आता आली आहे.

**■ लीना मकरंद गाडगीळ, पनवेल.**

# डोळ्यांची पापणी फडफडण्याचे काय असतात संकेत ?



अनेकदा आपल्या डोळ्यांची पापणी कधी-कधी फडफडते. अनेकदा उजव्या डोळ्यांची पापणी फडफडणे शुभ संकेत मानले जातात. डाव्या डोळ्यांची पापणी फडफडणे अशुभ मानले जात. परंतू वैद्यकीयदृष्ट्या डोळ्यांची पापणी फडफडणे काही तरी शारीरिक समस्येमुळे होऊ शकते.

सर्वसाधारण तणाव वा थकव्याने असे होऊ शकते.परंतू जर जास्तच वेळ डोळ्यांची पापणी फडफडू लागली तर ही काही तरी आरोग्यविषयक समस्या असू शकते. या संदर्भात आय एण्ड रेटीनाचे सर्जन डॉ. भानू पांगते यांनी त्यांच्या इंस्टाग्राम हँडलवरुन माहिती शेअर केली आहे.

डोळ्यांच्या पापण्या फडफडण्यास ब्लेफेरोस्पाज्म म्हटले जाते. यात डोळ्यांची पापणी कोणत्याही कारणाशिवाय अचानक फडफडू लागते. सुरुवातीला रुग्णांना हे जाणवत नाही. परंतू अनेकदा ही समस्या इतकी गंभीर होते की डोळ्यांच्या फडफडता अचानक बंद होतात. डॉक्टरने या समस्येसाठी अनेक छोटे मोठे कारणे असू शकतात.

ड्राय आईज म्हणजे डोळे कोरडे झाल्याने डोळ्यांच्या पापण्या फडफडू लागतात

शरीरात मॅग्नेशियमची कमतरता

चेहऱ्यावर लकवा मारल्यानंतर चुकीच्या पद्धतीने रिकव्हरी होत असेल तर

एखाद्या न्यूरोलॉजिकल डिसऑर्डरने म्हणजे मेंदूच्या बिघाडाने डोळ्यांची पापणी फडफडू शकते.

**डॉक्टर कसे ट्रीट करतात समस्या**

डोळ्यांच्या पापण्या फडफडण्याचे कारण जाणण्यासाठी अनेकदा डॉक्टरांना टफ्क चाचणी करण्याच सल्ला देतात. यात मेंदूत काही समस्या किंवा गाठ तर नाही ना याची तपासणी केली जाते. या समस्येचा एक चांगला उपचार म्हणजे बोटॉक्स लावणे.

बोटॉक्स लावल्याने वय वाढल्याने पापण्या फडफडण्याच्या समस्येला रोखता येते. परंतू अडचण अशी की हे बोटॉक्स व्यक्तीला वारंवार घ्यावे लागतात.

**वारंवार डोळ्यांच्या पापण्या फडफडत असतील तर काय करावे ?**

जर तुमच्या डोळ्यांच्या पापण्या वारंवार फडफडत असतील तर या समस्येला हलक्यात घेऊ नका. डॉक्टरांचा सल्ला घ्या आणि समस्येच्या मुळाशी जा. योग्य वेळी उपचार करा. म्हणजे या समस्येतून सुटका मिळेल.

■ ■ ■

**अशोकायन**



प्रा. अशोक सारडा
मेहकर
(९४२१३९४३३९)

# सोशल प्रेशर

लोक काय म्हणतील चा
येई मानसिक ताण तणाव
मनाला पटत नसलं तरी
काही गोष्टी करतो ना राव ...

मन मारून जगलं की
मन होते अस्वस्थ
यातुनच निर्माण होते
नकारात्मकतेचं प्रस्त ...

व्यक्ति तितक्या प्रकृती
त्यामुळे उठेल टिकेची झोड
तुझ्या अंतर्मनाला जे पटतं
ते भाऊ तू कर सडेतोड ..

# लाइटस्टाईल बाय पीएनजीची सारा तेंडुलकर नवीन ब्रँड ॲम्बेसेडर

■ महासागर प्रतिनिधी
नाशिक, दि. ५:

पीएनजी ज्वेलर्सच्या समकालीन व हलक्या वजनाच्या फाईन ज्वेलरी ब्रँड लाइटस्टाईल बाय पीएनजी ने सारा तेंडुलकरला आपली ब्रँड ॲम्बेसेडर म्हणून घोषित केले आहे. लाइटस्टाईल बाय पीएनजीच्या या निर्णयामुळे भारतातील नवीन पिढीतील दागिनेप्रेमी असलेल्या ग्राहकांशी ब्रँडचे नाते अधिक दृढ करणे हा यामागील हेतू आहे.

या सहयोगामुळे पीएनजी ज्वेलर्सच्या वारसागत ग्राहकांपासून भविष्यातील ग्राहकांपर्यंतचा दुवा म्हणून लाइटस्टाईलची भूमिका अधिक महत्त्वाची ठरणार आहे. जवळपास दोनशे वर्षांचा विश्वास असलेल्या पीएनजी ज्वेलर्सच्या परंपरेसोबतच, लाइटस्टाईल बाय पीएनजी हा ब्रँड पुढील पिढीसाठी




आधुनिक रिटेल फॉरमॅट, समकालीन डिझाइन आणि ओम्नी-चॅनल अनुभवावर आधारित जाणीवपूर्वक उभारण्यात आला आहे.

लाइटस्टाईलच्या विस्तारामागील व्यापक दृष्टिकोनाबाबत बोलताना, पीएनजी ज्वेलर्सचे अध्यक्ष आणि व्यवस्थापकीय संचालक डॉ. सौरभ गाडगीळ म्हणाले, लाइटस्टाईल बाय पीएनजी ही आमच्या विद्यमान ग्राहकांना आणि भविष्यातील ग्राहकांना जोडण्याची दीर्घकालीन आणि जाणीवपूर्वक आखलेली योजना आहे. लाइटस्टाईल ही केवळ पारंपरिक प्रसंगांसाठी नव्हे, तर दैनंदिन क्षणांसाठी डिझाइन केलेली आधुनिक रिटेल संकल्पना आहे, ज्यामध्ये मजबूत ओम्नी-चॅनल उपस्थिती आहे.

सारा तेंडुलकरची सुंदरता, आधुनिक दृष्टिकोन आणि मजबूत डिजिटल उपस्थिती ही ब्रँडच्या तत्त्वज्ञानाशी सुसंगत आहे. इंस्टाग्रामवर ८.९ दशलक्षांहून अधिक फॉलोअर्स असलेल्या साराला तिच्या साध्या, प्रामाणिक आणि संतुलित स्टाईलसाठी ओळखले जाते.

आकर्षक डिझाइन, मिनिमल सौंदर्य आणि उत्तम आणि साधी फॅशनमुळे तिची पसंती लाइटस्टाईलच्या डिझाइन मुल्यांशी उत्तम जुळते.

# आय एल टी 20 चे पहिले विजेतेपद जिंकले

■ वृत्तसंस्था,
क्रीडा डेस्क, दि. ५:

आय एल टी 20 ला आपला नवीन चॅम्पियन मिळाला आहे. 4 जानेवारी रोजी दुबई आंतरराष्ट्रीय स्टेडियमवर खेळल्या गेलेल्या अंतिम सामन्यात डेझर्ट वायपर्सने एमआय एमिरेट्सला 46 धावांनी हरवून पहिल्यांदाच कछळ20 चे विजेतेपद पटकावले.

गेल्या दोन हंगामात अंतिम फेरीत पराभव पत्करलेल्या डेझर्ट वायपर्ससाठी सॅम करनने कर्णधाराची खेळी केली. त्याने 8 चौकार आणि 2 षटकारांच्या मदतीने नाबाद 74 धावांची खेळी केली. हा त्याच्या आय एल टी 20 कारकिर्दीतील सर्वोत्तम स्कोअर देखील आहे.

सॅम करनने नाबाद 74 धावांची खेळी केली एमआय एमिरेट्सने नाणेफेक जिंकून प्रथम गोलंदाजी करण्याचा निर्णय घेतला. वायपर्सने प्रथम फलंदाजी करताना 20 षटकांत 4 गडी गमावून 182 धावा केल्या. कर्णधार सॅम करनने 51




चेंडूंमध्ये नाबाद 74 धावांची खेळी केली, ज्यात त्याने 8 चौकार आणि 2 षटकार मारले. त्याला सामनावीर आणि मालिकावीर म्हणून निवडण्यात आले. त्याच्यासोबत मॅक्स होल्डन (41) आणि डॅन लॉरेन्स (23) यांनीही महत्त्वपूर्ण योगदान दिले होते. एमआय एमिरेट्ससाठी फजलहक फारुकीला 2 आणि अरब गुलला 1 बळी मिळाला.

सॅम करनला 'प्लेअर ऑफ द मॅच' आणि 'प्लेअर ऑफ द सिरीज' म्हणून निवडण्यात आले. एमआय एमिरेट्स 136 धावांवर ऑलआउट प्रत्युत्तरात, एमआय एमिरेट्सचा संघ सुरुवातीपासूनच दबावाखाली दिसला. संघ 18.3 षटकांत 136 धावांवर ऑलआउट झाला. संघाकडून शाकिब अल हसन (36) आणि किरॉन पोलार्ड (28) यांनी डाव सावरण्याचा प्रयत्न केला, परंतु सतत विकेट पडल्यामुळे त्यांना यश मिळाले नाही.

डेझर्ट वायपर्सकडून नसीम शाह आणि डेव्हिड पेन यांनी प्रत्येकी 3-3 बळी घेतले. खुजैमा तनवीर आणि उस्मान तारिक यांनी प्रत्येकी 2-2 बळी घेतले.

# डेमियन मार्टिनच्या प्रकृतीत सुधारणा

■ वृत्तसंस्था,
क्रीडा डेस्क, दि. ५:

ऑस्ट्रेलियाचे माजी दिग्गज फलंदाज डॅमियन मार्टिन यांच्या प्रकृतीत सुधारणा झाली आहे. मेनिन्जायटिसमुळे इंड्यूस्ड कोमामध्ये असलेले 54 वर्षीय मार्टिन आता शुद्धीवर आले आहेत आणि डॉक्टरांना त्यांना लवकरच आयसीयूबाहेर हलवण्याची आशा आहे.

माजी ऑस्ट्रेलियन क्रिकेटपटू आणि त्यांचे जवळचे मित्र ॲडम गिलख्रिस्ट यांनी सांगितले की, गेल्या 48 तासांत परिस्थिती पूर्णपणे बदलली आहे. गिलख्रिस्ट यांच्या मते, मार्टिन आता बोलू लागले आहेत आणि उपचारांना चांगला प्रतिसाद देत आहेत. मार्टिन यांना 27 डिसेंबर रोजी गंभीर अवस्थेत ब्रिस्बेन येथील रुग्णालयात दाखल करण्यात आले होते. बॉक्सिंग डेच्या दिवशी मार्टिन यांची तब्येत अचानक बिघडली होती.

डेमियन मार्टिनने ऑस्ट्रेलियासाठी 67 कसोटी आणि 208 एकदिवसीय सामने खेळताना



उत्कृष्ट फलंदाजी केली आहे. याशिवाय, ते चार टी-20 आंतरराष्ट्रीय सामन्यांमध्येही खेळले आहेत. आपल्या कारकिर्दीत मार्टिनने कसोटी क्रिकेटमध्ये 4406 धावा केल्या, तर एकदिवसीय क्रिकेटमध्ये त्याच्या नावावर 5346 धावांची नोंद आहे.

2006 मध्ये आंतरराष्ट्रीय क्रिकेटमधून निवृत्ती घेतल्यानंतरही ते क्रिकेटशी जोडलेले राहिले. मार्टिन 1999 आणि 2003 च्या विश्वचषक विजेत्या ऑस्ट्रेलियन संघातही सामील होते. 2003 च्या विश्वचषक फायनलमध्ये भारताविरुद्ध त्यांनी महत्त्वाची भूमिका बजावली होती.

# सॅमसंग इनोव्हेशन कॅम्पसने ४५० विद्यार्थ्यांना केले एआय आणि कोडिंगमध्ये प्रमाणित




■ महासागर प्रतिनिधी
हैदराबाद, दि. ५:

भारतातील आघाडीची कंज्युमर इलेक्ट्रॉनिक्स कंपनी सॅमसंगने आपल्या प्रमुख कौशल्य विकास उपक्रम सॅमसंग इनोव्हेशन कॅम्पस (एसआयसी) अंतर्गत हैदराबाद येथील एनएसआयसी टेक्निकल सर्व्हिस सेंटर येथे कृत्रिम बुद्धिमत्ता (एआय) आणि कोडिंग व प्रोग्रामिंग या विषयांमधील ४५० विद्यार्थ्यांना प्रमाणित केले. या कार्यक्रमाद्वारे सॅमसंगने भारतात भविष्यासाठी तयार डिजिटल मनुष्यबळ तयार करण्याची आपली बांधिलकी अधिक मजबूत केली आहे.

सॅमसंग इनोव्हेशन कॅम्पस हा सॅमसंगचा जागतिक पातळीवरील कौशल्य विकास कार्यक्रम आहे. या कार्यक्रमाचा उद्देश युवकांना प्रशिक्षण, प्रत्यक्ष अनुभव आणि प्रकल्पांवर आधारित शिक्षण देऊन आधुनिक आणि उद्योगाशी संबंधित तंत्रज्ञान कौशल्ये विकसित करणे आहे, ज्यामुळे त्यांच्या डिजिटल क्षेत्रात नोकरीच्या संधी वाढतात.

प्रमाणपत्र वितरण समारंभाला एनएसआयसी हैदराबादचे सेंटर हेड श्री. राजीवनाथ उपस्थित होते. त्यांनी विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले आणि भारताच्या डिजिटल परिवर्तनासाठी युवकांच्या कौशल्य विकासात सातत्याने गुंतवणूक करणे आवश्यक असल्याचे सांगितले.

या वर्षी एनएसआयसी हैदराबाद येथे प्रमाणपत्र मिळवलेल्या ४५० विद्यार्थ्यांपैकी १०० विद्यार्थ्यांनी कृत्रिम बुद्धिमत्ता (एआय) विषयातील प्रगत प्रशिक्षण पूर्ण केले, तर ३५० विद्यार्थ्यांनी कोडिंग व प्रोग्रामिंगमध्ये प्रशिक्षण घेतले.

हैदराबादमधील हा कार्यक्रम सॅमसंग इनोव्हेशन कॅम्पसचा भाग आहे . भारत सरकारच्या 'स्किल इंडिया' आणि 'डिजिटल इंडिया' उपक्रमांशी जुळणारा एसआयसी कार्यक्रम महत्त्वाच्या कौशल्यातील अंतर भरून काढणे आणि देशभरात तंत्रज्ञानावर आधारित नवोपक्रमाची संस्कृती निर्माण करणे यावर लक्ष केंद्रित करतो.

या कार्यक्रमात सर्वसमावेशकतेवर विशेष भर देण्यात आला असून, यामध्ये राष्ट्रीय स्तरावर ४२% महिलांचा सहभाग आहे. तसेच टियर-२, टियर-३ आणि निम-शहरी भागांपर्यंत सक्रियपणे पोहोचून सर्वांना उच्च दर्जाचे तंत्रज्ञान शिक्षण मिळावे यासाठी समान संधी दिल्या जात आहेत.

सॅमसंग इनोव्हेशन कॅम्पस डिजिटल कौशल्यांचे प्रशिक्षण देऊन आणि विद्यार्थ्यांना नोकरीसाठी तयार करून भारतातील भविष्यातील तंत्रज्ञानातील प्रतिभेला अधिक सक्षम बनवत आहे आणि देशाला डिजिटलदृष्ट्या सक्षमी बनवण्याच्या प्रवासात महत्त्वाची भूमिका बजावत आहे.

# वैभव सूर्यवंशीने १९ चेंडूंमध्ये अर्धशतक ठोकले

■ वृत्तसंस्था, बेनोनी, दि. ५:,

14 वर्षांच्या वैभव सूर्यवंशीने सोमवारी दक्षिण आफ्रिकेच्या अंडर-19 संघाविरुद्ध 19 चेंडूंमध्ये अर्धशतक झळकावले. त्याने आपल्या डावातील पहिल्याच चेंडूवर षटकार मारला.

वैभवने सोमवारी दक्षिण आफ्रिकेतील बेनोनी येथे यजमान संघाविरुद्ध 24 चेंडूंमध्ये 68 धावांची खेळी केली. त्याने या खेळीत 10 षटकार आणि एक चौकार मारला. वैभवने विलोमूर पार्क स्टेडियममध्ये सुरुवातीच्या 51 धावांपैकी 48 धावा षटकारांच्या मदतीने केल्या. त्याच्या या खेळीच्या जोरावर भारताने दुस?या युवा एकदिवसीय सामन्यात 9 षटकांत 2 गडी गमावून 101 धावा केल्या आहेत. वेदांत त्रिवेदी आणि अभिज्ञान कुंडू क्रीजवर आहेत.

संघ दक्षिण आफ्रिकेविरुद्ध 246 धावांचे लक्ष्य गाठण्याचा प्रयत्न करत आहे. नाणेफेक जिंकून फलंदाजीसाठी उतरलेला आफ्रिकन संघ 49.3 षटकांत 245 धावांवर सर्वबाद झाला. त्यांच्याकडून जानसन रोव्हल्सने 113 चेंडूंमध्ये 114 धावांची खेळी केली.

या खेळीत 7 चौकार आणि 3 षटकार होते. भारतीय संघाकडून किशन सिंगने 3 बळी घेतले. आरएस अम्ब्रिशला 2 बळी मिळाले. कनिष्क चौहान आणि खिलन पटेलने प्रत्येकी एक बळी घेतला. आफ्रिकन सलामीवीर पॉवरप्लेमध्ये बाद झाले.



नाणेफेक जिंकून फलंदाजीसाठी उतरलेल्या दक्षिण आफ्रिकेच्या संघाची सुरुवात खराब झाली. संघाने पॉवरप्लेमध्येच सलामीवीरांच्या विकेट्स गमावल्या होत्या. किशन सिंगने अदनान लागदीन (२५ धावा), जोरिच व्हॅन शाल्कवाइक (१० धावा) आणि कर्णधार मोहम्मद बुलबुलिया (१४ धावा) यांना पॅव्हेलियनचा रस्ता दाखवला.

किशन सिंगने भारतीय संघाला सुरुवातीचे ३ बळी मिळवून दिले. किशन सिंगने भारतीय संघाला सुरुवातीचे ३ बळी मिळवून दिले. जानसन रोव्हल्सच्या शतकामुळे धावसंख्या २०० च्या पुढे गेली.

४६ धावांवर शाल्कवाइक बाद झाल्यानंतर फलंदाजीला आलेल्या जानसन रोव्हल्सने शतकीय खेळी करून संघाची धावसंख्या २०० च्या पुढे नेली. त्याने ११३ चेंडूंमध्ये ११४ धावा केल्या. त्याच्याशिवाय, डॅनियल बोसमॅनने ३१ धावांचे योगदान दिले.

# श्रेयस अय्यर कर्णधारपद भूषवणार

■ वृत्तसंस्था,
क्रीडा डेस्क, दि. ५:

विजय हजारे ट्रॉफीमध्ये श्रेयस अय्यर कर्णधारपद भूषवताना दिसणार आहे. त्याला मुंबईच्या शार्दूल ठाकूरच्या जागी संघाचे कर्णधारपद सोपवण्यात आले आहे. नियमित कर्णधार शार्दूल दुखापतीमुळे या घरगुती ५० षटकांच्या स्पर्धेतून बाहेर पडला आहे. मुंबई उद्या हिमाचल प्रदेशविरुद्ध खेळणार आहे.



मुंबई क्रिकेट असोसिएशन ने सोमवारी निवेदन जारी करत सांगितले की, विजय हजारे ट्रॉफीच्या उर्वरित लीग सामन्यांसाठी श्रेयस अय्यरची मुंबई संघाचा कर्णधार म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे. टउअ ने आशा व्यक्त केली आहे की, अय्यरच्या नेतृत्वाखाली संघ चांगली कामगिरी करेल.

श्रेयस अय्यर ऑस्ट्रेलियाविरुद्धच्या एकदिवसीय मालिकेत जखमी झाला होता. क्षेत्ररक्षण करताना त्याच्या बरगडीला दुखापत झाली होती. त्यानंतर त्याचे सुमारे किलो वजन कमी झाले होते. अय्यरने नंतर नॅशनल क्रिकेट अकादमी, बेंगळुरू येथे प्रशिक्षण घेऊन पुनरागमन केले. तो सुमारे ३ महिन्यांनंतर पुन्हा एकदा मैदानात उतरेल.

श्रेयस अय्यरला 25 ऑक्टोबर 2025 रोजी ऑस्ट्रेलियाविरुद्ध सिडनीमध्ये दुखापत झाली होती. सोमवारी जयपूरमध्ये सूर्यकुमार यादव आणि शिवम दुबे संघात सामील झाल्याने मुंबईला बळकटी मिळाली. मंगळवारी हिमाचल प्रदेशविरुद्धचा सामना अय्यर साठी महत्त्वाचा असेल. त्यांच्या कामगिरीच्या पातळीवरच त्यांना बीसीसीआयच्या वैद्यकीय पथकाकडून अंतिम मंजुरी मिळेल.

श्रेयसने 2 जानेवारी रोजी सेंटर ऑफ एक्सलन्समध्ये मॅच सिम्युलेशन पूर्ण केले आहे आणि फिटनेसच्या आधारावर न्यूझीलंडविरुद्धच्या वनडे मालिकेसाठी त्याची निवड झाली आहे. त्याला उपकर्णधारही बनवण्यात आले आहे. मात्र, अय्यरला फिटनेस क्लिअरन्स मिळाल्यानंतरच मैदानात उतरण्याची संधी मिळेल.

मुंबई आपल्या गटात दुस?या स्थानावर एलिट गट-सी मध्ये मुंबई पाच सामन्यांत 16 गुणांसह दुस?या स्थानावर आहे. नॉकआउटमध्ये पोहोचण्यासाठी संघाला उर्वरित दोन सामन्यांत किमान एक विजय आवश्यक आहे. महाराष्ट्राकडून 128 धावांनी पराभव झाल्यानंतर संघाचा नेट रन रेट 1.293 वर आला आहे.


## मंगळवार दि. ६ जानेवारी २०२६

| कल्याण बाजार पत्थर फोड एकच | मुंबई बाजार पत्थर फोड एकच |
|---|---|
| ० १ ४ ७ | ३ ५ ६ ९ |
| १४५ ३८० १५८ २६९ | १६६ ६९० १७८ २३४ |
| ३८९ ४७० ३४७ ४५८ | २२९ ७८० ३५८ ४६९ |
| २८० ५६० २४८ १८८ | ३०० ५०० २७७ ३७९ |
| जोडी | जोडी |
| ०२ - १२ - ४३ - ७३ | ३२ - ५२ - ६१ - ९१ |
| ०५ - १५ - ४६ - ७६ | ३८ - ५८ - ६० - ९० |
| ०८ - १८ - ४९ - ७९ | ३४ - ५४ - ६७ - ९७ |

जबरदस्त पास होणारे चान्सेस ३ जाने. २०२६

## मंगळवार दि. ६ जानेवारी २०२६

सर्व बाजार साठी

२१ - ६१ - ५० - ९०
२४ - ६४ - ५८ - ९८
२३ - ६३ - ५७ - ९७
--------------------
४८० - ६०० - २३० - २३४
३९० - ५५६ - ३५७ - ३६०
२०० - २४० - ४५६ - ४५०

सर्व बाजारासाठी

सोम. ते बुध. ओपन डे | सोम. ते बुध. ओपन नाईट

२८० ६०० २५५ ६९० ३५० २६६
३७० ० १२३ ६ ४८० २ ७९९ ५ ४४० ८ ६९९ ४
४६० २६८ ३९० ४४७ ५५८ ७८९

सोम. ते बुध. क्लोज डे | सोम. ते बुध. क्लोज नाईट

३८० १४९ ३४६ २५६ १९० ४५०
४७० १ २४८ ४ ५८० ३ ६८९ ३ २९९ ० ३६० ९
५६० ३४७ ४९० ५८० ३८९ २७०

सर्व बाजारासाठी सिंगल अंक ओपन टू क्लोज

४ ५ ६ ७ ८

प्रो. बालाजी कुमार ९८२२४८६०३४


## आजचे राशीभविष्य

**मेष :** आज, जवळच्या मित्राचा सल्ला तुमच्या व्यवसायात प्रगती करण्यासाठी खूप उपयुक्त ठरू शकतो. इच्छित निकाल मिळविण्यासाठी विद्यार्थ्यांनी त्यांच्या अभ्यासावर लक्ष केंद्रित करणे आवश्यक आहे.

**वृषभ :** तुम्ही मित्रांसोबत लांब प्रवासाला जाण्याचा आणि पार्टी करण्याचा प्लान आखू शकता. आज नवीन व्यवसायात गुंतवणूक केल्याने तुम्हाला मोठा आर्थिक फायदा होऊ शकतो.

**मिथुन :** आज कामाच्या ठिकाणी तुमचा बॉस एखाद्या गोष्टीमुळे नाराज होण्याची शक्यता आहे. त्यामुळे ऑफीसमध्ये जपून रहा. तुमच्या रागावर नियंत्रण ठेवा. आईशी चर्चा करणे निश्चितच फायदेशीर ठरेल.

**कर्क :** आज तुम्हाला वैयक्तिकरित्या तुमच्या व्यक्तिमत्त्वात काही बदल करण्याची आवश्यकता आहे. त्यामुळे नात्यांमध्ये मधुरता कायम राहील. व्यवसायामध्ये चांगला नफा होण्याचे संकेत आहेत.

**सिंह :** आज तुमच्या दिनचर्येत महत्त्वाचे बदल केल्याने तुमच्या व्यक्तिमत्त्वात नक्कीच भर पडेल. आज पैसे वाचवणे सोपे होईल. तुम्ही इतरांना उधार दिलेले पैसे आज परत मिळतील, आर्थिक परिस्थितीत मोठा फायदा होईल.

**कन्या :** आज नवीन प्रोजेक्टचं काम सुरू करण्यापूर्वी भावा-बहिणीचा सल्ला घ्या. जर तुम्ही नवीन जमीन खरेदी करण्याचा विचार करत असाल तर आजचा दिवस शुभ आहे. अविवाहित लोकांना विवाह प्रस्ताव मिळतील.

**तुळ :** आज, अचानक येणाऱ्या गंभीर समस्येतून तुम्ही सहज सुटू शकाल. विद्यार्थ्यांना त्यांच्या वरिष्ठांच्या मदतीने शैक्षणिक स्पर्धेत भाग घेण्याची संधी मिळेल. आवडीच्या क्षेत्रात यश मिळेल.

**वृश्चिक :** घरी नातेवाईकाची ये-जा सुरूच राहील. राजकारणात तुमची आवड वाढेल आणि तुम्ही सक्रिय भूमिका बजावाल, इतरांकडून प्रशंसा मिळवाल. आज कामाच्या अतिरेकामुळे थकवा येऊ शकतो.


**धनु :** तुमची कार्यक्षमता पूर्वीपेक्षा चांगली असेल. तुमची आंतरिक शक्ती कामाच्या ठिकाणी तुमचा दिवस सुधारण्यास मदत करेल. तुमच्या जोडीदाराला कामात मोठं यश मिळाल्याने आज वातावरण आनंददायी असेल.

**मकर :** आज तुमचा कल अध्यात्माकडे अधिक असेल आणि तुमचे सहकारी एका विशेष धार्मिक कार्यक्रमाचे नियोजन करण्यात व्यस्त असतील. नवीन व्यक्तींशी गाठीभेटी होतील, व्यवसायाला फायदा होईल.

**कुंभ :** आज तुम्ही धार्मिक कार्यात व्यस्त असाल. एखाद्या धार्मिक स्थळाला भेट देऊ शकता. स्पर्धात्मक विद्यार्थ्यांना आज बहुप्रतिक्षित निकाल मिळाल्याने आनंद होईल.

**मीन :** आज तुम्हाला प्रशासकीय विभागाकडून नोकरीची ऑफर मिळू शकते आणि तुम्ही काही नवीन मित्र बनवाल. तुम्ही दैनंदिन घरगुती वस्तू खरेदी करण्यासाठी जास्त पैसे खर्च कराल.

## शब्दकोडे क्रमांक २३१९




**आडवे शब्द :-**
१) मालाचे येणे-जाणे
६) नल राजाची पत्नी
९) मलई
१०) वितरण
११) क्षमा करण्याचा स्वभाव
१२) उंबरठा
१४) एकाग्र नजर
१६) वेदना, दु:ख (हिं.)
१७) पदार्थाचा सूक्ष्म भाग
१९) बोटाच्या टोकावरील कडक आवरण
२१) पवित्र
२३) टरफल
२४) पत्नी, स्त्री
२५) जाडसर
२६) प्रफुल्लित
२८) मोगऱ्याची एक जात
३०) वसन, वस्त्र
३२) मासा पकडण्याचे साधन
३३) अव्यवस्थित राहणारा
३४) सोंगट्या मांडण्याचे वस्त्र
३५) रोजच्या रोज दुकानासाठी पाल लावावयाचे व रोजच्या रोज काढायचे असे करणारे दुकानदार जेथे आहेत तो बाजार
३८) अडत्या
३९) बंधन
४०) संताप
४२) वही
४३) बाज विणण्याची सुती पट्टी
४५) देऊळ
४६) फक्त, केवळ
४७) चरणे, गिळंकृत करणे
४८) अंत:करण
४९) पाण्यासाठी खणलेला खड्डा, उतरणे, टेकडी
५१) एकादे काम करण्याचे मनापासून ठरविणे
५३) योग्य, उचित
५४) जा-ये असणे
५६) दिवसाचा सूर्य
५८) कर्णेंद्रिय
५९) खाली पडू न देता, सतत
६१) पदर
६२) करंजी
६३) लक्ष-एक आकडा
६४) सावली
६५) कडक

**उभे शब्द :-**
१) बोलाविणे
२) कच्चे रेशीम धुताना निघणारा गाळसाळ
३) लबाडी, कारस्थान
४) छाती
५) जास्तीत जास्त
६) चिखलाची जमीन
७) चालू वर्षी
८) चापबाण
९) साठवून ठेवलेले
१३) माराची खूण
१५) अलमारी
१८)कुंभाराची भट्टी
२०) प्रयत्न
२२) अनेक कवींचे काव्य वाचनाचा कार्यक्रम
२४) सोसाट्याचा वारा
२५) युद्धासाठी उतावळा झालेला
२७) पारंब्याचा वृक्ष
२८) सुसर
२९) बगीचा
३०) कपडालत्ता
३१) रत्नागिरीचे प्रसिद्ध फळ
३६) हातचलाखी
३७) दहा लाख
३८) लपून बसणे
३९) बासरी
४१) आकाश
४४) वाईट इच्छा
४५) देवाण-घेवाण
४७) चानी
४८) डोके, शिर
५०) गणेशाचे एक नाव
५१) सापाची एक जात
५२) तीव्र भूक, अधाशीपणा
५३) रानात जाणारा रस्ता
५५) रेशमी कद, पितांबरा साठी प्रसिद्ध असलेले गाव
५६) हृदय (हिं.)
५७) धोबी
५८) चुलता
६०) शिष्य
६१) इमारतीचा मूळ आधार.

(उत्तर उद्याच्या अंकात)

### मागील शब्दकोड्याचे उत्तर



# कुरकुरित मॅगी चीज भजी



**झटपट रेसिपी**

मित्रांनो, तुम्ही मॅगी नूडल्स नेहमीच खात असाल. कंटाळा आला किंवा फार वेळ नसेल तर या झटपट नूडल्समुळे काम भागतं. याच मॅगीचा वापर करून मस्तपैकी भजी बनवता येईल. थंडीतल्या एखाद्या संध्याकाळी ही चविष्ट आणि कुरकुरीत भजी बनवून मित्रमंडळींसोबत धमाल करता येईल.

**साहित्य :** मॅगी नूडल्स, दोन चमचे तिखट, दोन चमचे मक्याचं पीठ, चीझ क्यूब, सिमला मिरची, टोमॅटो, कोथिंबिर, मीठ, तेल आणि पाणी

**कृती :** मॅगी शिजवून घ्या. सिमला मिरचीचे बारीक तुकडे करा. मॅगीमधलं सगळी पाणी आटायला हवं. आता दुसऱ्या भांड्यात सिमला मिरची, तिखट, मीठ, चीझ, टोमॅटो, कोथिंबिर, मक्याचं पीठ घाला. त्यात थोडं पाणी घालून सगळं मिश्रण एकजीव करा. आता यात मॅगी घाला. कढईत तेल गरम करा. मॅगीच्या मिश्रणाचे छोटे गोळे करून तळून घ्या. ही भजी सॉस किंवा चटणीसोबत खाता येतील.

# ढाब्यातून दररोज कमवतात २७ लाख!

**अचिव्हर**

एक साधा रोडसाईड ढाबा दिवसाकाठी २७ लाख रुपयांहून अधिक कमाई करत असेल, तर तुमचा विश्वास बसेल? ही अविश्वसनीय वाटणारी गोष्ट शंभर टक्के खरी आहे. ही कहाणी आहे भारतातील सर्वात प्रसिद्ध 'अमृत सुखदेव ढाबा'ची. सुरुवातीला एका छोट्याशा तंबूपासून सुरू झालेला हा प्रवास आज एका मोठ्या 'फूड एंपायर'मध्ये रूपांतरित झाला आहे.

१९५६ मध्ये सरदार प्रकाश सिंह यांनी हा ढाबा सुरू केला. सुरुवातीला कसलाही दिखावा नव्हता, ना कोणते फॅन्सी बोर्ड, ना कोणते मोठे मार्केटिंग. साध्या ट्रक ड्रायव्हर्स आणि कॅब चालकांसाठी परवडणारी आणि घरच्या जेवणाची चव देणारा हा ढाबा होता. अनेकदा ज्यांच्याकडे पैसे नसायचे, त्यांना सरदारजी मोफत जेवण देत असत. हीच त्यांची पहिली आणि सर्वात प्रभावी 'मार्केटिंग स्ट्रॅटेजी' ठरली. ट्रक ड्रायव्हर्स हेच त्यांचे चालते-फिरते जाहिरात फलक बनले. कारण त्यांनी सुखदेव ढाब्याचा अनुभव इतरांना सांगायला सुरुवात केली.

**सुखदेव ढाब्याच्या यशाचे रहस्य...**

✲ अतिथी देवो भव: या ढाब्याच्या यशामध्ये सर्वात महत्त्वाचा घटक ठरला तो म्हणजे विश्वास आणि आदरातिथ्य. सुरुवातीपासूनच ट्रक ड्रायव्हर्सना प्राधान्य देणे, त्यांना घरच्यासारखे वागवणे आणि प्रसंगी त्यांना विनामूल्य जेवण पुरवणे, यामुळे 'सुखदेव' हे केवळ नाव न राहता एक 'ब्रँड' बनले. ग्राहक जेव्हा एखाद्या व्यवसायावर मनापासून प्रेम करू लागतात, तेव्हा त्याची वाढ नैसर्गिकरित्या आणि वेगाने होते, याचे 'अमृत सुखदेव' हे उत्तम उदाहरण आहे.



✲ **मालक चाखतात चव:** आजही या ढाब्यावर दिवसाला सुमारे ९० हजार ग्राहक येतात. इतक्या मोठ्या संख्येने येणाऱ्या ग्राहकांना उत्कृष्ट दर्जाचे अन्न पुरवण्याचे गुपित काय आहे? याचे उत्तर साधे आहे, दर्जाशी कोणतीही तडजोड नाही. मालक आजही दररोज स्वतः जेवणाची चव घेऊन त्याची तपासणी करतात. पदार्थांचा दर्जा तपासण्यासाठी मालकाची स्वतः ची उपस्थिती हेच या ढाब्याचे 'सिक्रेट वेपन' आहे.

✲ **जलद सेवा:** केवळ चव आणि दर्जाच नव्हे, तर 'अमृत सुखदेव'ची जलद आणि कार्यक्षम सेवा ही देखील खास आहे. इतकी वेगवान सेवा, की लोक म्हणतात, सुखदेव ढाब्यावर जा, तर पोटात भुकेची जाणीव होण्याआधीच ताटात जेवण येते. ही त्यांची ख्याती आहे. स्वयंपाकाची कौशल्ये आणि वेळेचे व्यवस्थापन यांचा हा उत्तम मेळ आहे.

✲ **तीन तत्वे :** या ढाब्याने आजपर्यंत शून्य जाहिरात या धोरणाचे पालन केले आहे. मोठे होर्डिंग्ज नाहीत, टीव्ही जाहिराती नाहीत. त्यांचा एकच सोपा मंत्र आहे: उत्तम जेवण, जलद सेवा आणि स्वच्छ व्यवहार. या तीन साध्या तत्त्वांवर आधारित विश्वासाच्या बळावर, एका छोट्या तंबूने २७ लाख रुपयांपेक्षा जास्त दैनंदिन कमाईचा टप्पा गाठला आहे.

# तिचं वागणं खटकतं

**मॅच मेकिंग**

मी २८ वर्षांचा तरुण असून गेल्या चार वर्षांपासून एका मुलीच्या प्रेमात आहे. आम्हाला लग्न करायचं आहे. पण सध्या मला काही प्रश्न पडले आहेत. माझी मैत्रीण इतर पुरुषांशी जवळीक करत असल्याचं माझ्या लक्षात आलं आहे. यात तिच्या ऑफिसमधल्या सहकाऱ्यांचाही समावेश आहे. ती त्यांच्याकडून भेटवस्तू स्वीकारते. पैसे घेते. मी तिला हे सगळं थांबवायला सांगितलं तेव्हा तिने मलाच आरोपीच्या पिंजऱ्यात उभं केलं. माझे विचार संकुचित असल्याचं तिचं म्हणणं आहे. तिचे मित्र तिच्या खांद्यावर हात ठेवतात. तसे फोटोही त्यांनी पोस्ट केले आहेत. माझ्या मैत्रिणीनेही या फोटोंना लाईक केलं आहे. या सगळ्यामुळे मी खूप निराश झालो आहे. माझं तिच्यावर खूप प्रेम आहे. पण तिचं हे वागणं मला अस्वस्थ करून जातं. तिच्या वागण्यात बदल होण्याची सुतराम शक्यता नाही. मी काय करू?



**उत्तर :** मित्रा, मला वाटतं की तू या नात्यामधून थोडा ब्रेक घ्यावास. स्वत:ला थोडा वेळ दे. नात्याकडून, आयुष्याकडून तुला नेमकं काय हवं आहे ते जाणून घे. तुझं तिच्यावर प्रेम आहे. पण आत्मचिंतनासाठी काही काळ हे नातं बाजूला ठेवणं गरजेचं आहे. आत्मचिंतन केल्यानंतर काही गोष्टी तुझ्या लक्षात येतील. या नात्याकडून असणाऱ्या अपेक्षांची तुला जाणीव होईल. मग तू तिच्याशी संपर्क साध. तुझ्या अपेक्षा स्पष्टपणे सांग. तिच्याशी मोकळेपणाने संवाद साध. तूही तिचं म्हणणं समजून घे. तिच्याकडेही तुझ्याकडून असलेल्या अपेक्षांची यादी असेल. हा गुंता सोडवण्यासाठी समुपदेशकांची मदत घेता येईल. तुमची दोघांची जडणघडण वेगळ्या वातावरणात झाली आहे. काही गोष्टी तुला चुकीच्या वाटतात. तिच्या दृष्टीने त्या योग्य आहेत. काय चूक, काय बरोबर हा विचार करण्यात काहीच अर्थ नाही.

# लाभ यीन योगाचे

**फिटनेस**

यीन योगा सध्या चर्चेचा विषय ठरतो आहे. हा योगाचाच एक प्रकार आहे. यात मंदगतीने आसनं करायची असतात. यीन योगामुळे शरीराला बरेच लाभ होतात. यीन योगा हा पारंपरिक भारतीय योग आणि चीनी वैद्यकशास्त्र यांच्या मिलापातून तयार झालेला आधुनिक व्यायामप्रकार आहे. यात आसनं अधिक काळापर्यंत करायची असतात. यीन योगामुळे आपण स्वत:शी जोडले जातो. मानसिक आणि शारीरिकदृष्ट्या आपण अधिक सक्षम होतो.



✲ यीन योगामुळे शरीर अधिक लवचिक होतं. इतकंच नाही तर सांध्यांना अधिक प्रमाणात रक्तपुरवठा होतो. यीन योगातल्या आसनांमुळे शरीरात ऊर्जेचा प्रवाह टिकून रहातो.

✲ यीन योगामुळे आपला स्वत:शी संवाद सुरू होतो. यामुळे आपल्याला आपल्याच गुणांची जाणीव होते. आत्मविश्वास वाढतो. या योगासनांमुळे आपण स्वत:बद्दलच जागरूक होतो.

✲ सध्याच्या धावपळीच्या, ताणतणावांच्या जगात यीन योगा करणं गरजेचं आहे. यीन योगामुळे आपल्याला शांतता, समाधानाची जाणीव होते, मन:शांती लाभते.

✲ मेडिटेशनदरम्यान लक्ष केंद्रित करता येत नसेल तर यीन योगाचा मार्ग निवडा.

# जेईईसाठी मॉक टेस्ट आवश्यक

**उच्च शिक्षण**

संजेईई मेन सत्र १ हे २१ जानेवारी ते ३० जानेवारी २०२६ दरम्यान होणार आहे. मॉक टेस्ट जेईई मेन २०२६ मध्ये चांगले गुण मिळवू शकतात आणि जेईई मेनमध्ये चांगले गुण मिळणे म्हणजे संगणक विज्ञान (सीएस) सारखे चांगले मेजर मिळवणे. चांगल्या मेजरमधून बी.टेक करणे म्हणजे करिअरचा चांगला आहे.




**जेईई मेनसाठी मॉक टेस्ट का महत्त्वाच्या?**

जेईई मेनमध्ये चांगला स्कोअर म्हणजे फक्त चांगली शाखा मिळवणे नाही. जेईई मेनमध्ये चांगला स्कोअर हा जेईई ॲडव्हान्स्डसाठी पात्र होण्यासाठीदेखील एक महत्त्वाचा घटक आहे. मॉक टेस्ट जेईई मेन परीक्षेसाठी आत्मविश्वास वाढवतात. मॉक टेस्ट घेतल्याने वेळेच्या मर्यादेसह सातत्यपूर्ण सराव करून परीक्षेचा स्वभाव वाढतो. प्रत्यक्ष परीक्षेच्या स्वरूपाची अंतर्दृष्टी मिळते. कमकुवतता ओळखते. वेळेचे व्यवस्थापन वाढवते. नकारात्मक गुणांकन टाळण्यास मदत करते. अशा संरचित सरावामुळे वेळेचे व्यवस्थापन आपोआप सुधारते. स्पष्ट विचार करण्यासाठी वेळ मिळतो.

**मॉक टेस्ट दरम्यान काय लक्षात ठेवावे?**

प्रत्येक प्रश्नासाठी घेतलेल्या वेळेचे विश्लेषण करा. गतीतील कमकुवत मुद्दे ओळखा. जलद पद्धती आणि शॉर्टकटवर काम करा.

# पुरुषांतही अनारकली ड्रेसची फॅशन

**फॅशन पॅशन**

अनारकली ड्रेसेसने ज्याप्रमाणे गेल्या काही काळापासून महिलांच्या वॉर्डरोबमध्ये आपली जागा निर्माण केली, त्याप्रमाणेच आता पुरूषांसाठीही अनारकली ड्रेसेसची फॅशन आली आहे. तूर्तास या ड्रेसला फॅशन विश्वाने मनारकली असे टोपण नाव दिले आहे.



फॅशन डिझायनर अबु जानी आणि संदीप खोसला यांनी नुकताच दिल्लीमध्ये 'फॅशन शो' केला. या वेळी पुरूष मॉडेल्सच्या अंगावर हे मनारकली ड्रेसेस झळकत होते. फॅशन आणि स्टाइलला कोणत्याही सीमा नसतात तसेच बायकी आणि पुरूषी अशा संज्ञांच्या बंधनांचे फासही फार घट्ट आवळलेले नसतात, म्हणूनच अनारकलीसारखे पॅटर्न जुजबी फरक करून स्त्री वा पुरूष दोघांसाठीही बाजारात दाखल होतात. बाजीराव पेशवा या चित्रपटात रणबीर सिंहने घातलेले, रॉयल, मुगल अपील देणारे हे मनारकली ड्रेसेस सध्या फॅशन जगतात आहेत. विशेषत: सणसमारंभांमध्ये हे ड्रेसेस घालून पुरूष मिरवू शकतात. लग्नसराईच्या काळात या प्रकारच्या कपड्यांना विशेष मागणी येत आहे हे विशेष!

**इण्डो वेस्टर्न स्टाइल**

पुरूषांच्या फॅशन दुनियेत इण्डो वेस्टर्न स्टाइल आघाडीवर आहे. आघाडीचे डिझायनर असलेले कुणाल रावल यांनी गेल्या वर्षाखेरीस नव्या स्टाइल्सचे शॉर्ट हेम्ड कुर्ताज पुरूषांसाठी लाँच केले. त्यानंतर ते अत्यंत लोकप्रिय झाले आहेत. हे कुर्ते पुरूषांच्या वॉर्डरोबमध्ये हमखास झळकताना दिसतात; मात्र असे असले, तरीही या कुर्त्यांच्याबरोबर नेमके काय घालावे, नेमकी कधी कोणती स्टाईल करून हे कुर्ते वापरावेत हे अनेकांच्या लक्षात येत नाही. सध्याच्या काळात पुरूषांच्या फॅशन जगतात अशा प्रकारचे कुर्ताज देखील खूप इन आहेत. स्ट्रेट बॉटम, राऊंड बॉटम किंवा प्लॅकेट कुर्ता (मानेखाली बटन्सची लाईन असलेला कुर्ता) यांपैकी प्रत्येकच प्रकाराला मागणी आहे. हे शॉर्ट कुर्ता घालून त्यावर एखादी बंडी, स्लीव्हलेस जॅकेट घालायचे आणि त्याखाली पटीयाला किंवा ब्रीच पॅण्ट्स किंवा चुडिदार घातली, की पारंपरिक आणि आधुनिक असा दोन्हीही लुकचा मिलाफ साधला जातो किंवा डेनिम आणि स्नीकर्स वर शॉर्ट कुर्ता आणि बंडी घातली तरीही छान दिसते. इंडो वेस्टर्न लुकसाठी कुर्तीवर ब्लेझर, चिनोज घातले जाते.

**इंडो वेस्टर्न लूक कॅरी करताना..**

✲ अशा काँटेम्परी लुकबरोबर पायात मोजडी किंवा कोल्हापुरी चप्पल घाला.



# नव्या वर्षात इथे जा फिरायला

**भटकंती**

बागा बीच (गोवा) : बागा बीच हा उत्तर गोव्यातील पार्टी कॅपिटल म्हणून ओळखला जातो. नवीन वर्षाच्या पूर्वसंध्येला येथे प्रचंड उत्साहाचे वातावरण असते. या किनाऱ्याजवळ असलेल्या टिटोज आणि कॅफे मॅम्बो सारख्या जगप्रसिद्ध नाईट क्लबसमध्ये भव्य पार्ट्या आयोजित केल्या जातात.

✲ **अंजुना बीच (गोवा) :** अंजुना हा गोव्यातील ट्रान्स म्युझिक आणि बोहेमियन संस्कृतीचा केंद्रबिंदू आहे. नवीन वर्षाला येथे अनेक प्रसिद्ध पार्टी ठिकाणे आहेत. कर्लीज आणि शिवा व्हॅली येथे फुल मून पार्टीज किंवा न्यू इयर ट्रान्स इव्हेंट्स आयोजित केले जातात.

✲ **वर्कला बीच (केरळ) :** वर्कला बीच हा अरबी समुद्राच्या किनाऱ्यावरील उंच कड्यांसाठी प्रसिद्ध आहे. येथे गोव्यासारखे मोठे नाईट क्लब्स नसले, तर, कड्यांवर असलेल्या रेस्टॉरंट्स आणि कॅफेमध्ये नवीन वर्षाच्या वेळी खास मेनू, लाईव्ह म्युझिक आणि उत्कृष्ट दृश्यांसह शांत पार्टीचे आयोजन केले जाते.

✲ **राधानगर बीच (अंदमान आणि निकोबार) :** हैवलॉक बेटावर असलेले राधानगर बीच आशियातील सर्वोत्तम बिचेसपैकी एक आहे. येथे गोव्यासारख्या व्यावसायिक पार्ट्या होत नाहीत; पण नैसर्गिक सौंदर्याच्या सान्निध्यात नवीन वर्षाचे स्वागत करायचे असल्यास हे ठिकाण सर्वोत्तम आहे.

✲ **मोरजिम बीच (गोवा) :** मोरजिम बीच हा तुलनेने शांत आणि लक्झरी पार्टीसाठी ओळखला जातो. हा किनारा ऑलिव्ह रिडले कासवांच्या घरट्यांसाठीही प्रसिद्ध आहे.

# नोकरीसाठी मुलाखत का महत्त्वाची?

**करियर**

'इंटरव्ह्यू' ही आपल्या नोकरीच्या शोधातील किंवा नोकरी मिळवण्याच्या मार्गातील एक महत्त्वाची पायरी आहे. नोकरीचे नियुक्तीपत्र तुमच्या हातात पाडण्यासाठी 'इंटरव्ह्यू' उत्तम होणे खूप गरजेचे असते.

आजकालची तरुण पिढी 'इंटरव्ह्यू'ला अगदी हलक्यात घेत आहे. त्यांचे वागणे कधीकधी असे दिसते, की 'इंटरव्ह्यू' घेणारा त्यांच्याबद्दल त्यांच्यापेक्षा अधिक गंभीर आहे.

**'इंटरव्ह्यू'मध्ये अयशस्वी होण्याची कारणे**

✲ उमेदवार 'इंटरव्ह्यू'साठी येताना पूर्वतयारी करत नाहीत. बहुतेक उमेदवारांचा असा विश्वास आहे, की 'इंटरव्ह्यू' ही केवळ त्यांच्या पाठ्यपुस्तकांमध्ये वाचलेली गोष्ट आहे किंवा त्यांना वाटते, की ते 'इंटरव्ह्यू'त उत्तर देण्यास ते पुरेसे हुशार आहेत. अनेक उमेदवारांचा असा विश्वास आहे, की त्यांना 'इंटरव्ह्यू'ची तयारी करण्याची गरज नाही. परिणामी, ते सहसा 'इंटरव्ह्यू'साठी तयारीशिवाय येतात.

**प्रश्न विचारणेही महत्त्वाचे**

बहुतेक उमेदवार प्रश्न विचारण्यास टाळाटाळ करतात किंवा कचरतात; पण 'इंटरव्ह्यू'मध्ये उत्तरे देणे जेवढे महत्वाचे आहे तितकेच महत्वाचे प्रश्न विचारणे हेदेखील आहे. प्रत्येक 'इंटरव्ह्यू' घेणारा हा प्रश्न विचारतो, 'तुम्हाला आमच्यासाठी काही प्रश्न आहेत का?' बहुतेक वेळा, उमेदवार या प्रश्नांसाठी तयार नसतात. मग ते विचारतात, 'मला किती पगार मिळेल?' 'कामाचे दिवस काय आहेत?' 'मला प्रवास भत्ता मिळेल का?' वगैरे. कोणताही उमेदवार हे विचारत नाही, की या नोकरीतून मी काय शिकणार? किंवा मला माझे कौशल्य अधिक विकसित करण्यासाठी कोणत्या संधी मिळतील? उमेदवाराने विचारलेले प्रश्न त्याची मनोवृत्ती दर्शवतात आणि तुमची निवड तुमच्या वृत्तीनुसार, तुमच्या कौशल्यांवरुन केली जाते.

✲ **उमेदवार योग्य पोशाख करत नाहीत**

'इंटरव्ह्यू'ला येताना बहुतेक उमेदवार योग्य वेशभूषा करत नाहीत. अनेक उमेदवार जीन्स, टी-शर्ट, चप्पल परिधान करुन येतात किंवा त्यांचा कोणताही ड्रेसकोड नसतो. पर्यटनाला जाताना घालायचे कपडे 'इंटरव्ह्यू'ला जाताना घातले तर कसे चालेल? व्यावसायिकतेला प्राधान्य देणारी कोणतीही कंपनी किंवा संस्था अशा पोषाखामुळे तुम्हाला 'इंटरव्ह्यू'मधून बाद करु शकते. बहुतेक 'इंटरव्ह्यू' म्हणजे औपचारिक घडामोडी असतात, त्यामुळे योग्य पोशाख करणे महत्त्वाचे आहे. अपवादात्मक ठिकाणी जीन्स, टी-शर्ट सारखा पोशाख स्वीकारलाही जाऊ शकतो; मात्र तुमचा पोशाख आणि तुम्ही ज्या प्रकारच्या नोकरीसाठी अर्ज केला आहे यामध्ये साधर्म्य असायला हवे.



मुद्दा सोडून बोलणे किंवा गरजेपेक्षा कमी बोलणे पुरेशी माहिती प्रदान करणे महत्त्वाचे आहे, जेणेकरुन 'इंटरव्ह्यू' घेणाऱ्याला तुम्ही कोण आहात आणि तुमची उद्दिष्टे काय आहेत याची जाणीव होऊ शकेल. तथापि, जास्त माहिती न देणे देखील महत्त्वाचे आहे. तुमची उद्दिष्टे काय आहेत आणि तुम्हाला ही नोकरी का हवी आहे हे 'इंटरव्ह्यू' घेणाऱ्यांना जाणून घ्यायचे असते. तुमचा प्रतिसाद संक्षिप्त मात्र पुरेसा असणे महत्त्वाचे आहे.

*देहबोलीतून आत्मविश्वासाचा अभाव

उमेदवाराच्या देहबोलीतून आत्मविश्वास दिसणे गरजेचे असते. सहसा, उमेदवाराची देहबोली योग्य नसते. ते योग्यप्रकारे समोरच्याशी संपर्क करत नाहीत. उदा. 'इंटरव्ह्यू' घेणारा बोलत असताना उमेदवार त्याच्याकडे न बघता इतरत्र पहात असतात. त्यामुळे 'इंटरव्ह्यू' घेणारा उमेदवाराच्या क्षमतेवर प्रश्नचिन्ह निर्माण करतो. कमी आत्मविश्वासाच्या हावभावांमुळे, उत्तरे माहित असूनही 'इंटरव्ह्यू' दरम्यान प्रश्नाचे उत्तर देताना उमेदवार अडखळतात. 'इंटरव्ह्यू'देताना संपूर्ण देहबोली महत्त्वाची असते.

**चुका टाळण्याचे मार्ग**

✲ तुमचा अनुभव, शिक्षण आणि कौशल्य याविषयीच्या प्रश्नांसाठी तयार राहा. याची उत्तरे आत्मविश्वासाने द्या

✲ एक अद्ययावत आणि चांगला मसुदा तयार केलेला रेझ्युम घेऊन जा. चांगला रेझ्युम तुम्हाला नेहमी आत्मविश्वास देईल.

✲ इंटरव्ह्यू घेणाऱ्यांसोबत सुसंवादातून मैत्रीपूर्ण संबंध तयार करण्याचा प्रयत्न करा. यामुळे तुम्हाला नोकरी मिळण्याची शक्यता वाढेल.

✲ तुम्ही सार्वजनिक करू इच्छित नसलेली वैयक्तिक माहिती देऊ नका.

✲ लक्षात ठेवा: इंटरव्ह्यू ही नियुक्ती प्रक्रियेतील फक्त पहिली पायरी आहे. त्यामुळे घाबरु नका.

✲'इंटरव्ह्यू'दरम्यान नेहमी प्रामाणिक आणि सत्य बोला. यामुळे तुम्ही विश्वासार्ह उमेदवार आहात हे 'इंटरव्ह्यू' घेणाऱ्यांच्या लक्षात येईल.

✲ नोकरीसाठी इंटरव्ह्यू द्यायला जाताना साधे मात्र व्यावसायिक स्वरुपाचे कपडे परिधान करा. पोषाखामुळे तुमच्यात अवघडलेपणा येणार नाही याकडे लक्ष द्या.




## शेर की जुबानी

* देखा है आज मुझे भी
गुस्से की नजर से,
मालूम नहीं आज वो,
किस किस से लडे हैं।

* तेरा खयाल, तेरी
तलब और तेरी आरजू,
एक भीड सी लगी है,
मेरे दिल के शहर में।

* अब उसके साथ रहूँ या,
उससे किनारा कर लूं,
जरा ठहर जा ऐ दिल,
मैं ये फैसला दोबारा कर लूं।

**ॲप वर्ल्ड**

## 'व्हॉट्सॲप कॉल्स करा रेकॉर्ड




आजकाल व्हॉट्सॲप फक्त मेसेजेससाठी नाही, तर लाखो लोक रोज व्हॉइस आणि व्हिडीओ कॉल्स करतात. ऑफिस मीटिंग, कौटुंबिक गप्पा किंवा अभ्यासाच्या चर्चा सगळेच यावर होतात; पण एक मोठी समस्या आहे, की 'व्हॉट्सॲप'मध्ये स्वतःचे कॉल रेकॉर्डिंगचे बटनच नाही. मेटा कंपनी सांगते, की आमचे कॉल्स एंड-टू-एंड एन्क्रिप्टेड आहेत, म्हणून बिल्टइन रेकॉर्डिंग दिल्यास गोपनीयतेला धोका होईल. त्यामुळे अनेकजण थर्डपार्टी ॲप्स वापरतात; पण त्यात हॅकिंगचा आणि डेटा चोरीचा धोका खूप असतो, पण चिंता करू नका. अँड्रॉइड वापरकर्त्यांसाठी एकदम सोपी आणि पूर्ण सुरक्षित ट्रिक आहे फोनचे इनबिल्ट स्क्रीन रेकॉर्डिंग. यासाठी एकही एक्स्ट्रा ॲप डाउनलोड करायचे नाही. फक्त स्क्रीन रेकॉर्डर चालू करा, स्पीकर ऑन करा आणि 'व्हॉट्सॲप' कॉल करा स्क्रीन आणि आवाज दोन्ही परफेक्ट रेकॉर्ड होतील.


**'व्हॉट्सॲप' कॉल रेकॉर्डिंग कसे करायचे?**

✲ फोनच्या वरून खाली स्वाइप करून क्विक सेटिंग्ज पॅनल उघडा.

✲ स्क्रीन रेकॉर्डिंग असा पर्याय शोधा (सॅमसंग, शाओमी, रियलमी, ओप्पो प्रत्येक ब्रँडमध्ये नाव थोडे वेगळे असते).

✲ रेकॉर्डिंग सुरु करा, 'व्हॉट्सॲप' कॉल स्पीकरवर घ्या आणि बोलायला सुरुवात करा. झालं. कॉल संपल्यावर रेकॉर्डिंग आपोआप गॅलरीत सेव्ह होईल. आवाज स्पष्ट येण्यासाठी स्पीकर मोड गरजेचा आहे.

**ए आय वर्ल्ड**




## पटकन होतील ॲप्स तयार!

'गुगल'ने 'एआय'च्या क्षेत्रात पुन्हा एकदा सर्वांना आश्चर्यचकित केले आहे. कंपनीने 'डिस्को' नावाचा एक प्रयोगात्मक 'एआय ब्राउझर' जगापुढे आणले आहे. ते सामान्य ब्राउझिंगपलीकडे जाऊन ओपन टॅब्स आणि चॅट इतिहासावरून थेट इंटरॅक्टिव्ह ॲप्स तयार करतो. 'गुगल'च्या सर्वात प्रगत जेमिनी ३ मॉडेलने समर्थित हा ब्राउझर, वेब ब्राउझिंगची व्याख्या बदलण्यासाठी तयार आहे.

'डिस्को'मध्ये मुख्य फीचर म्हणजे 'जेनटॅब्स'. हे टूल ब्राउझ करताना उघडलेले टॅब्स आणि तुमच्या प्रश्नांचा अभ्यास करून आपोआप कस्टम वेब ॲप तयार करते. तुम्ही काश्मीरला ट्रिप प्लॅन करत असाल, तर 'डिस्को' तुमच्या टॅब्समधून माहिती घेऊन इंटरॅक्टिव्ह मॅप, आयटीनरी आणि कॅलेंडर असलेले एक संपूर्ण ट्रिप प्लॅनर ॲप तयार करेल किंवा एखादा विद्यार्थी सौरमाला शिकत असेल, तर ते 'थ्री डी इंटरॅक्टिव्ह मॉडेल' तयार करून संकल्पना सोप्या करेल. अगदी जेवणाचं प्लॅनिंग किंवा गार्डनिंगसाठीही ते सुंदर इमेजेससह ॲप बनवते.

हे फक्त चॅटजीपीटी किंवा जेमिनीसारख्या चॅटबॉट्सप्रमाणे उत्तर देणारे नाही, तर ते तुमच्या 'ब्राउझिंग सेशन'ला सक्रियपणे समजून टॅब्सच्या गोंधळातून सुटका करून एकच इंटरॅक्टिव्ह टूल देते. शिवाय प्रत्येक जनरेट केलेल्या भागाला मूळ वेब सोर्सची लिंक जोडली जाते, जेणेकरून तुम्ही माहितीची खातरजमा करू शकता. 'नॅचरल लँग्वेज'ने तुम्ही हे ॲप आणखी रिफाइन करू शकता. विद्यार्थ्यांसाठी हे फीचर वरदान ठरेल. अभ्यास करताना माहितीचे व्हिडिओत रूपांतर करून संकल्पना समजणे सोपे होईल.

**स्वयंरोजगार**

## व्यवसाय सुरू करताना




सध्या नोकरीची वानवा असताना अनेक जण स्वत:चा व्यवसाय सुरू करण्याचा विचार करतात. उद्योग क्षेत्रात बऱ्याच संधी उपलब्ध आहेत. मात्र व्यवसायाचा पाया रचताना काही चुका होऊ शकतात. म्हणूनच व्यवसाय सुरू करताना नेमकं काय करायला हवं याविषयी...

✲ बरेच जण आपल्या उत्पादनाचं मार्केटिंग करत नाहीत. मात्र मार्केटिंगवर पैसे वाचवल्यामुळे तुमची प्रसिद्धी होऊ शकत नाही. सुरूवातीच्या टप्प्यात एकूण उत्पन्नाच्या १० ते २० टक्के रक्कम मार्केटिंगवर खर्च करायला हवी. थोडं सुस्थापित झाल्यावर हा खर्च पाच ते दहा टक्क्यांवर आणता येईल.

✲ उद्योजकांची टीम चांगली हवी. चुकीच्या लोकांची निवड केल्यामुळे तुमचं बरंच नुकसान होऊ शकतं. त्यामुळे गुणवान, कुशल आणि कल्पन लोकांची निवड करा. यामुळे तुमच्या व्यवसाय वृद्धीला गती मिळू शकेल.

✲ बरेच पण 'परफेक्शन'च्या मागे लागतात. एखादं ॲप तयार करताना बराच वेळ घालवतात. त्याऐवजी आपल्या उत्पादनाची गुणवत्ता सुधारण्यावर भर द्यायला हवा. उत्पादनाची गुणवत्ता सुधारली की तुमचं उत्पादन लोकप्रिय होईल.

# महावितरणकडून वीज क्षेत्राचे खासगीकरण?

## १३ मंडळांत फ्रेंचायझी नियुक्त : उर्जामंत्र्यांवर आरोप

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. ५ :

वीज क्षेत्राचे खासगीकरण करणार नसल्याचे आश्वासन मुख्यमंत्री व ऊर्जामंत्री देवेंद्र फडणवीस यांनी विविध कामगार संघटनांना दिले होते. मात्र, राज्यातील महावितरणच्या १३ मंडळांतील (सर्कल्स) वीज वितरणाची जबाबदारी खासगी कंपन्यांना फ्रेंचायझी तत्त्वावर देण्यात आली आहे.

हे महावितरणचे खासगीकरण असल्याचा दावा करत महाराष्ट्र स्टेट इलेक्ट्रिसिटी वर्कर्स फेडरेशनने मुख्यमंत्री व ऊर्जामंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यावर वचनभंगाचा आरोप करीत या खासगीकरणाला विरोध दर्शविला आहे.



महावितरणने फ्रेंचायझी दिलेल्या मंडळांमध्ये जालना, छत्रपती संभाजीनगर (शहर व ग्रामीण), नांदेड, परभणी, हिंगोली, वाशीम, अकोला, बुलढाणा, यवतमाळ, सोलापूर, धाराशिव व बीड या शहरांचा समावेश आहे.

महाराष्ट्र स्टेट इलेक्ट्रिसिटी वर्कर्स फेडरेशनने सांगितले की, ४ जानेवारी २०२३ रोजी वीज उद्योगातील २७ कामगार संघटनांनी पुकारलेल्या संपाच्या पार्श्वभूमीवर फडणवीस यांनी महावितरणमध्ये कोणत्याही प्रकारचे खासगीकरण करणार नसल्याचे स्पष्ट केले होते.

यावेळी वीज वितरण, पारेषण व निर्मिती या तिन्ही कंपन्यांना सक्षम करण्यासाठी आर्थिक सहाय्य केले जाईल, असेही त्यांनी सांगितले होते. मात्र, फ्रेंचायझीच्या निर्णयामुळे त्यांनी आपल्या वचनाचा भंग केल्याचा आरोप फेडरेशनने केला आहे.

फेडरेशनचे अध्यक्ष मोहन शर्मा म्हणाले की, फ्रेंचायझीचे मॉडेल महाराष्ट्राच्या वीज वितरण क्षेत्रात पूर्णतः अयशस्वी ठरले आहे. असे असतानाही खासगी भांडवलदार व कॉर्पोरेट कंपन्यांच्या हितासाठी फ्रेंचायझी कंपन्यांद्वारे खासगीकरणाचा प्रयोग करण्याचा हट्ट सुरू आहे.

यापूर्वी राज्यातील छत्रपती संभाजीनगर, नागपूर व जळगाव येथील फ्रेंचायझी कंपन्या कराराची मुदत पूर्ण होण्यापूर्वीच पळून गेल्याची उदाहरणे आहेत. देशपातळीवरही ओडिशा व उत्तर प्रदेशमध्ये फ्रेंचायझी कंपन्या अपयशी ठरल्या होत्या.

महावितरण शेतकरी, आदिवासी, दारिद्र्य रेषेखालील वर्ग, पावरलूम व इतर वीज ग्राहकांना सामाजिक उत्तरदायित्व निभावत सवलतीच्या दराने वीज पुरवठा करते. विविध ग्राहकांकडील थकबाकी वसूल करताना होणारा राजकीय हस्तक्षेप, निवडक उद्योगांना दिलेली सवलतीची वीज व माफी असूनही महावितरण कंपनी ४७८ कोटी रुपये, महापारेषण कंपनी १५०० कोटी रुपये तर महानिर्मिती कंपनी १०० कोटी रुपयांच्या नफ्यात आहे.

त्यामुळे नफ्यात असलेल्या या कंपन्यांमध्ये खासगीकरणाची प्रक्रिया कुणाच्या फायद्यासाठी राबवली जात आहे, असा सवाल महाराष्ट्र स्टेट इलेक्ट्रिसिटी वर्कर्स फेडरेशनचे अध्यक्ष मोहन शर्मा व सरचिटणीस कृष्णा भोयर यांनी उपस्थित केला आहे. दरम्यान, फ्रेंचायझीला कामगार संघटनांचा तीव्र विरोध असल्याने महावितरण, राज्य सरकार व विविध कामगार संघटनांमध्ये फ्रेंचायझीच्या मुद्द्यावर संघर्ष उभा राहण्याचे संकेत मिळत आहेत.

## राज्यव्यापी बहिष्काराचा शिक्षकांचा इशारा

### ऑनलाईन कामांचा विरोध

■ महासागर प्रतिनिधी, अमरावती, दि. ५ :

राज्यातील प्राथमिक शाळांमधील शिक्षकांवर लादलेल्या ऑनलाईन कामांच्या अतिरेकामुळे आता शिक्षक संघटना आक्रमक झाल्या असून, या जाचातून मुक्तता न मिळाल्यास राज्यव्यापी बहिष्काराचा इशारा देण्यात आला आहे.

महाराष्ट्र राज्य प्राथमिक शिक्षक समितीने शालेय शिक्षण मंत्री दादाजी भुसे यांना याबाबत निवेदन पाठवून आपल्या तीव्र भावना व्यक्त केल्या आहेत. शिक्षकांना शिकवू द्या आणि विद्यार्थ्यांना शिकू द्या.. अशी साद घालत, प्रशासकीय कामांसाठी शिक्षकांच्या खाजगी मोबाईलचा आणि वेळेचा होणारा गैरवापर थांबवण्याची मागणी महाराष्ट्र राज्य प्राथमिक शिक्षक समितीने केली आहे.

सध्या शाळांमध्ये शैक्षणिक कार्यपिक्षा पोर्टल, लिंक्स आणि विविध ॲप्सवर माहिती भरण्यालाच अधिक महत्त्व दिले जात असल्याचे समोर आले आहे. यु-डायस, शालार्थ प्रणालीपासून ते दैनंदिन पोषण आहार आणि आता विद्या समीक्षा केंद्र (व्हीएसके) अंतर्गत स्मार्ट उपस्थिती, चॅटबॉटवर माहिती भरण्याची सक्ती शिक्षकांसाठी असह्य झाली आहे.

ग्रामीण भागात इंटरनेटची सोय नसताना आणि शिक्षकांच्या खाजगी मोबाईलची साठवणूक क्षमता संपलेली असतानाही, प्रशासनाकडून ही कामे पूर्ण करण्यासाठी सतत दबाव टाकला जात आहे. यामुळे वगार्तील प्रत्यक्ष अध्यापनाचा वेळ कमी होत असून विद्यार्थ्यांच्या गुणवत्तेवर त्याचा गंभीर परिणाम होत असल्याचा आरोप शिक्षक समितीने केला आहे.

शिक्षण हक्क कायद्यातील तरतुदींना बगल देणारा १५ मार्च २०२४ चा शासन निर्णय आणि निपुण महाराष्ट्र सारख्या मोहिमा राबवताना खाजगी संस्थांच्या सदोष ॲपचा होणारा वापर, यामुळे शिक्षकांचे मनोधैर्य खचत आहे. खाजगी संस्थांकडून प्रसिद्ध केली जाणारी आकडेवारी ही जिल्हा परिषद शाळांची आणि शिक्षकांची जाणीवपूर्वक बदनामी करणारी असल्याचे निवेदनात म्हटले आहे.

ऑनलाईन कामांसाठी समूह साधन केंद्र शाळा स्तरावर स्वतंत्र डेटा एन्ट्री ऑपरेटरची नेमणूक करावी, अशी मागणी शिक्षकांनी पुन्हा लावून धरली आहे. याकडे कानाडोळा केल्यास संपूर्ण राज्यात ऑनलाईन कामांवर बहिष्कार टाकून खाजगी मोबाईलचा वापर बंद करण्याची चळवळ उभी केली जाईल, असा इशारा दिला आहे.

## लेखी आणि प्रात्यक्षिक परीक्षेच्या प्रक्रियेत बदल

### दहावी बारावीच्या परीक्षेसाठी बोर्डाचा निर्णय

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. ५ :

महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाने दहावी आणि बारावीच्या परीक्षेसाठी मोठा निर्णय घेतला आहे.

दहावी- बारावीच्या बोर्ड परीक्षेत कॉपी होणारच नाही, असे नियोजन करण्यात आले आहे. त्यासाठी लेखी परीक्षेपूर्वी होणाऱ्या प्रात्यक्षिक परीक्षेतील बाह्य परीक्षकांची आता अदलाबदल केली जाणार आहे. खासगी स्वयंअर्थसहाय्यिता शाळांवरील शिक्षक अनुदानित शाळांमध्ये आणि स्वयंअर्थसहाय्यिता शाळांमध्ये बाह्यपरीक्षक नेमण्याचा निर्णय बोर्डाने घेतला आहे.

इयत्ता बारावीच्या विद्यार्थ्यांचे प्रात्यक्षिक २३ जानेवारी ते ९ फेब्रुवारी या दरम्यान होणार आहे. त्यानंतर १० फेब्रुवारीपासून लेखी परीक्षा सुरू होईल. दुसरीकडे, इयत्ता दहावीच्या विद्यार्थ्यांची प्रात्यक्षिक तथा तोंडी परीक्षा २ ते १८ फेब्रुवारीपर्यंत पार पडेल. त्यानंतर २० फेब्रुवारीपासून लेखी परीक्षा सुरू होणार आहे. दरम्यान, बोर्डाच्या परीक्षेवेळी कॉपी केसेस किंवा गैरप्रकार आढळल्यास आता त्या परीक्षा केंद्रांची मान्यता कायमची रद्द केली जाणार आहे. केंद्राला पक्के वॉल कंपाउंड, स्वच्छतागृह, पाण्याची सोय, प्रत्येक वर्गात सीसीटीव्ही कॅमेरे, अशा बाबींचा त्यात समावेश आहे.

एखाद्या केंद्राचे वॉल कंपाउंड पडलेले असल्यास त्या ठिकाणी लोखंडी जाळी मारायला सांगण्यात आले आहे. आता प्रात्यक्षिक परीक्षेपूर्वी ७ जानेवारीला बाह्य परीक्षकांचा उद्?बोधन वर्ग घेतला जाणार आहे. त्यावेळी बाह्य परीक्षकांनी प्रात्यक्षिकावेळी कोणत्या बाबी तपासायच्या, याबद्दल मार्गदर्शन केले जाणार आहे. प्रात्यक्षिक परीक्षेवेळी प्रत्येक जिल्ह्यातील किमान १० टक्के शाळांना शिक्षणाधिकारी व गटशिक्षणाधिकाऱ्यांची पथके भेटी देऊन प्रत्यक्षात तोंडी तथा प्रात्यक्षिक परीक्षेची तपासणी करतील, असेही बोर्डाने नियोजन केले आहे.

विद्यार्थ्यांची सरमिसळ करूनही अनेक परीक्षा केंद्रांवर कॉपी केसेस सापडल्या. त्यामुळे आता यंदा प्रथमच पर्यवेक्षकांमध्येही सरमिसळ करण्याचा निर्णय महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाने घेतला आहे. याशिवाय प्रत्येक केंद्रावर सीसीटीव्ही कॅमेरे असणार आहेत. तसेच पर्यवेक्षकांचे मोबाईल कॅमेरे पेपर सुरू झाल्यापासून संपेपर्यंत झूमद्वारे जोडले (कनेक्ट) जाणार आहेत.

## मर्यादेत बोला... सल्ल्यावर राष्ट्रवादीचा पलटवार

■ महासागर प्रतिनिधी
अमरावती / मुंबई, दि. ५ :

महापालिका निवडणुकांच्या रणधुमाळीत विरोधकांऐवजी महायुतीतील घटक पक्षांमध्येच शब्दयुद्ध पेटले आहे. सत्तेत एकत्र असले तरी प्रचाराच्या मैदानात आरोप-प्रत्यारोपांची पातळी घसरत चालली आहे. पिंपरी-चिंचवडमधील सभेतून उपमुख्यमंत्री यांनी केलेल्या आरोपांमुळे भाजप अस्वस्थ झाला असतानाच, माजी खासदार यांनी मर्यादेत बोला.. असा सल्ला देत वादात उडी घेतली आणि राष्ट्रवादीकडून तिखट प्रतिहल्ला झाला.

नवनीत राणांच्या वक्तव्यानंतर राष्ट्रवादी काँग्रेसचे आमदार संतापले. आता त्या पुढे कशा निवडून येतात, ते आम्ही पाहू, असा गर्भित इशारा देत खोडकेंनी राणांची लायकीच काढली. लोकसभा निवडणुकीत अजितदादांनी रोखले नसते, तर त्या खासदार झाल्याच नसत्या, असे सांगत एकदा निवडून आणणे ही आमची चूक होती, अशी कठोर टीकाही करण्यात आली.

महापालिका निवडणूक एकत्र लढवण्याची घोषणा महायुतीने केली असली, तरी अनेक महापालिकांत युतीची घडी विस्कटलेलीच दिसते.



अमरावतीमध्ये तर राष्ट्रवादी काँग्रेस, भाजप आणि युवा स्वाभिमानी पक्ष (आमदार रवी राणा) एकमेकांसमोर ठाकले आहेत. आपसात टीका नको असा निर्णय झाल्याचा दावा असला, तरी प्रत्यक्षात नेते पातळी सोडून आरोप करताना दिसत आहेत.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि अजित पवार यांच्या समन्वय बैठकीत मनभेद-मतभेद टाळा.. असा सूर ठरवला गेल्याचा दावा आहे. मात्र, पुणे-पिंपरीत अजित पवार आणि भाजप प्रदेशाध्यक्ष यांच्यात थेट भ्रष्टाचाराचे आरोप झाले आणि वादाची धग वाढली.

या पार्श्वभूमीवर नवनीत राणांनी अजित पवारांना शब्द जपून वापरण्याचा सल्ला दिला. तोच राष्ट्रवादीसाठी लाल रेषा ठरला. दादांचे समर्थक भडकले आणि खोडकेंनी राणांच्या वक्तव्याचा समाचार घेतला. आरोप करताना पात्रता तपासा, असा टोला देत.

नवनीत राणांना भाजपच्या स्थानिक नेत्यांचाही विरोध असल्याची चर्चा आहे. केले आहे. मर्यादा या एका शब्दाने पेटलेले वाद आता लायकीपर्यंत गेल्याचे दिसून येत आहे.

## कळमना हत्याकांड
## आरोपींना ८ पर्यंत कोठडी

■ महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. ५ :

दारूची झिंग चढल्यानंतर वादात एकाचा खून करून तिघांना जखमी करणाऱ्या पाच आरोपींना कळमना पोलिसांनी अटक केली आहे. या प्रकरणात एका विधी संघर्षग्रस्त बालकालाही ताब्यात घेण्यात आले असून, आरोपींना ८ जानेवारीपर्यंत पोलिस कोठडी सुनावण्यात आली आहे.

ईशा हातीम अंसारी (५५), मुस्ता उफ 'गोलू ईशा अंसारी (२८), लुकमान ईशा अंसारी (२२), साहिल ईशा अंसारी (२०) आणि सलाउद्दीन ईशा अंसारी (१८) अशी या आरोपींची नावे आहेत.

तनसू नागपुरे (२३), व ऋतिक पटले (२२) यांनी मुस्ताच्या दुकानात दारू प्याली. नंतर त्यांच्यात वाद झाला. आरोपींनी तनसू आणि ऋतिक यांना आरोपींनी मारहाण करून गंभीर जखमी केले. ऋतिकचे वडिल शिवप्रसाद आणि आई संगीता यांनाही मारपीट करण्यात आली. जखमींना मेयो रुग्णालयात दाखल केले असता उपचारादरम्यान ऋतिकचा मृत्यू झाला. याप्रकरणी पाचही आरोपींना अटक करण्यात आली.

## : गतिमंदत्व :
## कारणं, लक्षण आणि उपचार

लोकारोग्य

जन्मजात मेंदूमध्ये दोष असलेली बालक मतिमंद असतात. अशा मतिमंद मुलासाठी विशेष शाळा असतात,ज्या शाळांमध्ये अशा मुलांना इतर मुलाप्रमाणेच व्यावहारिक ज्ञानाचे शिक्षण विशिष्ट पद्धतीने दिले जाते. परंतु, आपल्या समाजात अशीही काही बालक जन्माला येतात ज्यांच्या मेंदूमध्ये दोष नसतो, परंतु अशी मुलं हि गतिमंद असतात. म्हणजे हि मूल असतात चारचौघांप्रमाणेच. परंतु त्यांची प्रत्येक बाबतीतील कृती हि अत्यंत धीम्या गतीने सुरु असते.

अशा मुलांना गतिमंद म्हटले जाते. मुळात अशा प्रकारचे गतिमंदत्व बालकांमध्ये का येते?ते जन्मजात असते का?याची कारण काय असतात? आणि गतिमंदत्वावर उपचार उपलब्ध आहेत का? या प्रश्नाची उकल करण्यासाठी बालरोगतज्ज्ञ डॉ. भावेश शहा यांच्याशी बातचीत.

**गतिमंदत्व म्हणजे नेमकं काय?**

■ गतिमंदत्व आजार म्हणजे बालकाचा जन्मानंतर जो बौद्धिक विकास होणे अपेक्षित असते तो विकास खुंटतो. या बालकांचा बुध्यांक म्हणजेच,० हा ७० पेक्षा देखील कमी असतो. त्यामुळेच अशी मूल हि सर्वसामान्य मुलापेक्षा व्यवहारात मंद असतात. या मुलांची शिकण्याची क्षमता आणि दैनंदिन काम करण्याची क्षमता कमी असते. गतिमंदत्व मुलांना बौद्धिक अक्षमता असलेली मुलं म्हणून देखील ओळखले जाते.



**मुलं गतिमंद असण्यामागे कारण काय असतात?**

■ जी मुलं गतिमंद असतात त्यामागे अनेक कारण असू शकतात. यामध्ये अनुवांशिक कारण देखील असू शकते. म्हणजे गर्भारपणात जर आईला कोणते गंभीर आजार झाले असतील किंवा कुपोषणाची समस्या असेल तरी मुलं हे गतिमंद जन्माला येऊ शकते.मुलाचा अकाली जन्म किंवा जन्माच्या वेळी जर ऑक्सिजन कमी मिळाला तरी असे मुलं गतिमंद असू शकते. मुलाच्या जन्मानंतर जर काही अपघाताने मुलाच्या मेंदूला इजा किंवा गंभीर आजार झाला असेल तर असे मुलं गतिमंद होऊ शकते.

**गतिमंदत्वाची कोणती लक्षण दिसतात?**

■ जी मुलं गतिमंद असतात अशी मुलं हि सर्वसामान्य मुलांच्या तुलनेत उशिरा बोलायला लागतात. या मुलांचे दैनंदिन रुटीन व्यवहार हे अतिशय मंद असतात. शिक्षणात देखील अशा मुलांना गती नसते. अशा मुलांची सामाजिक कौशल्य कमी असतात. आणि अशा मुलांच्या अनेक समस्या असतात ज्या सहज सोडविणे कठीण असते .

**गतिमंदत्वावर उपचार काय आहेत?**
**या आजाराचे व्यवस्थापन कसे करायचे?**

■ मुळात गतिमंदत्व हा आजार नसून विकासातील एक टप्पा आहे,ज्यावर योग्य पद्धतीने नियंत्रण मिळवता येते. प्रत्येक व्यक्तीची क्षमता हि वेगळी असू शकते त्यामुळे अशा मुलांना वैयक्तिक मदतीची गरज असते. अशा मुलांना विशेष शिक्षण आणि कौशल्याचे प्रशिक्षण दिले जाते. स्पीच थेरेपी,ऑक्युपेशनल थेरेपी असे उपचार देखील उपलब्ध आहेत.

मूळ कारणावर आवश्यक काही औषधोपचार देखील करता येतो. सर्वात महत्वाचे म्हणजे गतिमंद मुलांना सर्वसामान्य मुलाप्रमाणे उभे करण्यासाठी कुटुं आणि समाजाचा पाठिंबा अत्यंत महत्वाचा असतो. ■ ■ ■

## भारतीय औषधनिर्माण
## अडचणी असूनही प्रगतीपथावर



आयएमएफआयच्या जुलै २०२५ च्या जागतिक आर्थिक दृष्टिकोन अपडेटमध्ये २०२५ मध्ये जागतिक सकल देशांतर्गत उत्पादन (जीडीपी) ३% आणि २०२६ मध्ये ३.१% वाढ अपेक्षित आहे.

१. या मॅक्रो वातावरणात, औषध उद्योगाच्या विक्रीचा विस्तार होणार आहे, उच्च-प्रभावशाली उपचारांमध्ये सतत नवोपक्रमाच्या आधारे २०३० पर्यंत जागतिक प्रिस्क्रिप्शन औषध महसूल सुमारे १.७ ट्रिलियन अमेरिकन डॉलर्स होईल असा अंदाज मूल्यांकनाने वर्तवला आहे.

२. कमी किमती आणि गुणवत्तेमुळे, भारतीय औषधांना जगभरात पसंती दिली जाते, ज्यामुळे देशाला जगातील फार्मसी असे नाव मिळाले आहे.

भारताची भूमिका प्रमाण आणि निर्यात पोहोच याद्वारे निश्चित केली जाते. २०२३-२४ मध्ये, या क्षेत्राची उलाढाल?४,१७,३४५ कोटींवर पोहोचली, जी गेल्या पाच वर्षांपासून दरवर्षी १०% पेक्षा जास्त वेगाने वाढत आहे. आर्थिक वर्ष २०२३-२४ मध्ये देशांतर्गत औषध बाजारपेठ ५० अब्ज अमेरिकन डॉलर्स होती (निर्यातः २६.५ अब्ज अमेरिकन डॉलर्स; देशांतर्गत वापरः २३.५ अब्ज अमेरिकन डॉलर्स), आणि उत्पादनाच्या प्रमाणात भारत जागतिक स्तरावर तिसऱ्या क्रमांकावर आहे आणि मूल्याच्या बाबतीत १४ व्या क्रमांकावर आहे.

तात्पुरत्या व्यापाराच्या आकडेवारीनुसार २०२४-२५ मध्ये औषध निर्यात सुमारे ९.४% वाढून ३०.४७ अब्ज अमेरिकन डॉलर्स झाली.३ हे क्षेत्र निरोगी दराने वाढत आहे. २०२५ मध्ये, भारताच्या औषधांच्या किंमतीच्या लँडस्केपमध्ये एक जागतिक बाजारपेठेतील दबावाबरोबरच नियामक देखरेखीचे सतत कडकीकरण. राष्ट्रीय औषध किंमत प्राधिकरणाने (एनपीपीए) औषध (किंमत नियंत्रण) आदेश, २०१३ अंतर्गत शेकडो अनुसूचित फॉर्म्युलेशनसाठी कमाल मर्यादा निश्चित करून किंवा सुधारित करून त्यांची व्याप्ती वाढवली आहे. २०२५ च्या मध्यापर्यंत, मधुमेहविरोधी, कर्करोग आणि संसर्गजन्य औषधांसह ७१ आवश्यक फॉर्म्युलेशनच्या किमती कमी करण्यात आल्या आहेत, ज्यामुळे परवडणारीता सुनिश्चित केली जाऊ शकते. ■ ■

## : आरोग्यम धनसंपदा :
## पडवळ एक औषधी उपयोग अनेक



पडवळबद्दल सांगायचे तर, याचे सेवन आरोग्यासाठी खूप फायदेशीर आहे, ते अशा अनेक घटकांनी समृद्ध आहे, ज्यामुळे अनेक गंभीर आरोग्य समस्या दूर होतात. म्हणूनच रोजच्या आहारात परवाळचा समावेश जरूर करा. ॲनिमियाची कमतरता भरून काढायची असेल, तर रोजच्या आहारात पडवळचा समावेश करू शकता, त्यात व्हिटॅमिन बी, व्हिटॅमिन सी आणि लोह भरपूर प्रमाणात असते. याच्या सेवनाने अशक्तपणाची कमतरता दूर होते, थकवा, शरीरदुखी यांसारख्या इतर समस्यांवरही मात करण्यास मदत होते. हृदयाचे आरोग्य चांगले ठेवण्यासाठी पडवळचे सेवन खूप फायदेशीर आहे. यामध्ये नैसर्गिकरीत्या अँटी-ऑक्सिडंट्स आणि अँटी-इंफ्लेमेटरी असे अनेक घटक असतात. हृदयविकाराचा धोका टाळायचा असेल, तर रोजच्या आहारात पडवळचा समावेश करू शकता. पचनशक्ती मजबूत ठेवायची असेल आणि बद्धकोष्ठता, पोट फुगणे, अल्सरची समस्या दूर करायची असेल तर पडवळचे सेवन खूप फायदेशीर ठरते. त्यात असे काही कण आढळतात जे आतड्यातील अन्नाचे कण तोडण्यास मदत करतात. ते खूप प्रभावी ठरतात. डायबिटीजच्या आजारावर नियंत्रण ठेवायचे असेल तर पडवळचे सेवन खूप फायदेशीर ठरते, याच्या सेवनाने चयापचय क्रिया सुधारते आणि रक्तातील साखरेचे प्रमाण नियंत्रणात राहते. ■ ■ ■

: संकलन व संयोजन :
सुबोध रणशेवरे, ९८३३१४६३५६
subodh.ranshevre @rediffmail.com

## जेसीबीने शिपायाला चिरडले

■ महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. ५ :

मोटारसायकलवर बसून असलेल्या पोलीस कर्मचाऱ्याला जेसीबी चालकाने जबर धडक दिली. वाहनासह खाली पडून जेसीबी खाली आल्याने पोलिसाचा घटनास्थळीच मृत्यू झाला. ही घटना हुडकेश्वर पोलिस ठाण्यांतर्गत घडली. जगदीश श्याम गेडेकर (४९) रा. शिव कॉलनी, नरसाळा रोड असे मृताचे नाव आहे.

शहर पोलिसात कार्यरत जगदीश यांची तैनाती पोलिस मुख्यालयात होती. जगदीश मोटारसायकलने घरून निघाले. नरसाळा रोडवर ब्रम्हनगर टी-पॉइंटवर त्यांनी मोटारसायकल उभी केली आणि त्यावर बसले. त्याच दरम्यान एक भरधाव जेसीबी त्यांच्या दिशेने आली. काही समजण्यापूर्वीच त्यांच्या मोटारसायकलला चालकाने जबर धडक दिली. जगदीश मोटारसायकलसह खाली पडले. जेसीबीच्या चाकाखाली आल्याने त्यांचा घटनास्थळीच मृत्यू झाला. अपघातानंतर जेसीबी चालक घटनास्थळावरून पसार झाला. पोलिसांनी गुन्हा दाखल केला आहे.

## कुटुंब एकच पण सदस्य वेगवेगळ्या प्रभागात...

■ महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. ५ :



नागपूर महापालिकेच्या निवडणुकीस अवघे दहा दिवस उरले असताना मतदार याद्यांमधील घोळ पुन्हा चर्चेत आहे. प्रारूप मतदार यादीवर आक्षेप नोंदवूनही अंतिम यादीत अनेक त्रुटी कायम राहिल्याचे चित्र आहे. त्यातच आता एकाच घरातील सदस्य वेगवेगळ्या प्रभागांत मतदार म्हणून नोंदले गेल्याचे प्रकार समोर आल्याने शहरातील मतदारांमध्ये संभ्रमाचे वातावरण निर्माण झाले आहे.

निवडणूक जवळ आल्याने नागरिकांनी मतदार यादी तपासण्यास सुरुवात केली असता हा विचित्र प्रकार उघडकीस आला. अनेक कुटुंबांमध्ये बहुसंख्य सदस्य एका प्रभागात असताना एखादा सदस्य शेजारच्या किंवा पूर्णपणे वेगळ्या प्रभागात नोंदणीकृत असल्याचे आढळले. वर्षानुवर्षे एकाच पत्त्यावर राहणारे, त्याच पत्त्याच्या आधारे ओळखपत्रे काढलेले नागरिक अचानक प्रभागनिहाय विभागले गेल्याने आश्चर्य व्यक्त केले जात आहे.

मध्य नागपूरमधील आदित्य याचे आई-वडील व इतर सदस्य प्रभाग १८ मध्ये मतदार म्हणून नोंदलेले असताना आदित्यचे नाव मात्र प्रभाग १९ मध्ये आहे. तक्रार करूनही समाधानकारक उत्तर मिळाले नसल्याचेही त्याने नमूद केले.

अशीच परिस्थिती अंकिताची आहे. पती व सासरच्या कुटुंबातील सदस्य प्रभाग ३६ मध्ये असताना अंकिताचे नाव चक्क प्रभाग ३७ आणि ३८ अशा दोन ठिकाणी नोंदले गेले आहे.

नागरिकांच्या मते हा प्रकार प्रभाग रचना, सीमारेषांचे पुनर्निर्धारण प्रक्रियेतील त्रुटींमुळे घडला असावा. काही ठिकाणी रस्ते, गल्ली किंवा इमारतींचे विभाजन वेगवेगळ्या प्रभागांत झाल्याने अशी चूक झाली असण्याची शक्यता आहे.

## पाटलांच्या विश्वासावर बळीराजाचा आसूड

■ अजित जगताप, सातारा, दि. ५ :



सातारा शहरात ९९ व्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाचा जागर अतुज्य पातळीवर पोहोचला आहे. साहित्यिकांनी भरभरून प्रतिसाद दिला. खऱ्या अर्थाने हे साहित्य संमेलन यशस्वी झाले असले तरी दुसऱ्या बाजूला शेतकऱ्यांचे प्रश्न न मांडल्यामुळे संमेलन अध्यक्ष विश्वास पाटील यांचा नामोल्लेख करून बळीराजा शेतकरी संघटनेचे संस्थापक अध्यक्ष पंजाबराव पाटील यांनी सडेतोड टीका केली आहे. त्यामुळे साताऱ्यात पाटलांच्या विश्वासवर बळीराजाचा आसूड ओढल्याची चर्चा सुरू झालेली आहे.

अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनामध्ये मराठी भाषा व महाराष्ट्रीयन माणसांच्या सुखदुःखाच्या घटनेबाबत भाष्य केले जात होते. त्यामुळे संमेलन अध्यक्ष भाषण याकडे सर्वांचे लक्ष असते.

यंदाच्या ९९ व्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाचे अध्यक्ष विश्वास पाटील यांचे भाषण म्हणजे विधिमंडळाच्या अधिवेशनामध्ये राज्यपालांचे अभिभाषण असते तशा पद्धतीनेच साहित्य अधिवेशनाचे भाषण झाल्याची टीका होऊ लागलेली आहे.

राज्य सरकारने मराठी साहित्य संमेलनासाठी दिलेल्या योगदानाचीच परतफेड या भाषणात दिसून आली आहे. अध्यक्ष विश्वास पाटील यांनी सरकारचे गुणगान गाऊन तमाम शेतकऱ्यांच्या दुःखावर मीठ चोळले आहे. कोल्हापूरच्या उसाच्या गुराळ त्यातून रस निघाला परंतु गूळ तयार झाला नाही. आतापर्यंतच्या भाषणातील सर्वात लाचार अध्यक्षांचे भाषण अशी टीका शेतकरी संघटनेचे पंजाबराव पाटील यांनी निवेदनाद्वारे केली आहे.

अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाच्या व्यासपीठावरून आज पर्यंत कष्टकरी शोषित लोकांचे आवाज उठवण्याचे काम सर्व अध्यक्षांनी आपल्या भाषणातून केलेले आहे. सध्याचे अध्यक्ष विश्वास पाटील यांनी शेतकऱ्यांचा व शिक्षणाचा प्रश्न उपस्थित केला. परंतु, ज्या ताकतीने प्रश्न मांडायला हवा होता ती ताकद त्यांच्या आवाजात दिसली नाही.

विश्वास पाटील सनदी अधिकारी व इतिहास लेखक म्हणून प्रसिद्ध आहेत. परंतु त्यांनी काल त्यांच्या भाषणातून उत्तर प्रदेशचे मुख्यमंत्री गोविंद वल्लभ पंत यांचे गाव कराड तालुक्यात ओंड असताना त्यांनी औंध असे सांगून पंतप्रतिनिधी असताना त्यांनी मालोजीराजे निंबाळकर असे म्हणून आपल्या अकलेचे तारे तोडले आहेत. यावरून त्यांचा इतिहासचा गाढा अभ्यास आम्हाला समजला अशी टीका केली आहे.

त्यांनी महाराष्ट्राचे शिल्पकार व सातारा जिल्ह्याचे सुपुत्र स्वर्गीय यशवंतराव चव्हाण यांचा त्यांच्या भाषणात सन्मानपूर्वक उल्लेख कधीच केला नाही. चुकून एकदा त्यांच्या भाषणात चव्हाण साहेबांचे नाव आले होते. चव्हाण साहेबांचे साहित्य बद्दलचे प्रेम संपूर्ण महाराष्ट्राला माहित आहे. याची जाणीव विश्वास पाटलांना नसावी.

यापूर्वीच्या माजी अध्यक्ष डॉ. तारा भवाळकर यांनी दिल्ली येथील अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाच्या अध्यक्षपदावरून भाषण करताना समोर देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी उपस्थित असताना सुद्धा सरकारच्या चुकीच्या धोरणावर त्यांनी सडेतोड शब्दात आवाज उठवलेला होता. त्यांच्या भाषणाची नोंद संपूर्ण जगातील मराठी लोकांनी घेतलेली होती. त्यांनी कष्टकऱ्यांच्या शोषितांच्या व्यथा मांडून आवाज उठवलेला होता परंतु कालच्या सातारा येथील झालेल्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनातून फक्त सरकारचाच आवाज उठवण्याचा प्रयत्न झाल्याचे दिसून आले.

विश्वास पाटील हे एका शेतकरी कुटुंबातून आलेले मराठा घराण्यातील एक सनदी अधिकारी असा लौकिक असलेला अध्यक्ष कडून महाराष्ट्राच्या तमाम जनतेकडून खूप अपेक्षा होत्या. त्यामध्ये त्यांना अपयश आलेले आहे.

बिघडलेले गाव सुधारायाचा असेल तर पाटील आणि कुलकर्णी यांची युती व्हावी असे जातीय विधान करून अभिजनांची तळी उचलत बहुजन समजाला कमी लेखण्याचे काम संमेलन अध्यक्ष विश्वास पाटील यांनी केले आहे. त्याबद्दल त्यांचा जाहीर निषेध व त्याबद्दल त्यांनी माफी मागावी. येणाऱ्या वर्षभरात त्यांनी झालेल्या चुका दुरुस्त करून बोध घ्यावा आणि महाराष्ट्राच्या आणि मराठी लोकांच्या कल्याणासाठी जे जे करता येईल ते करावे यासाठी माझ्याकडून त्यांना शुभेच्छा आहेत, असे बळीराजा शेतकरी संघटनेचे संस्थापक अध्यक्ष पंजाबराव पाटील यांनी नमूद केले.